# गीर गिरनार गरबा

प्रा. सौ. मेधा काळे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. ६५८



REFBK-0024388

संदर्भ भू प्रवास
६५८
२४३८८
७/११/८४



**शालीमार प्रकाशन**

अहमदनगर

REFBK-0024388

# गीर गिरनार गरबा


◆ लेखिका

© प्रा. सौ. मेधा यशवंत काळे

◆ प्रकाशक

शालीमार प्रकाशन
माळीवाडा, फुले रोड,
अहमदनगर, (महाराष्ट्र)

प्रकाशन क्रमांक
तृतीय

आवृत्ती
पहिली
१९७९

◆ मुद्रक

श्री. बा. ज्ञा. पावले
अनंत प्रिंटिंग प्रेस
३३६ शुक्रवार पेठ,
पुणे २

◆ मुखपृष्ठ व रेखाचित्रे

श्री. अनंत सालकर
पुणे ३०

◆ मुखपृष्ठ छपाई

स्वरूप मुद्रण
पुणे ३०

◆ मूल्य

रुपये अठरा

◆ तीन रंगी ब्लॉक

धारगळकर प्रोसेस प्रा. लि.,
दादर, मुंबई २८

◆ फोटो ब्लॉक्स

श्री. व्ही. जोशी अँड कंपनी
पुणे ३०

## गीर

अरबी समुद्रात बाल्कनीसारख्या डोकावणाऱ्या गुजरात राज्यातील पश्चिमेकडील घनदाट जंगलाचा भाग ! महाभारतकाळात नैमिषारण्य या नावाने ओळखली जाणारी तपोभूमी ! संस्कृत शब्द गिरी-पर्वत-यापासून गीर शब्द प्रचलित झाला साग, चंदन इ. वृक्षांनी वेढलेल्या टेकड्यांच्या या प्रदेशातील जंगल अस्वल, बिब्या वाघ, चित्ते, सांबर, विविध प्रकारची हरणे, नीलगाय व इतर प्राणी यांनी गजबजले आहे तरी ते प्रामुख्याने प्रसिद्ध आहे वनराजासाठी ! केवळ भारतातच नव्हे तर आशिया खंडातही सिंहाची एकमेव वस्ती असलेल्या, आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या गीरच्या जंगलात निघालो होतो – मुक्तपणे वावरणारे जातिवंत सिंह जवळून पहायला !



# गिरनार

हिमालय पर्वताच्या खालोखाल हिंदूनी पवित्र मानलेला गिरी–नारायण–गिरनार पर्वत हा पार्वतीचा भाऊ मानला जातो गुरू दत्तात्रय आणि अबाजी–पार्वती हिच्या वास्तव्याने पुनीत झालेला गिरनार हा जैन धर्मियानाही तितकाच पवित्र वाटतो २२ वे जैन तीर्थंकर भगवान नेमीनाथ यानी ससाराच्या विरक्तीनतर येथेच आराधना केली होती त्यांच्या आयुष्यातील दीक्षा, केवलज्ञान व निर्वाण हे तीनही महत्वाचे प्रसग येथेच घडले चार हजार फूट उचीच्या गिरनारची सफर हा एक रोमाचकारी अनुभव होता



# गरबा

वसतपचमी, शरदपौर्णिमा, होळी, नवरात्र यावेळी गोलाकार फेर धरून धुंदपणे नृत्य करणाऱ्या गुर्जर कन्यकांचा आवडता पारंपारिक नृत्यप्रकार--गरबो--गरबा नवरात्रात देवीजवळ सच्छिद्र घटात अखंड दीप लावून ठेवला जातो त्याला म्हणतात दीपगर्भघट । गरबा म्हणजे गर्भदीप प्रकाश बाहेर जाण्यासाठी सच्छिद्र पाढऱ्या मातीचा घडा--घट घेऊन तो पानाफुलांनी सजवला जातो लहानमोठे घट डोक्यावर एकावर एक ठेवून वरच्या घटावर पणती ठेवून त्यावर चार ज्योती प्रज्वलित करतात आणि मग हाताने टाळ्या वाजवीत, ताल धरीत, गाणी म्हणत गोलाकार समूहात फेर धरला जातो ।

भगवान कृष्णाचा नातू अनिरुद्ध याची पत्नी उषा हिने हा नृत्यप्रकार विकसित व लोकप्रिय केला गरब्यामधील गुजरातच्या सामूहिक लोकजीवनाचा जल्लोश व लयबद्धता अलौकिकच । गरब्याच्या पदन्यासामध्ये देहभान विसरणाऱ्या गुर्जरकन्यांची भूमी पहायला उत्सुकतेने निघालो होतो गुजरातच्या सफरीवर



# प्रवासातील पश्चिम भारत

प्रा सौ मेघा काळे यांचे हे तिसरे प्रवासवर्णनात्मक पुस्तक पहिले ' शालीमारची साद ' हे उत्तर भारताच्या व खासकरून हिमालयाच्या परिसरातील प्रवासवर्णनाचे होते दुसरे ' कोनार्क ते कन्याकुमारी ' नावाचे पूर्व–दक्षिण भारतातील प्रवासवर्णनाचे होते आता त्यांचे हे तिसरे प्रवासवर्णन–पश्चिम भारताचे व प्रामुख्याने गुजरातचे ( म्हणजेच प्राचीन ' आनर्त ' भूमीचे ) स्थलवर्णनात्मक पुस्तक सिद्ध होत आहे प्रथमत प्रा काळे यांच्या या वाङ्मयप्रकारातील ' हॅटट्रिकचे ' मन पूर्वक अभिनदन!

प्रवास काय सारेच करतात ! त्यातील ' डोळसपणे ' किती करतात हा पहिला प्रश्न दुसरा तो केल्यावर त्याचे रसाळ साहित्यिक भाषेत वर्णन करण्याची कुवत कितीजणात असते हा प्रश्न प्रा काळे यानी 'या पुस्तकाने हे करता येते, हे निर्विवाद सिद्ध केले आहे त्याच्या तिन्ही पुस्तकाची निर्मिती त्यानी भानपूर्वक पूर्वनियोजनाने केली आहे हे खास जाणवावे असे वैशिष्टच आहे

प्रथमत प्राध्यापकी हा माणसाला आळशी करणारा व्यवसाय ! शिकविणे, पेपर्स काढणे, तपासणे ही कामेच आजकाल अक्षरश यत्रवत् होतात तात्पर्य, या व्यवसायात कुठेतरी योजनाबद्ध प्रवास करावा असे

वाटणेच दुष्प्राप्य त्यातून ते स्त्रीला, कुटुबवत्सल व लेकुरवाळ्या स्त्रीला वाटणे तर आजच्या काळात कर्मकठीण प्रा सौ मेधा काळे यांना ते वाटले आहे. तिसऱ्यादा वाटले आहे आणि पती व दोन मुले यांच्यासह त्यांनी हा आनर्तभूमीचा प्रवास आजच्या धकाधकीच्या काळात करून त्यातील प्रत्ययाचा सहअनुभव मराठी वाचकासमोर ' गीर गिरनार गरबा ' या अत्यत काव्यमय नावाने ठेवला आहे हे विशेष

कै ग दि माडगूळकर याच्या कलावताचे आनदपर्यटन या प्रवासवर्णनाच्या पुस्तकावर, त्यांच्या आज्ञेने काय वाटते ते लिहिण्याचा योग १९७६ साली आला होता त्यानतर हा । वाचकाना हे प्रथमच सागितल पाहिजे की ही ' प्रस्तावना ' नाही ( प्रस्तावना या प्रकाराच्या मी मूलत विरुद्ध आहे माझ्या कुठल्याही पुस्तकाला प्रस्तावना नाही ) ही केवळ एक दिलखुलास ' प्रतिक्रिया ' आहे प्रवासवर्णनाचे पुस्तक मी कसे वाचतो याची नोद मात्र आहे ग दि मा च्या पुस्तकाला ' प्रवासवर्णन ' म्हणता येणार नाही हे मी त्याच्या या पुस्तकात स्पष्टपणे नोंदले होते तरीही तो वर्णनप्रकार हृद्य व रसरशीतपणे उतरला आहे

प्रा काळे याचे हे ताजे पुस्तक वाचताना मला प्रकर्षाने जाणवलेला लेखिकेचा हा गुण की जिथ जिथ इतिहासाची पान रगली त्या त्या ठिकाणी त्याची वर्णनशैली अधिक मुक्तपणे खुलून उठली आहे बडोद्याचे मूळ नाव ' वडपद्रका ' हे जसे त्याना जाणवते तसे ते ' सयाजी महाराज गायकवाडाचे बडोदा ' हे त्या आवर्जून नोंदतात ( जाता जाता सयाजीराव हे मराठी साहित्य समेलनाचे अध्यक्षपद भूषवलेले एकमेव भारतीय सस्थानिक होत जसे राजर्षी शाहू हे ज्याच्या नावे स्वतत्र भारतात पोस्टाचे तिकीट निघू शकले असे एकमेव सस्थानिक होत ) बडोदा शहराला ' विश्वामित्री ' नदीचा सहवास आहे हे फारस मराठी साहित्यात वाचायला मिळत नाही ते इथ सापडत कॅथेरीन ही पोर्तुगीज राजकन्या इग्लडच्या दुसऱ्या चार्लस्‌ला दिली त्यावेळी ' आंदण ' म्हणून पोर्तुगिजानी मुंबई बेट इंग्रजाना ५०,००० पौडाना दिले ही छोटीच पण भारताच्या नादान

इतिहासावर बोलक भाष्य करणारी नोंद या पुस्तकात सापडते बडोद्याला जाणाऱ्यांनी तेथील म्युझियममधील भारतातील सर्वांत मोठा असा ७२ फूट लांबीचा व्हेल माशाचा सांगाडा पहावा असाच असणार

भगवान कृष्णाचे नाव रणछोडराय असेही होते हे या पुस्तकाने मला तरी नव्याने कळले डाकोर येथील या रणछोडरायचे मंदिर साताऱ्याचे कुणी तांबवेकर यांनी नव्याने बांधवले हे इथे कळते 'अहमदाबाद' शहराचे मूळ नाव 'कर्णावती' होते व गुजरातवर राज्य केलेल्या सोळंखी राजघराण्याचे विख्यात नगर होते हे या पुस्तकाने वाचकाला कळावे वीस लाख लोकसंख्येचे अहमदाबाद आज भारतातील सहाव्या क्रमांकाचे शहर असून भारताला २५ टक्के एव्हढा कापडपुरवठा ते करते अशी अचूक व बोलकी भौगोलिक व सामाजिक नोंद प्रा काळे करतात तेव्हा पुस्तकाची गुणवत्ता लक्षणीय बनत जाते येथील कांकरिया तलाव व १४ व्या शतकातील तत्रज्ञ हफीज सिद्दी बशीर या कल्पक माणसाच्या बुद्धीवैभवाची साक्ष देणारे झुलते मनोरे यांचे योग्य वर्णन या पुस्तकात आढळते

साबरमती येथील म गांधींचा आश्रम बघताना त्यांच्या एक दोन संस्मरणीय आठवणी इथे नोंदल्या गेल्या आहेत त्यातील सर्वांत हृदयस्पर्शी आहे ती १९३० साली भारत स्वतंत्र केल्याशिवाय पुन या आश्रमात परतणार नाही असा निर्धार करून दांडीयात्रेसाठी बाहेर पडलेल्या गांधीजींची ! खरे तर गुजरात बघताना जाणत्या पर्यटकांच्या मनात दोनच महामानव सातत्यान रेंगाळत रहात ल एक भगवान श्रीकृष्ण व दुसरे म गांधी !

गुजरातमध्ये मोठ्या शहरांखेरीज जेवणाचे हालच या एका निसटत्या उल्लेखाने तेथील ग्रामीण व नागरी जीवनावरचे परखड सत्य शोधक वाचकाच्या ध्यानी पट्कन यावे

८६३ जैन मंदिरे असलेल्या शत्रुंजय नावाच्या टेकडीवरचे प्रसिद्ध जैन तीर्थ पहिले तीर्थंकर वृषभदेव यांच्या वास्तव्याने पावन झाले आहे या टेकडीलगत दुसरी टेकडी असून दोन्हीमध्ये तीन मैल लांबीची दरी होती ती दरी मोतीचंद नावाच्या व्यापाऱ्याने लाखो रुपये खर्चून भरून काढली व

दोन्ही टेकड्या जोडल्या हा विक्रमी इतिहास अनेक सश्रद्ध जैन बांधवा-नाही माहीत नसेल

सत नरसी मेहताचे जुनागढ पहाताना सतत सात दिवस शिवपिंडीवर मस्तक टेकवून साकडे घालणाऱ्या त्या गुजराती सताचा अचूक उल्लेख प्रा काळयांनी केला आहे या पार्श्वभूमीवर जुनागडचा ९०० कुत्री पाळणारा, आपल्या आवडत्या कुत्रीचा मोठ्या बेमुर्वत मूर्खपणान या देशात धूमधडाक्यान 'निका' लावणारा व फाळणी होताच चक्क पाकिस्तानात पळून गेलेला शेवटचा नवाब महाबतखान वाचताना सूज्ञ वाचकाला कसतरीच वाटण साहजिकच आहे नुकतेच फाशी गेलेले पाकिस्तानचे भुट्टो यांचे वडील–शहानवाझ भुट्टो या चक्रम नबाबाचे दिवाण होते हा उल्लेखही असाच

गिरनार गुजरातचाच नव्हे तर भारताचा मानबिंदू आहे इथ श्रीकृष्णाचे चुलतभाऊ नेमीनाथ यांचही तीर्थक्षेत्र आहे "उचो गढ गिरनार वादळथी वातो करे" या नेमक्या व मोजक्या काव्यपक्तीत त्याच वर्णन करता येईल नाथ सप्रदायाच्या गोरखनाथानी तपश्चर्या केलेल हे ठिकाण गिरनार ! सम्राट अशोकाचा एक विख्यात शिलालेखही इथ आहे

मनमोकळ्या मुक्तपणे सचार करणाऱ्या वनराज सिंहाच दर्शन गीरच्या जगलात डोळाभर घेता येत जवळजवळ २५० सिंहाच हे वसतीस्थान आहे गिरनार हा उचीसाठी तर गीरचे जगल हे सिंहांच्या थरारक दर्शनासाठी विख्यात आहे

सोमनाथ हे भारताचा इतिहास शतकानुशतके ढवळून काढणार प्रसिद्ध शिवस्थान आहे लेखिकेच्या प्रवासवर्णनाला या स्थळाच वर्णन करताना आगळी धार चढलेली जाणवते प्रभासपाटण हे श्रीकृष्णाचा बधू बलराम यांच्या तीर्थयात्रेतील व प्राचीन वाङ्मयात ज्याचे वारवार उल्लेख येतात असे स्थळ ! या प्रभासतीर्थाजवळचे भारतविख्यात सोमनाथ मदिर ! १२ व्या शतकात गझनीच्या महमदान या प्रसिद्ध सुवर्णी शिवलिंगावर धाड घातली ५० हजार हिंदूची कत्तल करून महमदान या मदिरातील रत्न

शिवलिंगाचे अक्षरश चार तुकडे करून ते फोडून लुटली हा पहिला हल्ला यानतर लागलीच १३ व्या शतकात पुन आसफखानाने हे मदिर भग्न केले अठराव्या शतकात औरगजेबाचा सेनापती मुअज्जम याने केला तो तिसरा व शेवटचा विध्वस असा या शिवस्थानाचा विध्वस इग्रजी राजवटीत दूरदृष्टीच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यानी या स्थळाचा पुनरुद्धार केला स्वातत्र्यात १९५१ साली राष्ट्रपती डॉ राजेंद्रप्रसाद याच्या हस्ते शिवलिंगाची झालेली पुन प्राणप्रतिष्ठा हा या सोमनाथपर्वातील अखेरचा हृद्य पडदा ठरला

ज्या ठिकाणी भगवान श्रीकृष्णानी आपल्या देहाचे तुलसीदल एका साध्या व्याधाच्या बाणाचे निमित्त शोधून ठेवले ते सुप्रसिद्ध ' देहोत्सर्ग ' हे ठिकाण गुजरातेतच आहे कळत नाही पण प्रा काळयाची लेखणी या ठिकाणी हवी तशी खुललेली वाटत नाही तस पाहिल तर गुजरातचा प्रवास करणाऱ्या कुठल्याही भारतीयाला आत्मलक्षणी करण्याच विलक्षण सामर्थ्य असलेल हे ठिकाण दक्षिण भारतात जशी कन्याकुमारी तशी गुजरातेत ही जागा–तीर्थ देहोत्सर्ग या ठिकाणाला नावही किती यथार्थ पडलय ! जिथ योगयोगेश्वर, गीतेच्या महान उद्गात्या भगवान श्रीकृष्णान आपल्या नीलवर्णी देहाचा उत्सर्ग केला ते हे स्थळ श्रीकृष्णचरित्रातील अनेक कथा इथ सार्थ विराम पावलेल्या आहेत भारताच बौद्धिक, सामाजिक व अध्यात्मिक मन्वतर ज्या श्रीकृष्ण या आकाशसदृश गूढ प्रतिभेन केल त्या केवळ दुर्मिळ स्वर्गीय प्रतिभेन कात टाकावी तसा देह इथ आनर्ताच्या भूमीत टाकला आहे

गाधीजीचे पोरबदर, प्रसिद्ध क्रिकेटवीर रणजीचे जामनगर, जिथ श्रीकृष्णानी आपल्या आयुष्याच शेवटच पर्व रगवल ती द्वारका, माऊट अबू अशा ठिकाणांच बारकाव्यासह वर्णन या पुस्तकात आल आहे

प्रा काळे याची प्रवासान वाढलेली जाण अनेक ठिकाणी त्यानी निकरान रोधून ठेवलेली मला जाणवली ग दि मां च आनदपर्यटन हे प्रवासवर्णन त्याच्या नजाकतदार सामाजिक जाणिवेला धरून ठिकठिकाणी उतरलेल्या उल्लेखात जाणवत खरे तर अशा वर्णनात समोर पाहिलेली मदिर

सभागृह, स्तंभ, तलाव यांच्या लांबीरुंदीच्या वर्णनाबरोबर प्रत्येक स्थळा-भागचा त्या त्या निर्मात्याचा 'आशय' उठवता आला पाहिजे व्यक्तिश आपल्याला आज ते ठिकाण पहाताना काय वाटत हे स्पष्ट सांगता आल पाहिजे आणि तस सांगण्यासाठी पर्यटकाला प्रथम ते 'वाटल' पाहिजे प्रा काळे प्रवासवर्णनाच्या या अलिखित, सापेक्ष कसोट्याना बऱ्याच लक्षणीय अर्थाने पूर्ण करताना पानोपानात जाणवतात त्याच हे पश्चिम भारताच्या प्रवासाच वर्णन ही मराठीतील या प्रकारच्या साहित्यातील निश्चित मौलिक भर आहे त्याच्या या पुस्तकाचेही मराठी वाचक स्वागत करतील याबद्दल मला शका नाही ते स्वागत स्वीकारून प्रा मेधा काळे यानी प्रवासवर्णनाची ही हॅटट्रिक पार होताच आता 'षट्काराची' योजना आखावी हे योग्य !

पुणे
२४ ऑक्टोबर १९७९

शिवाजी सावंत

## गीर गिरनार गरबा वाचण्यापूर्वी--

'शालीमारची साद' व 'कोनार्क ते कन्याकुमारी' या माझ्या दोन्ही पुस्तकांचे रसिक वाचक, हौशी पर्यटक, पर्यटन क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ विविध वृत्तपत्रे, प्रथितयश साहित्यिक, समीक्षक यानी उत्स्फूर्तपणे स्वागत केले अनेक वाचकाची दूरवरून पत्रे आली नवीन स्नेही लाभले माझ्या पुस्तकाचे वाचक विद्यार्थी, गृहिणी मध्यमवर्गीय प्रवासी, पोलीस, सेवा-निवृत्त व्यक्ती, प्राध्यापक, इंजिनीयर, डॉक्टर, सुबक मूर्ती तयार करणारे कलाकार जसे आहेत तसेच सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या छोट्या खेड्यात, आदिवासी भागात रहाणारा, वाचनाची आवड असणारा शेत-करीही आहे याचा मला अभिमान आहे आपल्या पत्रात या शेतकरी बधूने लिहिले आहे- "मी दोन्ही पुस्तके मोठ्या आवडीने व भाविकतेने वाचली माझा आनद गगनात मावेनासा झाला आहे पुस्तके वाचून मला सुद्धा असे वाटते की, सर्व भारतभर प्रवास करावा ऐतिहासिक व धार्मिक बाबींचे स्मरण करावे हीच आशा बाळगून आहे" एवढे लिहून पत्राच्या शेवटी ते लिहितात पत्र मोडक्या तोडक्या भाषेत लिहिले आहे याचा राग मानू नये पुस्तकात भेटलेल्या माझ्या दोन मुलाना गोड आशीर्वाद द्यायला ते विसरत

माहीत कोल्हापूरचे एक प्रसिद्ध मूर्तीकार पुस्तके वाचून आनंद झाल्यामुळे मोठ्या प्रेमाने जेव्हा साध्वी मीराबाईंची मोहक मूर्ती भेट म्हणून पाठवतात तेव्हा माझे मन भारावून जाते कल्याणच्या एका यात्रा करून आलेल्या वयस्कर महिला आपल्या मुलाला नगरला पाठवून जेव्हा आशीर्वाद कळवतात तेव्हा धन्य वाटते मुंडासे घातलेला, शेतात राबणारा एक वयस्कर शेतकरी स्वत एस् टी ने नगरला घरी येऊन म्हणतो की–" पुस्तके वाचली आणि रहावेना लिहिणाऱ्या बाईंना डोळ्याने पाहून प्रत्यक्ष प्रवासाचे वर्णन ऐकावे व आशीर्वाद द्यावा म्हणून आलो " अनेक रसिक वाचकाकडून अशी दाद मिळाली त्यामुळे होणारा आनंद काही औरच असतो बस्– लेखकाला आणखी काय हवे ?

गुजरात राज्याचे केवळ तीन शब्दात वैशिष्ट्य सांगणारे हे नवे पुस्तक आहे–गीर गिरनार गरबा भारतासारख्या खंडप्राय देशात विपुल पर्यटन स्थळे असून देशविदेशचे पर्यटक उत्सुकतेने आकर्षिले जात आहेत पर्यटन हा मोठा जागतिक व्यवसाय होऊ पहात आहे पर्यटकांना मार्गदर्शक व उपयुक्त पुस्तकाची नितांत गरज आहे असे माझे पहिल्या दोन्ही पुस्तकांच्या अनुभवावरून मत झाले आहे हे पुस्तकही खास पर्यटकांच्या दृष्टिकोनातून लिहिले आहे त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे

प्रवास आखण्यापासून माझे पती श्री यशवंत यांनी जसा उत्साह दाखवला त्याचप्रमाणे पुस्तक आकर्षक व देखणे करण्यासाठी उपयुक्त सूचना केल्या चोखंदळपणा दाखवला नगरचे तरुण कवी श्री विलास गिते यांनी उत्स्फूर्तपणे अनेक प्रकारची माहिती, संदर्भ परिश्रमपूर्वक गोळा करून आणून दिले हस्तलिखित वाचून मांडणी, शीर्षक इ बाबत चर्चा केली, सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्यच आहे

आदरणीय श्री शिवाजीराव सावंत यांनी प्रकृतीस्वास्थ्य नसतानाही पुस्तकाबाबतची प्रतिक्रिया जिव्हाळ्याने व्यक्त केली हे माझे भाग्य आहे त्याबाबत मी कृतज्ञतापूर्वक ऋण व्यक्त करते त्याचप्रमाणे नामवंत

साहित्यिक श्री रणजित देसाई, पितृतुल्य श्री गोपीनाथ तळवलकर, डॉ ग श्री खैर, श्री रवींद्र पिंगे, मुंबई दूरदर्शनचे श्री केशवराव केळकर, सरोजिनी बाबर, कवयित्री शांताबाई शेळके, ज्योत्स्ना देवधर, सकाळचे श्री श्री ग मुणगेकर, श्री बापूसाहेब गोखले, दत्तदिगंबर यात्रा कंपनीचे श्री दादासाहेब कुलकर्णी इ अनेक थोरामोठ्याच्या तसेच माझे वडील श्री रा ना झोळ व श्वशुर श्री ह कृ तथा बाळासाहेब काळे यांच्या आशीर्वादावरच माझी वाटचाल चालू आहे सर्वांची मी नितांत ऋणी आहे सकाळ, स्वराज्य, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, केसरी, तरुण भारत, ललित इ वृत्तपत्रांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे

चित्रकार श्री अनंत सालकर, अनंत प्रिंटिंग प्रेसचे श्री बा ज्ञा पावले व कर्मचारी, ब्लॉकमेकर्स व्ही जोशी व श्री धारगळकर यांच्या सहकार्यामुळेच पुस्तकाच्या आकर्षकतेत भर पडली आहे सर्वांची मी आभारी आहे

हौशी पर्यटक, रसिक वाचक यांच्या कसोटीला हे पुस्तक उतरेल अशी आशा आहे

दिनांक ३–११–१९७९
अहमदनगर

सौ मेधा काळे

पितृतुल्य श्वशुर . .


कै. काका

प्रेमळ पिताजी.... .

कै. अण्णा

यांना आदरपूर्वक अर्पण

- कृष्णभूमीकडे १७
- सयाजीराव गायकवाडाचे बडोदा २०
- रणछोडरायचे डाकोर ३१
- मशिदी, मीनार, गिरण्याचे गाव–अहमदाबाद ३७
- भावनगर • शत्रुंजय–जैनांची मंदिरनगरी ५७
- नरसी मेहताचे जुनागढ ६८
- गिरनारची सफर ८१
- अजरामर सोमनाथ ८९
- वनराजांचा मुक्तविहार-सासनगीर १०४
- सुदामपुरी–म गांधींचे पोरबंदर १०९
- राजकोट • प्रिन्स रणजींचे जामनगर ११३
- मीरा कृष्णाची द्वारका १२१
- ओखा ते मेहसाणा १३१
- माऊंट अबू • संगमरवरी शिल्प–दिलवाडा १३८
- परतीचा प्रवास १५७



# कृष्णभूमीकडे

दिवाळीची सुटी लागायला अजून एक आठवडा अवकाश होता मुलांची नेहमीप्रमाणे गडबड सुरू झाली होती—या सुटीतही मागच्या-प्रमाणे कुठेतरी लांब प्रवासाला जायचे पण यावेळचा प्रवास फार लांबचा नव्हता फक्त शेजारच्या गुजरातच्या सफरीवर जायचे होते नेहमीप्रमाणे प्रवासाची तयारी सुरू केली

गुजरातचा प्रवास करण्याचे ठरवले तेव्हा भगवान कृष्णाचे वास्तव्य झालेल्या भूमीचे दर्शन होणार या कल्पनेनेच शरीर रोमांचित झाले द्वारकेला गिरीधर गोपालाच्या सहवासात तल्लीन झालेली मीराबाई मन चक्षूसमोर नाचू लागली केवळ सत्याग्रहाने भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देऊन नवा इतिहास घडवणाऱ्या बापूजींची जन्मभूमी पोरबंदर आणि कर्मभूमी अहमदाबाद येथील साबरमती आश्रम येथे समक्ष जायला मिळ-णार या कल्पनेने मन उचंबळून आले सयाजीराव गायकवाड यांच्या कीर्तीने झगमगणारे देखणे बडोदे शहर केव्हा पहायला मिळेल असे झाले होते

गीरच्या जंगलात जाऊन वनराजाचे दर्शन घ्यायला मिळणार म्हणून उदय खूष होता मात्र भीत भीत तो विचारायचा—आई, जंगलातले सिंह आपल्या अंगावर उडी तर मारणार नाहीत ना ! उल्का खूप होती

अहमदाबादचे झुलते मनोरे पहायला मिळणार म्हणून ! तरीपण तीही धास्तीने हळूच विचारायची की, मीनार हलताना आपण पडणार तर नाही ना ! चंद्रकांत खूष होते—अबू येथील संगमरवरी शिल्पाने सजलेली विश्वविख्यात जैनमंदिरे पहायला मिळणार म्हणून ! मंदिराचे शिल्प हा त्यांचा वीकपॉईंट तसा इतिहास हा माझा मला उत्कंठा लागली होती पश्चिम किनाऱ्यावरील सोमनाथ मंदिर पहाण्याची लहानपणापासून इतिहासात वर्णन वाचलेले, वारवार झालेल्या आक्रमणाचे आघात पचवलेले सोमनाथ मंदिर कधी पाहू असे झाले होते

दिवाळीचे लक्ष्मीपूजन आटोपले पाडव्याचा नववर्षाचा शुभदिवस उजाडला आणि सकाळच्या रम्य वेळी गुजरातच्या प्रवासाला उत्साहाने निघालो हम दोनो, बच्चे हमारे दो आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत साथ दिलेल्या आमच्या दोन सुटकेसेस, एक होल्डाल आणि एक बास्केट !

अहमदनगर ते मुंबई हा आठ तासांचा प्रवास संपवून मुंबई सेंट्रल बस स्टँडवर दुपारी तीनला पोहोचलो रस्ता ओलांडून पश्चिम रेल्वेच्या बॉम्बे सेंट्रलच्या भव्य वेटींग हॉलमध्ये प्रवेश केला नंतर तेथेच फराळाचे खाऊन विश्रांती घेतली

पहिला मुक्काम बडोद्याला करायचा होता रात्री दहाला निघणाऱ्या बडोदरा एक्स्प्रेसने गुजरातचा प्रवास सुरू करायचा होता बॉम्बे सेंट्रलचे प्लॅटफॉर्म गर्दीने तुडुंब भरले होते गाड्यामागून गाड्या सुटत होत्या निरोप देणारी मंडळी हात उंचावून निरोप देत होती ठीक दहा वाजता बडोदरा एक्स्प्रेस मुंबईचा निरोप घेऊन धावू लागली दोन बर्थ मिळाले होते सामान व्यवस्थित लावून दिवसभराच्या प्रवासाने शिणलेले अंग बर्थवर टाकून दिले स्टेशनामागून स्टेशने जात होती, पण झोप येत नव्हती

रात्री साडेबाराच्या सुमारास सुरत स्टेशन आले असा आवाज कानावर पडला सुरतचा इतिहास क्षणात डोळ्यासमोरून तरळत गेला

पोर्तुगिजानी १६ व्या शतकात सुरत जिंकले नंतर मोगल अमल होता शिवाजी महाराजांनी दोन वेळा सुरतेवर केलेल्या स्वाऱ्या आठवल्या अठराव्या शतकाच्या सुमारास इंग्रजांनी ईस्ट इंडिया कंपनीची पहिली वखार येथे स्थापन करून भारतात शिरकाव केला अहमदाबाद खालो-खाल गुजरातमधील दुसऱ्या क्रमांकाचे शहर असलेले सुरत हे कापड व्यवसायाचे भारतातील ख्यातनाम शहर। भारतातील पहिले फिरते हॉटेल ( *Revolving Restaurant* ) असल्याचा अभिमान बाळगणारे सुरत गाडीने रात्री एकच्या सुमाराला पार केले आणि निद्राधीन कधी झालो कळले नाही

दिवस उजाडता ठीक सव्वा सहाला वडोदरा एक्स्प्रेस बडोदा स्टेशन-वर थांबली स्टेशनची सुंदर इमारत आकर्षक आहे सामान उतरून घेऊन लिफ्टने दुसऱ्या मजल्यावरील रिटायरिंग रूममध्ये आलो दोन तासात स्नान, ब्रेकफास्ट आटोपून बडोदा शहर पहायला निघालो

◆ ◆



# सयाजीराव गायकवाडांचे–बडोदा

बडोद्याचे मूळ नाव वडपद्रका — वडांच्या झाडाजवळील वस्ती त्या नावाचा पुढे वडोदरा असा अपभ्रंश झाला त्यावरूनच आज वडोदरा किंवा बडोदा या नावाने हे शहर ओळखले जाते

**सयाजीराव गायकवाड–सुधारक व द्रष्टा राजा**

बडोदा म्हटले की आठवतात तेथील प्रजेसाठी अहर्निश झटलेले महाराज सयाजीराव गायकवाड नाशिक जिल्ह्यातील कवळाणे या खेडेगावात लहानपणी वाढलेले गोपाळराव हे बडोद्याच्या महाराणी जमनाबाई यांच्या नात्यातीलच गोपाळरावाच्या धीटपणाने प्रभावीत होऊन महाराणींनी त्यांना दत्तक घेतले व त्यांचे नाव सयाजीराव ठेवले वयाच्या १७ व्या वर्षी इ स १८८१ मध्ये ते गादीवर आले अशाप्रकारे लहानपणी गुरा-मागे धावणारा मुलगा बडोदा संस्थानाचा नरेश झाला तत्पूर्वी सयाजी-रावाचा तंजावरच्या राजकुमारीशी विवाह मोठ्या धुमधडाक्यात साजरा झाला तत्कालीन इंग्रज पत्रकारांनी त्या भव्य सोहळ्याचे मार्मिक वर्णन करून ठेवले आहे ६ जानेवारी १८८० ही त्यांच्या विवाहाची तारीख होती सकाळी काही महत्त्वाचे धार्मिक विधी झाले तर दुपारी साडे तीनला

नाझरबाग येथे उतरलेले वधूचे वडील आणि जवळचे नातलग राजवाड्यावर लग्नविधीचे आमंत्रण देण्यासाठी गेले सध्याकाळी लग्नाची शाही मिरवणूक निघाली मिरवणुकीत सजविलेले उमदे अरबी घोडे असून, त्यावर उंचेपुरे खास भालेकरी बसविले होते पण सर्वांचे लक्ष होते शृंगारलेल्या हत्तीवर सोन्याच्या अंबारीत आरूढ झालेल्या राजबिंड्या सयाजीरावावर !

सयाजीरावांचे आपल्या रयतेवर खूप प्रेम होते रयतेला भेटण्यासाठी ते थेट त्यांच्या झोपडीपर्यंत जात प्रजाहितदक्षतेसाठी ते तत्पर होते. त्यानी राज्यकारभार लोकांच्या गुजराथी भाषेत सुरू केला त्यासाठी देवनागरी लिपीत लिहिलेले टाईपरायटर खास तयार करून घेतले गुजराथी तांत्रिक शब्दासाठी डिक्शनरी बनवून घेतली स्वत चे शिक्षण कमी झाले असूनही त्याना शिक्षणाबद्दल आस्था वाटत होती त्यानी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले अगदी लहान खेडेगावात प्राथमिक शाळा व लायब्ररी स्थापन केली सर्वांच्याबरोबर हरिजन मुलानाही शाळेत शिकविले पाहिजे असा त्यानी कायदा केला अनेक हुशार विद्यार्थ्यांना त्यांनी शिष्यवृत्त्या देऊन प्रोत्साहन दिले डॉ आंबेडकर याना त्यानीच शिक्षणासाठी परदेशी पाठविले अनेक शास्त्रज्ञ, तज्ञ, कलावंत याना राजाश्रय दिला कायद्याने अस्पृश्यता बंद केली राज्यात नवे रेल्वेमार्ग टाकले बडोदा विद्यापीठ स्थापन केले पब्लिक लायब्ररी व म्युझियमची उभारणी केली असा हा लोकप्रिय सुधारक बडोदा नरेश इ स १९३९ साली अजरामर कीर्ती मागे ठेवून परलोकवासी झाला

**गायकवाड घराण्याचे स्मारक—कीर्तीमंदिर --**

बडोदा शहराच्या स्टेशन जवळ असलेल्या कीर्तीमंदिराच्या भेटीने शहर दर्शनाला सुरुवात झाली गायकवाड राजघराण्यातील पूर्वजांचे स्मारक म्हणून या कीर्तीमंदिराची उभारणी सयाजीराव गायकवाड यांनी केली इ स १९२६ साली कामास सुरुवात होऊन कीर्तीमंदिराचे उद्‌घाटन इ स १९३६ साली झाले एकूण खर्च साडेपाच लाख रुपये आला

पांढऱ्या शुभ्र दगडानी बांधलेल्या इंग्रजी *E* आकार असलेल्या या स्मारकात ५२ चौरसफुटाचा भव्य मध्यवर्ती सभामडप आहे सभामडपाला राजस्थान-मधील मकराना व इटालियन सगमरवराचे चार सुंदर स्तभ आहेत. तेथे सयाजीराव गायकवाड महाराजांचा अर्धपुतळा असून त्याची रोज पूजा होते सभामंडपाच्या वरच्या मजल्यावर प्रशस्त गॅलरी असून त्यास सगम-रवरी जाळीदार कठडा आहे प्रख्यात बगाली चित्रकार नदलाल घोष याची उत्कृष्ट भित्तीचित्रे ( *Mural painting* ) चारी बाजूच्या भितीवर आहेत त्यानी महाभारतातील कुरुक्षेत्राचे उत्कृष्ट चित्र काढले असून त्यातून अध धृतराष्ट्र व डोळयाला पट्टी लावलेल्या गांधारीचा बोलका भाव प्रतीत होतो तसेच गगावतार व कै रवीन्द्रनाथ टागोर याच्या नटीर पूजा या काव्याची सुदर चित्रे काढली आहेत राजस्थानी वेषातील साडीत पूजा करताना चित्रीत केलेल्या साध्वी मीराबाईचा चेहरा कृष्ण दर्शनासाठी आसुसलेला दिसतो कारण मीराबाईने म्हटलेच आहे –

> तुमहरे कारन सब कुछ छोडया !
> अब मोहि क्यु तरसावो ?

किर्तीमदिराच्या मध्यवर्ती सभामडपाच्या बाजूला दोन्ही मजल्या-वर छोटया छोटया सात खोल्या आहेत तेथे गायकवाड राजघराण्यातील राजदपतींचे सगमरवरी अर्धपुतळे आहेत कीर्तीमदिराचे शिखर मोठे आकर्षक आहे तेथे ब्रॉझच्या गोलावर सूर्य, चद्र, पृथ्वी दर्शवून जगाच्या नकाशात भारत देश दाखविला आहे यावरून असे सूचित करावयाचे आहे की, आकाशात जोपर्यन्त सूर्य, चद्र आहेत तोपर्यन्त गायकवाड घराण्याची कीर्ती सर्व जगात दरवळत राहील ! तसेच या स्मारकाच्या प्रवेशद्वारावर गायकवाड राजघराण्याचे गुण दर्शविणारे *Truth, Ambition, Morality, Fame* ( नीती, आकाक्षा, सत्य कीर्ती ) हे शब्द कोरले आहेत

सुदर बगीच्यातील हे स्मारक गायकवाड घराण्यातील कर्तृत्वाची आठवण करून देते विश्वामित्री नदीच्या काठावरील या स्मारकासमोरील

मुलायम हिरवळीवर बसलो व वाऱ्याच्या सौम्य झुळुकानी उत्तेजित झालो थोड्याच वेळात कीर्तीमंदिराचा निरोप घेतला

**रमणीय सयाजी बाग –**

कीर्तीमंदिराची भेट आटोपून तेथून केवळ अर्ध्या कि मी अंतरावर असलेल्या सयाजीबागेच्या विस्तीर्ण आवारात प्रवेश केला सयाजीबागेचे पूर्वीचे नाव कामठीबाग महाराजा सयाजीरावांनी शभर वर्षापूर्वी हा बगीचा स्थापन केला हल्ली बगीच्याची व्यवस्था बडोदा महानगरपालिका पहात आहे प्रवेशद्वारापाशी सयाजीराव महाराजाचा पुतळा आहे बगीच्यातील म्युझियम, पिक्चर गॅलरी व नव्याने बांधलेले प्लॅनिटोरियम पहायचे होते

प्रथम प्रवेश केला म्युझियममध्ये ! सयाजी महाराजानी स्वत इ स १८८७ मध्ये या म्युझियमची स्थापना केली, तर पिक्चर गॅलरीची स्थापना १९२१ मध्ये झाली या दोन्ही दुमजली इमारती खास आगळ्या शिल्पकृतीने उठून दिसतात चाळीसहजार चौरसफूट क्षेत्राच्या या दोन्ही इमारती एका पॅसेजने जोडल्या आहेत, आशिया खडातील हे एक चागले म्युझियम समजले जाते

प्रथम प्रवेश केला म्युझियमच्या मध्यवर्ती हॉलमध्ये ! बडोदा सस्थानच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनाची नोंद तेथे आढळते सयाजीरावांनी सस्थानाच्या उत्कर्षासाठी अनेक चांगल्या कृती केल्या लोकानीही कृतज्ञतेच्या भावनेने त्याच्या कारकीर्दीच्या हीरकमहोत्सवप्रसगी वर्गणी गोळा केली व कीर्तीमंदिराची चादीची चाळीस किलो वजनाची प्रतिकृती त्याना भेट दिली ती प्रतिकृती या म्युझियममध्ये काचेच्या पेटीत ठेवली आहे या चादीच्या मदिरावरील शिखरावर खरे रत्न झळकत होते बाजूला महाराजाना मिळालेल्या अनेक सनदा, कागदपत्रे आहेत त्यामध्ये १८७७ मध्ये इग्लडच्या व्हिक्टोरिया राणीने दिलेली खास लांबलचक पदवी उल्लेखनीय आहे महाराजांचा सेनापती नानासाहेब याचा खास पोषाख जुन्या भारदस्त-

पणाची कल्पना करून देत होता चारशे वर्षांपूर्वी उत्खननात सापडलेला लाकडी जैनमंडप त्यावरील बारीक कोरीव कामाने लक्ष वेधून घेत होता जैन तीर्थंकर नेमीनाथ याच्या विवाहाचा प्रसंग त्यावर कोरला आहे महात्मा गांधीच्या देहाचे भस्म विसर्जनापूर्वी ज्याच्यात ठेवले होते तो ताब्याचा कलश चांदीच्या चौरंगावर ठेवला आहे गेंड्याच्या कातड्या-वरील कोरीव कामाची फ्रेम तसेच पेटीही प्रेक्षणीय आहे आपण कुचेष्टेने गेंड्याच्या कातडीचा उल्लेख करतो पण त्याच गेंड्याच्या कातडीवरील अप्रतीम नक्षीकाम पाहून प्रथमच त्याबद्दल मत चांगले झाले शेजारी एका दालनात भारतीय विविध शैलीची चित्रे आहेत त्यातील सहा निरागस गोपिकाचे चित्र वैशिष्टयपूर्ण आहे मिरवत जाणाऱ्या या गोपिकांचे हे चित्र वस्त्रावर चित्रित केलेले असून १८ व्या शतकात किसनगड येथील कलावंतांनी तयार केले आहे

इजिप्शियन गॅलरीमध्ये तीन हजार वर्षांपूर्वीचे एक शव लाकडाच्या पेटीत ठेवले आहे ते पाहून चकित झालो त्याकाळी इजिप्तमध्ये मृत व्यक्तीची आतडी, हृदय काढून ते वेगळ्या ठिकाणी दफन करीत व बाकीचे शरीर मसाला भरून ठेवत असत या गॅलरीतील वैशिष्टयपूर्ण चित्र आहे—इजिप्तमधील एक लाख लोकांनी वीस वर्षे खपून बांधलेल्या पिरॅमिडचे !


पर्शियन आर्ट गॅलरीतील अठराव्या शतकातील भारी गालीचे उल्लेखनीय आहेत तसेच टाईल्सवर चित्रित केलेली लैला-मजनु या प्रेमी युगुलाची चित्रे लक्ष वेधून घेतात जपान, चीन, तिबेट इ गॅलरीमध्ये त्या त्या देशातील वैशिष्टयपूर्ण वस्तूंचा संग्रह आढळतो

दुसऱ्या मजल्यावर प्राणी विभागात विविध प्राणी, मासे भुसा भरून ठेवले आहेत त्यात महाराजांनी १९१४ मध्ये मारलेला व पचवीसशे रुपये किंमतीचा धिप्पाड वाघही आहे गीरच्या जंगलात नैसर्गिक स्थितीतील सिंहांचा रुबाब या म्युझियममधील भुसा भरलेल्या सिंहातही दिसत होता हा सर्व तेथे निर्माण केलेल्या खास वातावरणाचा प्रभाव [1]

प्लॅनिटोरियम बडोदा



कीर्ती मंदिर



सहा गोपिका, म्युझियम, बडोदा







रणछोडराय मंदिर, डाकोर

या म्युझियममधील पिक्चर गॅलरी तर खासच वैशिष्टचपूर्ण आहे विसाव्या शतकाच्या सुमारास परदेशात महाराजाच्या आवडीने इटालियन, स्पॅनिश, फ्रेंच, पोर्तुगीज, इग्लिश, रशियन, ऑस्ट्रीयन, बेल्जियम इ दुर्मिळ युरोपियन पेंटिग्ज गोळा केली होती पण पहिल्या महायुद्धामुळे ती भारतात आणता आली नाहीत ती तात्पुरती लडनला व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियममधे ठेवली होती नतर या म्युझियममध्ये ती खास युरोपियन पेंटिग्ज आणण्यात आली फ्रेंच कलाकार सोलेमन जोसेफ यानी गायकवाड महाराजाचे काढलेले चित्र वैशिष्टचपूर्ण आहे ज्या दिशेने आपण उभे राहू त्या दिशेला चित्रातील चेहरा वळलेला दिसतो म्हैसूर व जयपूर येथील म्युझियममध्ये या धर्तीची चित्रे पाहिली होती रशियन कलाकार निकोलस टोरीक याचे रामायणावरील चित्र तसेच महाराजांनी प्रदर्शनात स्वत पसत केलेले कांचनमृगा हे चित्र उल्लेखनीय आहे राफेलने काढलेली चित्रेही आकर्षक आहेत डच शैलीत काढलेले फिश, ब्रेड, सुरी व मद्याची बाटली इ समूहाचे चित्र लक्ष वेधून घेते या समूहाचे काचेच्या टिपॅायमध्ये पडलेले प्रतिबिबही चित्रकाराने मोठ्या कौशल्याने चित्रित केले आहे इग्लडचा राजा दुसरा चार्लस् याची राणी कॅथेरीन हिचे एक मोहक चित्र या गॅलरीत आहे कॅथेरीन ही मूळची पोर्तुगीज राजकन्या चार्लस्बरोबर तिच्या विवाह-प्रसगी मुबई बेट व ५०,००० पौंड पोर्तुगिजानी इग्रजराजाला आदण दिले। कॅथेरीन सम्राज्ञी झाल्यावर तिच्या मस्तकावर मुकूट ठेवण्यात आला

पिक्चर गॅलरीत भारतीय चित्रकार कनु देसाई, बेंद्रे याच्याही कलाकृती आहेत इटालियन, ग्रीक इ युरोपियन शिल्पकृती व पुतळे येथे आहेत त्यातील गादीवर झोपलेले निरागस चेहऱ्याचे बालक, शृगार करणारी युवती, पिळदार स्नायूचा कुस्तीगीर इ कलाकृती आकर्षक आहेत ही पिक्चर गॅलरी म्हणजे आतरराष्ट्रीय उत्कृष्ट चित्रे व पुतळे याचा अमूल्य खजानाच ! आपण एखादे परदेशी म्युझियम तर पहात नाही ना असा भास होतो

या म्युझियममध्ये तळघरात व्हेल विभाग आहे तेथे ७२ फूट

लाबीचा ब्ल्यू व्हेल ठेवलेला आहे १९४४ साली बडोद्यापासून २१ मैलांवर दाबका येथे माही नदीत हा प्रचंड व्हेल सापडला, त्याचे वजन तीस हत्तीइतके होते. हा प्रचंड व्हेल सापडल्यानंतर त्याचा काठावर काढलेला फोटोही तेथे होता त्यावरून त्याच्या प्रचंडपणाची साक्ष पटली भारतात एवढा मोठा सांगाडा अन्यत्र कोठेही नाही या विभागात चिंपांझी व मानव यांचेही सापळे आहेत मानवाची उत्क्रांती अवस्था दाखविली आहे मुलांसाठी खास विभाग नव्यानेच निर्माण केला आहे त्यात मुलांचे आवडते विविध विषय आहेत

म्युझियम व पिक्चर गॅलरी पाहून सयाजीपार्कमधील फुलांचे घड्याळ ( *Floral Clock* ) पहायला आलो एका छोट्याशा टेकडीवरील गोलाकार हिरवळीने विविध रंगी फुलांनी सजविलेले हे घड्याळ वैशिष्ट्यपूर्ण आहे वीस फूट व्यासाची डायल म्हणजे गोलाकार हिरवळच । ३, ६ ९ व १२ हे आकडे पांढऱ्या खड्यांनी तयार केले असून तास, मिनिट व सेकंद काटा आहे. घड्याळाचे यंत्र जमिनीखाली आहे या घड्याळावर रात्री उजेड पडावा म्हणून खास लाईटची व्यवस्था केली आहे सूर्याच्या आकाराच्या या आगळ्या घड्याळाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढण्याचा मोह आवरता आला नाही या पार्कमध्ये मुलांसाठी छोटी रेल्वे आहे केवळ दहा इंच रुंदीच्या रुळावरून धावणारी ही गाडी मुलांना सर्व बागेतून फेरफटका मारून आणते ही गाडी पाहिल्यावर पेशवेपार्कमधील फुलराणीची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही

सयाजीबागेतील प्राणीसंग्रहालयात फेरफटका मारण्यासाठी विश्वामित्री नदीवरील छोटा पूल ओलांडून जावे लागते गीरच्या जंगलातील जातिवंत सिंह तसेच वाघ, आफ्रिकन चिंपाझी व म्हशी इ विविध पशू व विविध पक्षीही तेथे आहेत सयाजीबागेची भेट तेथील भव्य प्लॅनिटोरियमच्या भेटीशिवाय पूर्ण होणार नव्हती या इमारतीचा आकार वैशिष्ट्यपूर्ण आहे बडोदा म्युनिसिपल कॉर्पोरेशनने बांधलेले हे प्लॅनिटोरियम केवळ भारतात नव्हे तर आशिया खंडात भव्य समजले जाते या प्लॅनिटोरियमचे उद्घाटन

अणुशक्ती विभागाचे प्रमुख डॉ सेठना यानी १९७६ साली केले प्रवेशद्वारीच सूर्याची सुदर प्रतिकृती आहे तेथील भेटीने चद्र, ग्रह, तारांगण मडळ, उत्तर ध्रुव याच्यावर जणू फेरफटका होतो.

सयाजीपार्कची भेट तेथील डेरेदार वृक्ष, सुदर कारजी, मखमली हिरवळ, उत्कृष्ट नैसगिक पार्श्वभूमी यामुळे अविस्मरणीय होती

एव्हाना दुपारचा दीड वाजला होता क्षुधाशातीसाठी स्टेशन-नजीकच्या हॉटेल गौरवच्या वातानुकुलीत डायनिंग हॉलमध्ये आलो गरम गरम फुलक्या, पुऱ्या, कढी, फरसाण इ गुजराती पद्धतीच्या चवदार जेवणाने तृप्त झालो परत रिटायरिंग रूमवर येऊन दोन तास विश्राती घेतली

**महाराज फत्तेसिह म्युझियम –**

सध्याकाळी साडेचारच्या सुमाराला रिक्षा करून महाराज फत्तेसिह म्युझियम पहाण्यासाठी निघालो हे म्युझियम लक्ष्मीविलास पॅलेसच्या विस्तीर्ण आवारात आहे सुरुवातीला महाराजाचे खाजगी रेस्टहाऊस असून त्यानतर म्युझियमची छोटी पण टुमदार इमारत आहे म्युझियमच्या डाव्या बाजूकडील पहिल्या दालनात मोठ्या उत्सुकतेने प्रवेश केला तेथे दृष्टीला पडतात बडोदा नरेश गायकवाड याच्या राजघराण्यातील स्त्री-पुरुषाची भव्य तैलचित्रे ! तत्कालीन भारदस्त कोच, टेबल इ किमती फर्निचरही तेथे आहे उजवीकडील दालनात इटालियन चित्रकार फेलिसी यानी चित्रित केलेली स्त्रियांची विविध आकर्षक चित्रे आहेत

या म्युझियममधील तिसरे दालन विख्यात भारतीय चित्रकार राजा रविवर्मा यानी काढलेल्या चित्रानी सजले आहे राजा रविवर्मा या महान चित्रकाराला राजा हा किताब ब्रिटिश सरकारकडून मिळाला त्याचा जन्म १८४८ मध्ये पूर्वीच्या त्रावणकोर सस्थानातील किलीमनूर येथे झाला रामायण–महाभारताचा अभ्यास त्यानी लहानपणा-पासूनच केला होता त्याच्या कुटुबातील सर्वच मुला-मुलीत चित्रे काढ-

ण्याची नैसर्गिक प्रवृत्ती होती या मुलानी सर्व वाडा रामायण-महाभारता-तील प्रसगानी चितारला होता रविवर्मा १४ वर्षांचे असताना त्रावणकोर महाराजाशी त्याची भेट झाली त्यानी त्यांचे चित्रकलाकौशल्य पाहून त्याना आश्रय दिला पुढे चित्रामुळेच महाराजाच्या थोरल्या भगिनीशी त्याची ओळख झाली व त्याचीच परिणती पुढे विवाहात झाली

राजा रविवर्मा प्रथम खडू व कोळसा यानी चित्रे काढीत नतर त्यानी जलरगात चित्रे काढण्याचा अभ्यास केला १८६८ मध्ये थियोडोर जॉन्सन हा पाश्चात्य चित्रकार त्रावणकोर महाराजांकडे आला त्याने राजघराण्यातल्या व्यक्तींची तैलरगात सुदर चित्रे काढली तोपर्यंत रवि-वर्मा यांना तैलरगाची कल्पना नव्हती ही चित्रे पाहून त्याना नवा साक्षात्कार झाला मात्र जॉन्सनने त्याना कसलेही मार्गदर्शन केले नाही पण म्हणून काय झाले ? रविवर्मा यांनी एकलव्यासारखा अभ्यास केला जॉन्सनने रगवलेल्या तसबिरी पुढे ठेवून त्याच्या नकला करण्याचा प्रयत्न केला हळूहळू तैलरगचित्रात त्यानी प्रावीण्य मिळविले तैलरग आत्मसात केल्या-वर त्यानी अनेक चित्रे काढली व ती अनेक ठिकाणी प्रदर्शनात पाठवली परदेशातही पाठवली त्याना अनेक सुवर्णपदके मिळाली 'शकुतला पत्र-लेखन' हे त्याचे चित्र ड्यूक ऑफ बकिंगहॅम यानी विकत घेतले या चित्राचा असा गौरव झाल्यावर सस्कृत महाकाव्यातल्या वेगवेगळ्या प्रस-गाची चित्रे काढण्याकडे त्याची प्रवृत्ती झाली

त्रावणकोरच्या महाराजांच्या बधूच्या विनतीवरून रविवर्मा यानी सीतेचे दिव्य हे चित्र काढले ते राजा सर टी माधवराव यानी बडोद्याच्या महाराजासाठी विकत घेतले १८८१ मध्ये बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यानी रविवर्मा याना बडोद्याला बोलावून घेतले त्याच्याकडून राजघराण्यातल्या मडळींची चित्रे तसेच अनेक पौराणिक प्रसगावरील चित्रे महाराजानी काढून घेतली महाराजानी आपला लक्ष्मीविलास राज-वाडा त्या चित्रांनी सुशोभित केला भावनगरच्या महाराजांनीही रविवर्मा

याना त्याच कामासाठी बोलावून घेतले आपली चित्रे सर्वसामान्य लोकांनाही उपलब्ध व्हावीत म्हणून त्यानी १८९४ मध्ये रंगीत चित्रे छापण्याचा छापखाना मुंबई जवळ मळवली येथे काढला या उपक्रमाला कमालीचे यश लाभून रविवर्मा याची लाखो पौराणिक चित्रे काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत खपली घराघरातून त्याची चित्रे लावली गेली रविवर्मा यांनी सुमारे ४०० ते ५०० चित्रे काढली असे म्हटले जाते त्यांचा मृत्यू १९१६ मध्ये झाला

या म्युझियममधील रविवर्मा याची भव्य चित्रे असलेले दालन म्हणजे नयनांना मेजवानीच ! विश्वामित्र – मेनका, कमलपत्रावर लिहिणारी पत्रलेखिका शकुंतला, अनुसया, प्रियंवदा, शतनु – मत्स्यगधा, कुंजवनात कृष्णाची वाट पहाणारी राधा, सिंहाला मारणारा भरत, सन्यास वेषधारी अर्जुन-सुभद्रा, नल-दमयती, निद्रिस्त उर्वशी, राधा-माधव, गगा-शतनु इ अनेक चित्रे पहाताना खरोखर देहभान हरपते रविवर्मा यानी शकुंतलेच्या चेहऱ्यावरील मीलनोत्सुक भाव, श्रीकृष्णाची वाट पाहताना आसुसलेल्या राधेच्या चेहऱ्यावरील उत्सुकता, निद्रिस्त उर्वशीच्या मोहक चेहऱ्यावरील शातभाव आपल्या कुंचल्याने सजीव केले आहेत इतकी वर्षे होऊन गेली तरी ही चित्रे ताजी टवटवीत वाटतात कुठल्याही चित्राचा रंग विटलेला नाही


रविवर्मा यांच्या चित्रातील नायिकेची वेशभूषा हमखास महाराष्ट्रीयन दिसते कारण ते म्हणत, " सर्व भारतभर मी हिंडलो सर्व प्रातातील पेहराव पाहिले पण महाराष्ट्रीयन पोषाखासारखा चित्रणयोग्य पेहराव मला आढळला नाही नऊवारी साडीमुळे स्त्रियांचे लावण्य व लज्जा या दोहोंनाही उठाव मिळतो तिचे अगप्रत्यग खुलते " या दालनामध्ये रविवर्मा यानी काढलेली गायकवाड घराण्यातील स्त्री-पुरुषांची चित्रेही उत्कृष्ट आहेत

दुसऱ्या एका दालनात विविध संगमरवरी पुतळे आहेत रोममधील व्हॅटीकन म्युझियममधे अशा प्रकारचे अनेक पुतळे आहेत अशी तेथे माहिती

मिळाली आणखी एका दालनात इटालियन चित्रकाराने काढलेली पाश्चात्य देशातील निसर्गचित्रे आहेत थेम्स नदी, विंडसर किल्ला, स्वित्झर्लंडमधील खेडेगावाचे दृश्य इ सुंदर चित्रे तेथे आहेत म्युझियमच्या वरच्या मजल्यावरील दालनात जपानी तसेच चिनी मातीचे मोठमोठे नक्षीदार पॉट आहेत शेजारच्या दालनात महाराज जेव्हा पॅरीस-मध्ये वास्तव्य करीत तेव्हा ते वापरत असलेले उची फर्निचर ठेवले आहे, तेथील भव्य झुबरही आकर्षक आहे

एक दिवसाची बडोद्याची भेट आटोपत आली होती पॅलेस रोड-वरील खंडेराव मार्केट बिल्डींगमध्ये चक्कर टाकली तेथे सुदर बाजार भरतो तेथून नजीकच न्यायमदिराची भव्य वास्तू लक्ष वेधून घेते या इमारतीत पाश्चात्य व पौर्वात्य स्थापत्यकलेचा सुरेख सगम झाला आहे सस्थानकाळात हायकोर्ट असलेल्या राजेशाही थाटाच्या या वास्तूत सध्या विविध न्यायालये असतात अधार पडू लागला होता तेव्हा आम्ही सुर-सागर या बडोद्याच्या मध्यवर्ती तळ्याजवळ विसावलो होतो या सुदर तळ्यात अनेकजण बोटींग करीत होते तळ्याचा काठ आइस्क्रीम, भेळ, पाणीपुरी, फळे इ च्या गाड्यांनी नुसता फुलला होता मुलांनी पकोडे खाणे पसत केले दांडिया बाजारच्या रस्त्याने परतून स्टेशनवर रिटायरींग रूममध्ये मुक्कामाला आलो सयाजीरावांच्या महान कर्तृत्वाची साक्ष बडोदा शहराच्या भटीने पटली होती

◆ ◆



## रणछोडरायचे डाकोर

भगवान श्रीकृष्णाचे दुसरे नाव रणछोडराय! नावावरून वाटते की हा रणातून पळून केव्हा आला होता? पण तसे नाही डाकोरला कृष्णभक्त बोडाणा याने जगदीश्वर कृष्णाला द्वारकेचे रण–वाळवट सोडायला लावून इथे आणले म्हणून हा रणछोडराय! आपल्याकडे पढरपूरला पुडलिकाच्या भेटी परब्रह्म आले तर डाकोरला भक्त बोडाणाने जगदीश्वरला आणले

डाकोर हे पवित्र तीर्थस्थान बडोद्यापासुन आनदमार्गे ६५ कि. मी अतरावर आहे बडोदा स्टेशननजीकच एस टी चा स्टँड आहे स्टँडचा भव्यपणा पाहून मनात विचार येऊन गेला की बसची व्यवस्था चागली असेल पण पूर्ण भ्रमनिरास झाला स्टँडवर निरनिराळ्या गावासाठी बसेस येत होत्या निघत होत्या गर्दी तुफान होती रांगेचा मुळीच पत्ता नव्हता स्त्री-पुरुष धक्काबुक्की करीत उभे होते एस् टी उभी राहताच माणसाचा लोढा एकदम आत घुसू पहात होता गुळाच्या ढेपेवर असख्य माशा बसाव्यात तसे ते दृश्य दिसत होते लहान मुलाचे, वृद्धांचे हाल पाहवत नव्हते पोलीस मात्र मजा पहात उभे होते सकाळी नऊला आम्ही

स्टँडवर आलो होतो पण एस् टी त एकदम घुसण्याइतकी तयारी नसल्याने दोन गाड्या गर्दीमुळे सोडून द्याव्या लागल्या, शेवटी विचार केला की तसेच जर उभे राहिलो तर सध्याकाळपर्यंत येथेच थाबावे लागेल शेवटी अकरा वाजता आलेल्या बसमध्ये धक्काबुक्की करीत जिकू किंवा मरू या आवेशात अक्षरश घुसलो डाकोर स्टँडवर पोहोचलो तेव्हा दुपारचा एक वाजला होता

प्राचीन काळी या गावातील गोमती तलावाच्या काठी श्री डकऋषी यांचा आश्रम होता त्याच्या प्रदीर्घ तपश्चर्येने भगवान शंकरानी प्रसन्न होऊन तेथे लिगरूपाने वास्तव्य करण्याचे मान्य केले त्यानतर डकेश्वर महादेवाची स्थापना तेथे झाली पूर्वीच्या डकक्षेत्र नावाचा डकपुरी, डकपूर असा अपभ्र श होऊन सध्याचे डाकोर हे नाव रूढ झाले

येथील गोमती या तलावाच्या उत्पत्तीमागे पौराणिक कथाभाग आहे तो असा–प्राचीन काळी या भागात हिडिबावन नावाचे दाट जगल होते भीम व भगवान श्रीकृष्ण हस्तिनापूरहून द्वारकेला या भागातून मार्गक्रमण करीत असताना भीमाला खूप तहान लागली डाकोर येथील त्यावेळच्या या छोट्या कुडातील पाणी प्राशन करून भीम तृप्त झाला भीमाला वाटले की या छोट्या कुडाचे मोठ्या जलाशयात रूपातर केले तर अनेक प्रवाशाची तहान भागेल म्हणून त्याने या कुडस्थानी गदाप्रहार केला व हा मोठा तलाव निर्माण केला भीमाने केलेल्या गदाप्रहाराच्या आवाजाने कुडस्थानी बसलेल्या डकऋषीचा समाधीभंग झाला त्यानी डोळे उघडून पाहिले तर समोर साक्षात भगवान श्रीकृष्ण व भीम उभे ! मुनीनी भगवताना प्रणाम केला भगवान श्रीकृष्णाला मुनीचे श्रेष्ठत्व माहीत होते त्यानी मुनीना वर मागण्यास सागितले तेव्हा डकमुनीनी भगवान कृष्णाला प्रार्थना केली की श्रीकृष्णाने तेथील आश्रमात वास्तव्य करावे श्रीकृष्णानी आपले अवतारकार्य सपल्यावर तेथे वास्तव्य करण्याबद्दल आश्वासन दिले प्रसिद्ध कृष्णभक्त बोडाणा याच्या भक्तीने प्रसन्न होऊन भगवान श्रीकृष्णाने डकमुनीना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली

कहाणी कृष्णभक्त बोडाणाची –

क्षत्रिय कुळात जन्म झालेला विजयसिंह बोडाणा लहानपणापासूनच चिंतनशील व विरक्त होता संन्यास घेऊन त्याने निघून जाऊ नये म्हणून त्याच्या आई–वडिलानी लहानपणीच त्याचा गगा नावाच्या मुलीशी विवाह लावून दिला द्वारकेला जाणाऱ्या यात्रेकरूबरोबर एकदा बोडाणा द्वारकेला जाऊन आला त्याचे मन द्वारकाधीशावर इतके जडले की दर सहा महिन्यांनी तो नियमितपणे द्वारकेची यात्रा करू लागला वयाच्या ७२ वर्षापर्यंत डाकोर ते द्वारका ही अडीचशे मैल अतराची त्याची वारी नियमितपणे अखड चालली होती अखेर वार्धक्यामुळे बोडाणाचे शरीर थकले पण प्रभूदर्शनाची आस मात्र मनात कायम होती शेवटी भगवान कृष्ण प्रसन्न झाले व त्याला दर्शन देऊन म्हणाले, ' तुला आता फार कष्ट पडतात तेव्हा मीच तुझ्या डाकोरला येऊन वास्तव्य करतो तू गावी जाऊन एक बैलगाडी घेऊन ये तिच्यात बसून आपण तुझ्या गावी जाऊ " निष्कांचन बोडाणाला कोणी गाडी दिली नाही शेवटी त्याने घरदार विकून गाडी घेतली व परत द्वारकेला गेला मदिराच्या पुजाऱ्यांनी परत का आलास म्हणून विचारल्यावर रणछोड-रायला डाकोरला नेण्याकरिता मी ही गाडी आणली असे त्याने सरळ सागितले त्या रात्री सावधगिरीचा उपाय म्हणून पुजाऱ्यानी मदिराला कुलूपे लावून कडेकोट बदोबस्त केला मध्यरात्री मदिराची दारे उघडून भगवान श्रीकृष्ण बोडाणासह बैलगाडीतून डाकोरला गेले थकलेल्या बोडाणाला झोप मिळावी म्हणून द्वारकाधीशानी स्वत बैलगाडी चालवली ! सकाळच्या प्रहरीं ते डाकोरला पोहोचले बोडाणाची मनोकामना पूर्ण झाली. तो दिवस विक्रम सवत् १२१२ चा कार्तिक पौर्णिमेचा होता सर्व डाकोर गाव आनदीत झाले

मदिरात मूर्ती नाही हे पाहून द्वारकेतील पुजारी हवालदिल झाले त्याना बोडाणाचा सशय आला ते त्वरेने डाकोरला आले गोमती तीर्थात मूर्ती लपवून बोडाणा पुजाऱ्यांना सामोरा गेला सतापलेल्या पुजाऱ्यांनी केलेल्या बाणांच्या वर्षावाने बोडाणा गतप्राण झाला. गोमती तीर्थाचे पाणी

लाल झाले मूर्ती परत मिळविण्यासाठी पुजारी तेथेच ठिय्या देऊन बसले शेवटी भगवतांनी बोडाणाची धर्मपत्नी गगाबाई हिला दृष्टात देऊन सुचवले की द्वारकेचे पुजारी द्रव्याचे लोभी आहेत त्यांना मूर्तीच्या वजना-इतके भारभार सोने देण्याचे कबूल केले की ते खूष होऊन परत जातील निष्काचन गगाबाईजवळ एवढे सोने कुठले आले ? कानातील बाळी एवढा एकच अलकार तिच्याजवळ होता पण तो जेव्हा तोलला गेला तेव्हा भगव-ताच्या कृपेने त्या अलकाराचे वजन मूर्तीच्या वजनापेक्षा अधिक भरले ! द्वारकेचे पुजारी निमूटपणे परतले !

कृष्णभक्त बोडाणाने आणलेल्या द्वारकाधीशाच्या मूर्तीची अनेक स्थानातरे होऊन शेवटी सध्याच्या मदिरात तिची प्रतिष्ठापना करण्यात आली इ स १७७१ मध्ये पेशव्याचा अमल गुजरातमध्ये असताना सातारचे श्री गोपाल जगन्नाथ ताबवेकर यानी रणछोडरायचे सुशोभित मदिर बाधून पूर्ण केले मंदिराच्या खर्चाच्या व्यवस्थेसाठी डाकोरशिवाय जवळचे नडीयाद तालुक्यातील एक गाव सयाजीराव गायकवाड यानी इनाम दिले

डाकोरच्या स्टॅंडजवळ उतरताच प्रथम यात्राकर वसूल केला गेला मदिर गावापासून साधारण पाऊण कि मी अतरावर आहे टाग्यातून मदिराजवळ पोहोचलो मदिर उघडण्याच्या ठराविक वेळा असतात मदिर उघडायला अवकाश होता म्हणून प्रथम मदिरासमोरील गोमती तलावाजवळ आलो तलावाच्या काठी बाधलेल्या घाटाच्या पायऱ्याजवळ हिंदू भाविक स्त्री-पुरुषाची स्नान करण्यासाठी गर्दी दिसत होती तलावातील पाणी अगदी अस्वच्छ होते पाण्यात पुष्ट कासवेही खूप होती छोटयाशा अरुद पुलाने जाऊन तलावाच्या छोटया बेटावरील दत्ताचे व हनुमानाचे तसेच रणछोड-रायाच्या उमटलेल्या पादुकांचे दर्शन घेतले बाजूला एका खोलीत ज्या तराजूत मूर्तीचे वजन केले ती खोली दाखवतात बोडाणा आणि त्याची धर्मपत्नी गगाबाई याच्या मूर्ती जवळ स्थापन केल्या आहेत जवळच असलेल्या डकेश्वर महादेवाच्या मदिराचे दर्शन घेऊन रणछोडरायच्या मंदिरात प्रवेश केला

रणछोडराय मदिराच्या प्रवेशद्वाराजवळ प्रथम दोन अष्टकोनी

दीपस्तभ दृष्टीला पडले मदिराच्या पायऱ्या चढून वर गेलो गाभाऱ्याचा दरवाजा बंद होता दर्शनोत्सुक स्त्रीपुरुष दाटीवाटीने उभे होते अनेकजण कृष्णभक्तीपर गाणी म्हणत होते मदिराचा चादीचा दरवाजा नक्षीदार असून त्यावर कृष्णजीवनातील कालियामर्दन, वसुदेव कृष्णाला नदीपार नेतो, राधाकृष्ण इ प्रसग कोरलेले होते घुमटाकार छतही चांदीचे होते बाजूच्या भिंतीवरही कृष्णचरित्रातील कालियामर्दन, पुतनावध, रासक्रीडा इ. प्रसगाची चित्रे काढलेली आहेत सध्याकाळचे सहा वाजले होते दरवाजा उघडण्याची वेळ झाली चौघडा वाजू लागला, दिवे प्रज्वलित केले गेले भक्ताची उत्सुकता शिगेला पोहोचली अखेर तो क्षण आला गाभाऱ्याच. दरवाजा उघडला गेला रणछोडरायच्या सावळ्या, प्रसन्न, सस्मित मुद्रेच्या मूर्तीचे दर्शन झाले सर्वांनी रणछोडरायच्या नावाचा एकच जयघोष केला भगवतांची मूर्ती काळ्या पाषाणाची सुमारे साडेतीन फूट उंचीची आहे सुंदर चेहेऱ्यावर सात्त्विक भाव आहेत सोन्याच्या महिरपीतील भगवान कृष्णाच्या या मूर्तीमागे चांदीचा रथ आहे भगवानाचे दर्शन अधिक जवळून होण्यासाठी मागील खोलीतून थेट गाभाऱ्यात जाता येते पुजाऱ्यानी सव्वा रुपया देणगी लिहून घेतल्यावर तेथून प्रवेश केला भगवताचे अगदी जवळून दर्शन झाले व समाधान वाटले

या मदिराचे भव्य आवार पूर्वपश्चिम १६८ फूट व दक्षिणोत्तर दीडशे फूट असून प्रदक्षिणामार्ग प्रशस्त आहे मदिर पश्चिमाभिमुख असून उत्तरेच्या बाजूला रसोईघर आहे तेथून भोग-नैवेद्य तयार केला जातो मदिराचा कलश ऐंशी फूट उचीचा असून सुवर्णमडित आहे शुभ्रधवल रगाच्या मुख्य शिखरावरील ध्वजस्तभावर डौलदार रेशमी ध्वज फडकत होता मदिराला आठ घुमट व चोवीस शिखरे आहेत

**श्रीशारदाम्बर मदिर—**

डाकोरच्या भेटीत साऱ्या भारतवर्षात अजोड असे येथील शारदाम्बर मदिर पहाण्यास गेलो द्वारकेचे श्रीमद् जगद्गुरु शकराचार्य श्रीसच्चितानंद तीर्थस्वामी यांच्या प्रेरणेने हे मदिर १९७० मध्ये उभारले गेले या मदिराचे

वैशिष्ट्य म्हणजे श्रीयंत्राच्या नियमावरहुकूम उभारले गेलेले हे एकमेव मंदिर आहे श्रीयंत्राचे भूपृष्ठ, कूर्मपृष्ठ व मेरुपृष्ठ हे तीन प्रकार असून शारदांबर मंदिर हे मेरुपृष्ठाच्या प्रकाराचे आहे मंदिराचे प्रवेशद्वार म्हणजे द्वारकाधीशाच्या मूळ महाद्वाराची प्रतिकृती असून आत द्वारकाधीशाची मूर्ती आहे प्रवेश केल्यावर डावीकडे जगद्गुरूंचे सिंहासन आहे सभामंडपाच्या भिंतीवर भारतीय संस्कृती प्रतीत होणारी विशिष्ट सूत्रे आहेत सभामंडपातून आत गेल्यावर श्रीयंत्राच्या नियमानुसार कमलदलाचे हे मंदिर सात पायऱ्यांच्या पृष्ठावर उभे असलेले दिसते शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ती, असंसक्ती, पदार्थभाविनी, तूर्यगा या सात पायऱ्या मनाने चढून जाव्यात असा प्रयत्न असतो त्यांचे स्मरण करून देण्यासाठी या सात पायऱ्यांवर त्या त्या अवस्थांची नावे लिहिली आहेत प्रमुख मंदिरात श्रीशारदाम्बेची भव्य व सात्त्विक मूर्ती आहे उजव्या बाजूला आदिशंकराचार्यांची तर उजव्या बाजूला भगवान दत्तात्रयाची मूर्ती आहे मंदिराचा चौथरा श्रीयंत्राच्या आकाराचा आहे मंदिराची प्रत्यक्ष बांधणी कमलदलांची आहे मंदिराच्या पायऱ्यांच्या बाजूला दोन पोकळ हत्ती आहेत मंदिराखाली ध्यानगुंफा आहे तेथे एका हत्तीतून जायचे व दर्शन घेऊन दुसऱ्या हत्तीच्या पोटातून बाहेर यायचे ध्यानगुंफेत आदिशंकराचार्य, नवग्रह, लक्ष्मीनारायण यांच्या मूर्ती आहेत विशिष्ट रचनेत बसवले या आरशांमुळे पंचमुखी पशुपतीनाथ व श्रीलक्ष्मी यांचे सहस्रस्वरूप दर्शन होते श्रीशारदाम्बा-मंदिरात प्रदक्षिणा घालताना श्रीयंत्राची कल्पना आली तसेच कलासौंदर्याचा साक्षात्कार झाला

डाकोरची भेट संपली होती रणछोडराय मंदिरासमोरील फोटो, भांडी, माळा, प्रसाद यांच्या असंख्य दुकानांत असलेल्या गर्दीतून वाट काढीत स्टँडवर परतलो रात्रीचे आठ वाजले होते आनंदमार्ग बडोद्याला जाणाऱ्या गाडीत धक्काबुक्की करीत मोठ्या कौशल्याने प्रवेश केला बडोद्याला मुक्कामाला पोहोचलो तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते दुसऱ्या दिवशी सकाळी नऊला गुजरात क्वीनने अहमदाबादला जायचे होते दिवसभराच्या प्रवासाने शिणल्याने निद्राधीन केव्हा झालो हे कळले नाही ✦ ✦



## मशिदी, मीनार, गिरण्यांचे गाव—अहमदाबाद

सकाळी नऊ वाजता गुजरात क्वीनने बडोदा स्टेशन सोडले पाऊण तासात आनंद जंक्शन आले तेथील प्रख्यात डेअरी पहाण्याचा विचार वेळ नसल्याने सोडून दिला साडेदहाच्या सुमारास अहमदाबादच्या भव्य स्टेशनमध्ये प्रवेश केला दुसऱ्या मजल्यावरील प्रशस्त रिटायरिंग रूम मिळाल्याने त्रास मिटला

आजच्या अहमदाबाद गावाचा इतिहास अकराव्या शतकापासून सुरू होतो त्यावेळी साबरमती नदीकाठचे हे गाव आशाभिल्ल राजाच्या कारकीर्दीत आशावल, असपल्ली नावाने ओळखले जाई त्याच्यावर विजय मिळवल्यावर कर्णसोळखी राजाने 'कर्णावती' हे नाव ठेवले तेराव्या शतकात गुजरात मुसलमानाच्या आक्रमणाच्या तावडीत सापडले गजरातचा सुलतान अहमदशाह हा आजच्या अहमदाबादचा निर्माता ! इ स १४११ मध्ये तो नव्या राजधानीच्या शोधात होता साबरमती नदीच्या काठी मुक्काम असताना एक हरीण कुत्र्यावर हल्ला करताना त्याने पाहिले ज्या भूमीत व हवेत असे धाडसी हरीण निर्माण होते तेथेच राजधानी वसविण्याचा त्याने पक्का निर्णय घेतला त्यावेळी कर्णावती या

जुन्या नावाने ओळखले जाणारे हे गाव अहमदाबाद या नावाने ओळखले जाऊ लागले

गुजरातच्या सुलतानाने व्यापारी, विणकर इ हरहुन्नरी कारागीरांना दिलेल्या उत्तेजनामुळे अहमदाबाद हे एक मोठे व्यापारी व प्रचड सपत्तीची उलाढाल करणारे केंद्र बनले सुल्तानाच्या कारकीर्दीचा अस्त झाल्यावर मोगलसम्राट अकबराने गुजरात पादाक्रांत केला व त्याच्या स्मरणार्थ फत्तेपूर शिक्री येथे बुलद दरवाजा उभारला सुदर इमारती व उद्याने यामुळे जहागीर व शहाजहान याना अहमदाबाद फार प्रिय होते नूरजहान व मुमताजमहल याच्यासह अनेक वर्षे त्यानी येथे सुखोपभोग घेतले मोगल काळात सुलतान जाऊन सुभेदार आले अहमदाबादची भरभराट चालूच होती १६ व्या शतकात हे शहर भारतातील एक सुदर शहर गणले जात होते मोगलकाळात १६१८ मध्ये सर थॉमस रो ह्या पहिल्या ब्रिटिश राजदूताने अहमदाबादला भेट दिली त्याने लिहून ठेवले आहे की—अहमदाबाद हे शहर लडनइतके भव्य आहे ' मुस्लीम इतिहासकार अबुल फजल यान ऐने अकबरीत लिहून ठेवले आहे की—अहमदाबाद हे भरभराटीला आलेले उच्च प्रतीचे शहर आहे

मोगल अमलानतर पेशव्यांच्या काळात बडोद्याच्या गायकवाडांनी १७८१ मध्ये अहमदाबादवर स्वारी केली व अहमदाबाद मराठी साम्राज्या खाली आणले त्यानतर १८१७ मध्ये इग्रजानी अहमदाबादवर कबजा घेतला येथील कापड व्यवसायाला (*Textile*) पुनश्च भरभराटीचा काळ आला यांत्रिकीकरणाची मुहूर्तमेढ होऊन पहिली कापडगिरणी १८८१ मध्ये सुरू झाली आज अहमदाबादमध्ये सुमारे १०० कापडगिरण्या आहेत देशाच्या उत्पादनाच्या २५ टक्के कापडाचे उत्पादन येथून होते भारतातील एक अतिशय प्रगत, औद्योगिक केंद्र असलेले अहमदाबाद शहर भारताचे ' मँचेस्टर ' म्हणून ओळखले जाते ते उगीच नाही बीस लाख लोकवस्तीचे अहमदाबाद आज भारतातील सहाव्या क्रमाकाचे शहर आहे त्यातील सुमारे दोन लाख लोक गिरणी कामगार आहेत

साबरमती नदीचा पूर्व भाग म्हणजे जुने अहमदाबाद तर पश्चिम

भाग नवे अहमदाबाद होय रीलीफ रोड या जुन्या नावाने प्रसिद्ध असलेला बाजारचा रस्ता स्टेशनपासून ते लाल दरवाजा या अहमदाबादच्या मध्यवर्ती बसस्टँडपर्यंत जातो स्टेशन ते लाल दरवाजा हे अंतर साधारण तीन कि मी आहे बस, रिक्षा यांची वाहतूक सारखी चालूच असते लाल दरवाजाचा स्टँड साबरमती नदीच्या काठीच आहे पूल ओलांडला की नव्या अहमदाबादचा भाग सुरू होतो लाल दरवाजा हा जणू अहमदाबादचा आत्मा! येथून सगळ्या दिशांना बसेस जातात

रिटायरिंग रूममध्ये सामानाची व्यवस्था लावल्यावर रीलीफ रोडने चालत चालत जाण्याचा विचार अमलात आणला म्हटले चालल्याशिवाय गावाची कल्पना नीट येणार नाही अहमदाबादचा हा बाजारपेठेचा रस्ता खूप गजबजलेला होता गर्दीच्यामानाने रस्त्याची रुंदी कमी पडत होती वाटेतील हॉटेल चेतना या तीन मजली हॉटेलच्या भव्य डायनिंगहॉलमध्ये जेवणासाठी प्रवेश केला येथेही जेवणाची वेळ असल्याने तुफान गर्दी होती नशीब की लोक रांगेने उभे होते आमचा नंबर आल्यावर हायसे वाटले गुजराती पद्धतीच्या जेवणातील कढी, खमण ढोकळे, गरमागरम पुरी, फुलक्या, चवदार भाज्या, दूधपाक व पापड यावर सर्वांनीच ताव मारला जशी इडली व मसाला डोसा खावा तो दक्षिण भारतात तसा ढोकळा खावा तो गुजरातमध्ये! घरी भाज्या न खाणारा उदय आवडीने भाज्या मागून खात होता एवढ्या स्वादिष्ट जेवणाचा दर फक्त सहा रु पर्यंन्त असल्याने खूष झालो

जेवण आटोपून लाल दरवाजाला पोहोचलो तेथून दररोज सकाळी व दुपारी अहमदाबाद दर्शनासाठी प्रवाशांकरिता खास बसेस निघतात प्रवाशांच्या गर्दीमुळे पुढील दोन्ही दिवसाचे बुकींग झालेले असल्याने बसचा नाद सोडला बसऐवजी रिक्षाने शहर पहायचे ठरविले भरपूर जेवणामुळे विश्रांतीची गरज वाटत होती रिक्षाने पधरा मिनिटात रिटायरिंग रूममध्ये विश्रांतीसाठी परतलो

**बालवाटिका, प्राणीसंग्रहालय व कांकरिया तलाव–**

दुपारी चारच्या सुमाराला अहमदाबादची प्रसिद्ध बालवाटिका, प्राणीसंग्रहालय, कांकरिया तलाव पहाण्यास निघालो प्रथम बालवाटिकेजवळ

रिक्षाने आलो वरील तीनही ठिकाणे जवळ असल्याने रिक्षा थांबवून धरण्याची गरज नव्हती रिक्षाचे बिल देऊन वाटिकेत प्रवेश केला

प्रसिद्ध कांकरिया तलावाच्या बाजूला एका छोटया टेकडीवर ही बालवाटिका आहे डिसेंबर १९५६ मध्ये मुलांच्या मनोरंजनासाठी ती निर्माण केली सुरुवातीलाच उर्दू कवी इकबाल यांच्या ' सारे जहाँसे अच्छा हिंदोस्तां हमारा ' हे काव्य कोरलेला फलक दिसतो नंतर दिसते उथळ पाणी असलेल्या छोटया जलाशयात बांधलेली बोटीच्या आकाराची छोटीशी आकर्षक इमारत ! या स्टीमरमध्ये प्रवेश केल्यावर विविध प्राण्यांचे लावलेले आकर्षक फोटो दिसतात बाहेर बाजूला नंतर दिसतो नक्षीदार कडया असलेला विराट हिंदोळा त्याला आहेत उच्च प्रतीचे कोरीव काम केलेली दोन लाकडी प्रवेशद्वारे ! पुढे एका छोटया पॅव्हेलियनमध्ये बाल पुस्तकालय आहे त्यात विविध तिकीट संग्रह, देशीविदेशी बाहुल्या, रंगीबेरंगी फुलपाखरे, तसेच रवीन्द्रनाथ टागोर, पं नेहरू, म गांधी यांचे मुलांबरोबरचे फोटो आहेत पुस्तकांची कपाटे दिसली तथापि पुस्तके वाचणारी मुले मात्र दिसली नाहीत !

या बालवाटिकेत लहान मुलांसाठी असलेली बकरीची व हरणाची गाडी वैशिष्टयपूर्ण आहे छोटी छोटी निरागस गोंडस मुले डौलदार गाडीत ऐटीत बसलेली पाहून मजा वाटली बालवाटिकेत निरनिराळे वृक्ष आहेत तसेच विविध प्रकारचे निवडुंगही आहेत एका स्वतंत्र पॅव्हेलियनमध्ये बाल-वाटिकेला भेट दिलेल्या मान्यवर व्यक्तींचे फोटो दिसले तेथील अंतर्गोल व बहिर्गोल अशा विविध आरशामध्ये दिसणारी मजेदार प्रतिबिंबे पाहून हसता हसता पुरेवाट झाली

बालवाटिकेत एक खुले चित्रगृह आहे तेथे बालकांसाठी माहितीपर बालचित्रपट दाखविले जातात बालवाटिकेच्या रम्य हिरवळीवर उभे राहिल्यावर समोरील कांकरिया तलावाचे विहंगम दृश्य दिसत होते उल्का–उदयला ही बालवाटिकेची भेट खूपच आवडली ते खूपच रमले होते

आइस्क्रीमचा आस्वाद घेऊन बालवाटिकेचा निरोप घेतला व रस्ता पार करून समोर प्राणीसग्रहालयात आलो

अहमदाबादचे प्राणीसग्रहालय खरोखरच वैशिष्टचपूर्ण आहे पशु-विभागात विविध प्रकारचे वाघ, चित्ते, गीरचे जातिवत्त सिंह, अस्वल इ प्राणी आहेत तर पक्षीविभागात हस, बगळे, करकोचे, मोर, पोपट, बदके, गरुड, ससाणे इ चित्रविचित्र पक्षी । पेलीकन, पेंग्विन इ पाश्चिमात्य पक्षीही तेथे आहेत तेथे मत्स्यालयही आहे या प्राणीसग्रहालयातील निर-निराळे पशुपक्षी मरगळलेले न वाटता जातिवत व तजेलदार वाटतात त्यामुळे तेथील भेट कटाळवाणी वाटली नाही प्राणीसग्रहालय पाहून रस्ता पार करून समोरील कांकरिया तलावाच्या काठी आलो

अहमदाबादच्या या विशाल कांकरिया तलावाचे पूर्वीचे नाव हाझ–इ–कुत्ब. गुजरातचा सुलतान कुतुबुद्दीन याने इ स १४५१ च्या सुमारास बाधलेल्या या तलावाला एकशेनव्वद फूट लाबीच्या ३४ बाजू असून या तलावाचा घेर एक मलाहून अधिक आहे ७६ एकर भूभाग त्याने व्यापलेला आहे या तलावाच्या आतील बाजूला उतरण्यासाठी ठिकठिकाणी दगडाच्या उत्कृष्ट घडवलेल्या पायऱ्या आहेत पायऱ्याच्या बाजूला छोटे नक्षीदार घुमट आहेत तलावाच्या मध्यभागी बेटावर नगीनावाडी नावाने ओळखला जाणारा बगीचा असून तेथे समरपॅलेस आहे कांकरिया तलावाच्या काठा-काठाने फिरत झुळझुळणाऱ्या वाऱ्याचा आस्वाद घेतला प्रसन्न मनाने मुक्कामी परत आलो

## अद्‌भुत झुलते मीनार –

अहमदाबाद येथील वास्तव्याचा दुसरा दिवस उजाडला स्टेशनपासून नजीकच असलेला झुलता मनोरा पहाण्यासाठी सिद्धी बशीर मशिदीत आलो गुजरातचा सुलतान मोहमद याच्या कारकीर्दीत इ स १४५८ मध्ये हफीज सिद्दी बशीर या तज्ञाने मशिदीचे हे दोन मीनार बाधले हे दोन मीनार एका कमानीने जोडले आहेत पचाहत्तर फूट उचीच्या या पाच मजली दोन दगडी मीनारांवर जाण्यासाठी अतर्गत गोलाकार दगडी जिने आहेत वर

निमुळता आकार होणाऱ्या या मीनारावर फुलाचे सुदर नक्षीकाम आहे प्रत्येक मजल्याला गोलाकार गॅलरी असून त्याला नक्षीदार ब्रॅकेट्स आहेत हे झुलते मनोरे पहाण्यासाठी तिकीटे काढली व गर्दीत दाटीवाटीने दगडी जिन्याने वर चढून ५ व्या मजल्यावर येऊन बाहेरच्या गॅलरीत बसलो मनात मात्र खूप भीती वाटत होती कारण गॅलरीला उंच कठडे तर नव्हतेच पण बसण्यासाठी जागाही अत्यत अरुद होती वरून सर्व अहमदाबाद शहर दिसत होते शेजारचा प्रवासी म्हणत होता गिरण्याची धुराडी मोजू या समोरच्या मनोऱ्यावरही प्रत्येक मजल्यावर दाटीवाटीने लोक बसले होते काही उभे होते आमच्याशेजारी एक वयस्कर स्त्री मोठ्या उत्सुकतेने त्या अरुद जागेत व्यवस्थित बसली होती सर्वजण मनोऱ्यांमध्ये आल्यावर तेथील दोघेजण दोन मनोऱ्यात आले एकाने आमचा मनोरा हलवायला सुरुवात केली उल्का–उदयची तर चागलीच गाळण उडाली आमचा मनोरा तर हलत होताच पण समोरचा मनोराही कप सुटल्यासारखा हलू लागला काही वेळाने समोरचा मीनार हलवण्यात आला त्यावेळी आमचा मनोरा हलवणारा मनुष्य स्तब्ध उभा होता तरीसुद्धा आमचा मनोराही हलू लागला

अहमदाबादचे हे झुलते मनोरे जगप्रसिद्ध असून अद्‌भुतच म्हणावे लागतील हे दोन्ही मीनार जोत्यामध्ये (प्लींथ) विशिष्ट तऱ्हेने जोडले गेले असल्यानेच एक मीनार हलवला की दुसराही आपोआप हलू लागतो अहमदाबादच्या गोमतीपूर भागातील राजपूरबीबी नावाच्या दर्ग्यावर सुद्धा दोन झुलते मनोरे आहेत. या झुलत्या मनोऱ्यामागे निश्चित काय तत्र असावे याचे गूढ उकलण्यासाठी एका इग्रजाने या दर्ग्यावरच्या दोन मनोऱ्यापैकी एक अर्धवट तोडला पण त्याला गूढ उकलले नाही तेव्हा त्याने प्रयत्न सोडून दिला तो अर्धवट तोडलेला मनोरा अद्यापही तसाच आहे व त्या तुटलेल्या स्थितीतही तो हलतो असे म्हणतात झुलत्या मनोऱ्याच्या पायऱ्या उतरून तळाला आलो मशिदीसमोर बसलेल्या वृद्ध फकीराला सहज विचारले "– हा मनोरा हलण्याचे कारण काय ?" तो म्हणाला की ज्याच्या

स्मरणार्थ ही मशीद बाधली त्या मुस्लीम सताच्या इच्छाशक्तीमळे हे मनोरे हलत असावे त्याच्या अधश्रद्धेला आव्हान देण्याचे कारण नव्हते झुलते मनोरे पाहून भव्य पूल ओलांडून 'असर्व' या भागात आलो तेथे पहायची होती – दादा हरी वाव

## सामान्य दाईचा असामान्य त्याग – दादा हरी वाव

सार्वजनिक व लोकोपयोगी विहिरी – वाव बाधायच्या ही गुजरातची जुनी परपरा आहे दादा हरी वाव ही तशाच जुन्या परपरेची १५०१ मध्ये बाधलेली विहीर किंवा बारव आहे गुजरातचा सुलतान अहमदशहा याची बेगम इराणची होती खडतर प्रवासाच्या भीतीने तिच्या पहिल्या प्रसूतीच्या वेळी बादशहाने तिला इराणमध्ये पाठवले नाही हरीया नावाच्या दाईने प्रसूती कुशलतेने पार पाडली त्यामुळे खूष होऊन बादशहाने हरीया दाईला दोन सुवर्णककणे बक्षीस दिली हरीया दाईने विचार केला की आपल्या-सारख्या सामान्य सुईणीला या सुवर्णककणांचा काय उपयोग ? तिने इच्छा प्रकट केली की जिचा अनेकाना उपयोग होईल अशी सार्वजनिक विहीर या ककणातून बाधली जावी त्याप्रमाणे एका सुवर्णककणातून ही सुदर अष्टकोनी विहीर कुशल गवड्याकडून बांधण्यात आली

या विहिरीला सात मजले असून एका बाजूने पाच मजले उतरून दुसऱ्या बाजूने पाच मजले चढून येता येते सध्या खालचे दोन मजले बदच आहेत विहिरीचे बांधकाम प्रेक्षणीय आहे या विहिरीवर तसेच खाबावर उत्तम प्रतीचे बारीक नक्षीकाम आहे सुरुवातीला बारा दगडी स्तभावर आधारित गोलाकार मडप आहे तेथून विहिरीत उतरण्यासाठी निरनिराळ्या स्तभावर आधारित टप्पे विहिरीपर्यंत आहेत पाणी वाहून जाण्यासाठी बाजूला लांबच्यालाब दगडी नाल्या आहेत धुणे धुण्यासाठी दोन्ही बाजूला कट्टे आहेत विहिरीत उतरण्यासाठी बाजूला दोन दगडी गोलाकार जिने आहेत या विहिरीच्या मागे दर्गा आहे तेथे मुसलमान फकीर बसला होता

विहिरीबद्दल त्याला विचारले असता तो सांगू लागला, "ब्रिटिशांच्या काळापर्यंत विहिरीला भरपूर पाणी होते त्यावेळी दोन इंजिन लावूनही पाणी हटत नव्हते आता मात्र या विहिरीत पाण्याचा थेंब नाही आता जमाना बदलला आहे माणसाची नियत पालटली म्हणूनच अल्लाची अवकृपा होऊन पाणी राहिले नाही पाणी नसल्याने ही विहीर केवळ प्रेक्षणीय झाली आहे तिचा वापर होत नाही

दादा हरी वाव हे नाव दाई हरीया या नावाचा अपभ्रंश होऊन पडले एका सामान्य स्त्रीच्या असामान्य त्यागामुळे मनात आदराची भावना निर्माण होते कारण स्त्रियांचा दागिन्याचा हव्यास प्रसिद्धच आहे या विहिरीच्या मागील दर्ग्याशेजारी एका साध्या मकबऱ्यामध्ये बेगम, दाई हरीया, विहीर बांधणारे गवंडी यांच्या साध्या कबरी आहेत सरकारने या विहिरीची व्यवस्था ठेवण्यासाठी सरकारी नोकर नेमले आहेत पण तरीसुद्धा सर्वत्र अस्वच्छता आढळली

**हाथीसिंग जैन मंदिर, स्वामी नारायण मंदिर –**

त्यानंतर शेठ हाथीसिंग महावीर जैन मंदिर पहाण्यासाठी दिल्ली दरवाजाबाहेरील शाही रोडवर आलो शेठ हाथीसिंग केसरीसिंह हे श्रीमंत पण साध्या राहणीचे जैनधर्मीय व्यापारी प जवाहरलाल नेहरू यांच्या भगिनी कृष्णा हाथीसिंग यांचे हे आजे सासरे शेठ हाथीसिंग यांच्या मातोश्री दरवर्षी राजस्थानातील दिलवाडा येथे दर्शनाला जात पुढे पुढे वार्धक्याने थकल्यामुळे त्यांना प्रवास झेपेना पण दर्शनाला जाण्याची इच्छा तर स्वस्थ बसू देईना तेव्हा त्यांच्या या पुत्राने दहा लाख रु खर्च करून हे मंदिर इ स १८५० मध्ये दिलवाडा मंदिराच्या धर्तीवर बांधून घेतले त्यात १५ व्या जैन तीर्थंकर महावीर स्वामींच्या मूर्तीची स्थापना केली

मंदिराच्या प्रवेशमंडपाला उत्तम कलाकुसर केलेले चार कोरीव स्तंभ आहेत तसेच नक्षीदार तोरण आहे या आकर्षक लाकडी प्रवेशद्वारातून

प्रवेश केल्यावर चारी बाजूला विस्तीर्ण मोकळी जागा—प्रदक्षिणामार्ग असून मध्ये मंदिर आहे सभामंडपाचे स्तंभ नक्षीदार असून बारीक कलाकुसरीने सजलेले आहेत मंदिराच्या गाभाऱ्यासमोरील गोलाकार छतावर निरनिराळ्या अविर्भावातील स्त्रियांच्या आकर्षक मूर्ती आहेत तेथील छतावरील दगडात कोरलेले टांगते झुंबर आकर्षक आहे गर्भगृहात भगवान महावीरांची शांत, सात्त्विक चेहऱ्याची मूर्ती आहे त्यात डोळ्यांना काचा बसवल्याने डोळे चमकतात मंदिराचा बाहेरील भागही विविध अविर्भावातील नारींच्या सौंदर्याने सजला आहे मंदिराच्या बाहेर चारी बाजूला छोटी छोटी ५२ उपमंदिरे असून प्रत्येकास नक्षीदार तोरण आहे प्रत्येकास स्वतंत्र शिखर असून आत जैन तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत एक प्रवासी बोलताना सहज म्हणाला की ज्याने माऊंट अबूची दिलवाडा येथील मूळ मंदिरे पाहिली त्यांना या मंदिराची शिल्पकृती सामान्य वाटेल त्यामुळे दिलवाडा येथील मंदिरे पहाण्याची आमची उत्सुकता अधिकच वाढली

जैन मंदिर पाहून नजीकचा चौक ओलांडून शाहीबाग रोडवरील अक्षर पुरुषोत्तम मंदिर पहाण्यास आलो श्रीस्वामीनारायण हे दोन शतकांपूर्वी साधुपुरुष होऊन गेले त्यांनी वयाची वीस वर्षे पूर्ण होण्याअगोदर अखिल भारताची पायी यात्रा केली त्यांनी स्थापन केलेल्या संप्रदायामार्फत अनेक मंदिरे बांधली गेली त्यापैकी हे एक मंदिर प्रसिद्ध आहे स्वामी नारायण यांच्या मते जीव, ईश्वर, माया, ब्रह्म ( अक्षर ), परब्रह्म ( पुरुषोत्तम ) ही पाच अमर तत्त्वे आहेत त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार त्या पंथामार्फत भारतातच नव्हे तर भारताबाहेरही केला जातो आफ्रिका, कॅनडा, लंडन, न्यूयॉर्क इ ठिकाणी स्वामी नारायण यांची मंदिरे व उपासनाकेंद्रे आहेत स्वामी नारायणानंतर गुणतीतानंद यांनी या पंथाचे काम चालू ठेवले स्वामी नारायण यांना हिंदू मंदिरांची अनास्था पहावत नसे त्यांनी वाईट स्थितीतील मंदिरे लोकांच्या मदतीने सुस्थितीत आणण्यासाठी खास सेवापंथ निर्माण केला

मंदिराच्या प्रवेशद्वारी एका बाजूला हनुमान व दुसऱ्या बाजूला गणेशमूर्ती आहे या छोटेखानी मंदिराचा मंडप मोठा आकर्षक आहे तो

संगमरवराने घडविलेला व नक्षीकामाने सजलेला आहे पांढऱ्याशुभ्र नक्षीदार महिरपी तसेच छत आकर्षक आहे मंदिराच्या डाव्या भागात हरिकृष्ण महाराज यांची पिवळ्या रंगाची, श्रीकृष्णाची काळी व राधिकेची पांढरीशुभ्र सुबक मूर्ती आहे राधेची लाल साडी परिधान केलेली चकचकीत मूर्ती मोहक आहे मध्यभागी गुणातीतानंद स्वामी, सहजानंद स्वामी व गोपालानंद स्वामी यांच्या पांढऱ्याशुभ्र संगमरवराच्या मूर्ती आहेत त्यांच्या अंगात अंगरखे असून डोक्यावर फेटे घातलेले आहेत उजवीकडे स्वामी नारायणाची बसलेली मूर्ती आहे मंदिराच्या बाहेरच्या भागावर मीराबाई, प्रल्हाद, ध्रुव, श्रावण, तुकाराम, ज्ञानेश्वर, तुलसीदास इ मूर्ती कोरल्या आहेत महाराष्ट्रातील संतांच्या मूर्तीही मंदिरावर पाहून आनंद वाटला मंदिराच्या आवारात या पंथाचे कार्यालय असून सारंगपूर, बोचसन, गोंडल इ ठिकाणी त्यांची मंदिरे असल्याची माहिती मिळाली अक्षर पुरुषोत्तम मंदिर पाहून परत शाहीबाग रोडवर आलो

शाहीबाग रोडने तसेच पुढे गेल्यावर साबरमती नदीच्या काठावरील राजभवनाचा भव्य परिसर लागतो मोगल बादशहा जहांगीर यांच्या काळात या रम्य बगीच्याची निर्मिती झाली शहाजहानने येथे प्रगत मोगल शैलीचा राजप्रासाद बांधला शाहीबाग रवींद्रनाथ टागोर यांच्या आठवणीशी निगडीत आहे त्यांचे वडील बंधू अहमदाबादला न्यायाधीश असताना त्यांचे वास्तव्य शाहीबागेमधील एका प्रशस्त वाड्यात होते रवींद्रनाथ टागोर विद्यार्थीदशेत असताना वयाच्या सतराव्या वर्षी इंग्लंडला जाण्यापूर्वी काही दिवस येथे राहिले होते साबरमती नदीची शोभा पहात असताना क्षुधित पाषाण (*Hungry Stone*) ही कथा त्यांना स्फुरली

शाहीबागेची भेट आटोपली तेव्हा दुपारचे दोन वाजले होते पोटात भूक भडकली होती रिक्षा करून लाल दरवाजाजवळ आलो तेथील प्रख्यात हॉटेल साबरच्या डायनिंग हॉलमध्ये भोजन घेतले गुजराती जेवण चवदार वाटत होते जेवल्यानंतर तेथेच कोचवर तासभर विश्रांती घेऊन अहमदाबादचा राहिलेला भाग पहायला बाहेर पडलो

**मनमोहक जाळी—**

लालदरवाजापासून केवळ पाच मिनिटांच्या अंतरावरील सय्यद सिद्दीचा प्रसिद्ध दर्गा पहायला मशिदीत प्रवेश केला गुजरातचा सुलतान हमीखान यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सिद्दी सय्यद या गुलामाने हा दर्गा इ स १५७२ मध्ये बांधला हा दर्गा पूर्वी अहमदाबादच्या किल्ल्याच्या भितीचा भाग होता दगडी बांधकाम असलेल्या दर्ग्यात चार चार स्तंभाच्या सहा रांगा असून पाच गाळ्यात आकर्षक गोलाकार घुमट आहेत या दर्ग्याचे वैशिष्ट्य आहे त्याच्या मागील भितीतील कमानीत व दगडामध्ये कोरलेल्या नाजूक जाळीत ! या नक्षीदार जाळीत तीन उंच वृक्ष व त्याच्या चार फांद्या आकर्षकरीत्या कोरल्या आहेत जाळीचे हे शिल्प अद्वितीय असे आहे जाळ्यातून सूर्यप्रकाश आल्यावर त्याचे सौंदर्य अधिक खुलून दिसते एखाद्या चित्रकाराने पेन्सिलीने जितक्या सहजतेने व नाजूकपणे चित्र काढावे त्याप्रमाणे शिल्पकारानी छिन्नी आणि हातोडी यांच्या सहाय्याने ओबडधोबड पत्थर नाजूकपणे घडवलेले पाहून चकीत झालो सध्या तेथे केवळ दोनच नक्षीदार जाळ्या आहेत बाकीच्या तीन नक्षीदार जाळ्या इंग्रजांच्या काळात हलविण्यात आल्या अशी माहिती तेथे मिळाली या नाजूक जाळीचे लाकडी मॉडेल तयार करून ते न्यूयॉर्कच्या म्युझियममध्ये ठेवले आहे

लाल दरवाजा नजीकच भद्र किल्ल्याचा भाग पहायला मिळतो एकेकाळी तेथे राजवाडा व बगीचा होता आता तेथे दिसतात पी डब्ल्यू डी च्या सरकारी कचेऱ्या याच भागात भद्रकालीचे प्रसिद्ध मंदिर आहे मंदिरात काळ्या पाषाणाची कालीमातेची मूर्ती असून तोंडातून चांदीची जीभ बाहेर काढलेली दाखवली आहे हे मंदिर पेशव्यांचा अमल गुजरातमध्ये असताना बांधले आहे भद्र भागात अजूनही महाराष्ट्रीय वस्ती आहे असे कळले

अहमदाबादच्या मिर्झापूर भागातील राणी रूपमतीच्या मशिदीत हिंदु-मुस्लीम शिल्पकलेचे प्रतिबिंब आढळते १४४० च्या दरम्यान होऊन

गेलेला गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याची हिंदू बेगम-राणी रूपमती हिच्या स्मृत्यर्थ ही मशीद बांधली प्रत्येकी बारा स्तभांवर आधारित तीन घुमट या मशिदीत आहेत आतमध्ये प्रकाश येण्यासाठी मधल्या घुमटाची उची बाजूच्या दोन घुमटापेक्षा उच आहे मशिदीला पूर्वी उच मीनार होते ते इ स १८१८ च्या भूकपात उध्वस्त झाले


अहमदाबाद शहर वसवलेल्या गुजरातच्या सुलतान अहमदशहाने इ स. १४२३ मध्ये बाधलेली जुम्मा मशीद ही अहमदाबादची एक प्रसिद्ध मशीद आहे सुप्रसिद्ध शिल्पतत्रज्ञ फर्ग्युसन याच्या मते ही मशीद पूर्वेकडील सुदर मशीद आहे तर सर जॉन मार्शल याच्या मते ही जगातील प्रसिद्ध मशीद आहे तिच्या कमानी खास हिंदू पद्धतीच्या आहेत मशिदीचे आवार ३८९ फूट लाब, २४७ फूट रुद इतके भव्य आहे मशिदीला २६० स्तभ असून एका रागेत दिसणारे १४ घुमट आहेत त्यांची रचना प्रकाश व खेळत्या हवेसाठी वैशिष्ट्यपूर्ण केलेली आहे याही मशिदीचे मीनार भूकपात उध्वस्त झाले या मशिदीत अहमदाबाद शहर स्थापन केलेला सुलतान चिरनिद्रा घेत आहे तर रस्ता ओलाडल्यावर राणीची कबर दिसते

सर्व अहमदाबाद शहराभोवती एकेकाळी असलेल्या भिंतीला बारा वेशी होत्या गजबजलेल्या गाधीरोडवरील तीन दरवाजा या अहमदशहा सुलतानने बाधलेल्या दगडी दरवाजावरील नक्षीकाम कलात्मक आहे पूर्वी बादशहाच्या प्रवेशासाठी हा तीन दरवाजा खास राखून ठेवण्यात येई त्यावरून सुलतान राजवाड्याकडून जुम्मा मशिदीकडे जाणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण मिरवणुकी पहात असे


अहमदाबादमधला दुसरा दिवस मदिरे व मशिदी पहाण्यात गेला सध्याकाळ झाली होती तीन दरवाजापासून रिक्षा करून परत मुक्कामाच्या ठिकाणी आलो

अहमदाबादमधील वास्तव्याचा शेवटचा तिसरा दिवस उजाडला आज पहायचा होता नव्या अहमदाबादचा पश्चिमेकडील भाग सावरमती नदीच्या या पलीकडील भागाकडे जाण्यासाठी प्रथम लाल दरवाजा

दा. क.
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)



झुलते मीनार (The Shaking Towers) अहमदाबाद



↑ बालवाटिका, अहमदाबाद

↓ गिरनारच्या वाटेवर



बसस्टॅन्डवर आलो बसने साबरमती नदी ओलांडून नव्या अहमदाबादमध्ये आलो पूर्वी साबरमतीवर एलिस ब्रिज हा एकच पूल होता आज मात्र तिच्यावर प नेहरू, सरदार पटेल, सुभाषचद्र, म गाधी या नावांनी ओळखले जाणारे आणखी ७ नवे मोठे पूल बाधले आहेत मुबई मधील फोर्ट भागात मोठमोठ्या बॅंका, परदेशी कचेऱ्या, मोठी कार्यालयें जशी दिसतात तशा भव्य इमारती या नव्या अहमदाबादमध्ये आहेत एलिस ब्रिज ओलाडला की प्रथम टाऊनहॉल दिसतो गुजरात कॉलेजचे प्रशस्त आवार याच भागात आहे नेहरू ब्रिज ओलाडल्यावर रिझर्व बॅंकेची व मिल ओनर्स असोसिएशनची भव्य इमारत दृष्टीस पडते त्याचे रचनाकार आहेत चंदीगडची आखणी करणारे विश्वविख्यात आर्किटेक्ट ला कार्बुझर ! गाधीब्रिज ओलाडल्यावर गुजरात विद्यापीठाचे आवार आहे तर रेल्वे ओलांडल्यावर पलीकडे सरदार पटेल स्टेडियम आहे

## गुजरातची राजधानी – गाधीनगर

दुमजली बसने गुजरातची नवी राजधानी गाधीनगर पहायला निघालो बस साबरमती नदीच्या काठाकाठाने जात असताना स्टेशनजवळील औष्णिक केन्द्र दृष्टीस पडले अर्ध्या तासाचा २३ कि मी अतराचा प्रवास सपवून बस गांधीनगर या नव्या राजधानीच्या शहरात पोहोचली इ स १९५७ मध्ये मुबईच्या महाद्विभाषिक राज्याची पुनर्रचना झाल्यावर महाराष्ट्राने दिलेल्या पैशातून ही नवी राजधानी साबरमती नदीच्या काठावर उभारली गेली

गाधीनगर ही नवी राजधानी काटकोनात एकमेकाला दुभागणाऱ्या प्रशस्त २०० ते ३०० फूट रुदीच्या राजरस्त्याचे जाळे असलेल्या, १ × $\frac{3}{4}$ किलोमीटर या मापाच्या ३० सेक्टरमध्ये विभागली आहे क, ख, ग, च, छ, ज ही प्रमुख सहा रस्त्यांची नावे ! त्यांना १ ते ७ नबरचे रस्ते दुभागतात सेक्टर नबर न ११ मध्ये बसस्टॅंड आहे तर त्या शेजारच्या १७ नबरमध्ये विधानसभा आहे समोरच सचिवालयाची भव्य इमारत

आहे साबरमती नदीच्या काठी राजभवन, सर्किट हाऊस, मंत्र्यांचे बगले आहेत सर्वांत शेवटी औष्णिक विद्युत-केंद्र आहे गुजरातच्या या नव्या राजधानीत खूपच शुकशुकाट वाटला वस्ती खूपच विरळ आहे केवळ राजधानी म्हणून सरकारी कामासाठी महत्त्व आले चंदीगड, भुवनेश्वर या नव्या राजधान्यांच्या मानाने गांधीनगर कमी लोकसंख्येचे व साधे वाटले तसेच चंदीगडमध्ये आढळणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकृतीचा येथे अभाव होता कदाचित गांधीजींच्या साधेपणाचा आदर्श राजधानी बांधताना प्रत्यक्षात उतरवला गेला असावा। तसेच दुसरा एक महत्त्वाचा फरक जाणवला तो म्हणजे शासकीय कचेऱ्यांचा भाग चंदीगड प्रमाणे शहराच्या एका टोकाला न ठेवता शहराच्या मध्यभागी आणून गांधीनगरमध्ये सर्वांची सोय केली आहे

## साबरमती आश्रमातील सायंकाळ

महात्माजींच्या वास्तव्याने पुनित झालेल्या साबरमती आश्रमाला भेट देण्यासाठी साडेचारच्या सुमारास तेथे पोहोचलो कानामध्ये घुमत होते गोड सुरातले गीत—

दे दी हमे आजादी बिना खड्ग बिना ढाल ।

साबरमतीके संत तुने कर दिया कमाल ।।

साबरमती नदीच्या काठी हा आश्रम १९१७ साली स्थापन झाला म. गांधीजे १९३० पर्यंत तेथे वास्तव्य होते त्यानंतर ऐतिहासिक दांडी यात्रेनिमित्त त्यांनी हा आश्रम सोडला त्यावेळी त्यांनी घोषणा केली की स्वातंत्र्य मिळेपर्यंत मी येथे परतणार नाही १९३० नंतर या आश्रमाद्वारे हरिजनोद्धाराचे काम चालू आहे सुरुवातीला सत्याग्रह आश्रम या नावाने ओळखला जाणारा हा आश्रम नंतर हरिजन आश्रम नावाने ओळखला जाऊ लागला पण तरी साबरमती आश्रम या नावानेच हे स्थान सर्वत्र प्रसिद्ध आहे आश्रमाची व्यवस्था म. गांधींच्या मृत्यूनंतर केलेल्या ट्रस्ट-मार्फत पाहिली जाते



प्रथम गांधी स्मारक संग्रहालयाच्या इमारतीत प्रवेश केला पं नेहरु यांनी १९६३ साली अशोकवृक्ष लावून या स्मारकाचे उद्घाटन केले संग्रहालयाची साधी, मजला नसलेली इमारत गांधीजींच्या साधेपणाला साजेशीच आहे या संग्रहालयात छायाचित्रांचे दालन, वाचनालय, कागदपत्रे व दस्तऐवज असे तीन विभाग आहेत छायाचित्रांच्या दालनात म गांधींच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांचे चित्ररुप दर्शन होते प्रथम दिसतात त्यांच्या बालपणातील घटनांची छायाचित्रे ' लंडनमध्ये शिक्षणासाठी वास्तव्य असताना सार्जंटच्या वेषातील त्यांचे छायाचित्र जसे वैशिष्टयपूर्ण आहे तसेच सायकल चालवतानाचे छायाचित्रही ' रशियन लेखक टॉलस्टॉय याच्या वाडीत १९१० साली घेतलेले छायाचित्र तेथे जसे आहे तसेच रवींद्रनाथ टागोरांबरोबरचेही आहे महारोग्याची सेवा करतानाचे त्यांचे छायाचित्र दु.खपीडीतांबद्दल त्यांना वाटणारी कणव दर्शवते शेवटचे छायाचित्र आहे दिल्ली येथील त्यांच्या प्रेतयात्रेचे ' अथांग जनसमुदाय

सामील झालेली ती एका महापुरुषाची प्रेतयात्रा पाहून अंत:करण द्रवते बापूजींचे चित्ररुप दर्शन पाहून त्यांनी जे म्हटले आहे की—*The world is my Family* याची प्रचीती येते ते आपल्या जीवनाबद्दल म्हणतात —

**मेरा जीवन इतना अधिक सार्वजनिक हो गया है की**
**शायदही कोई चीज ऐसी है जिसे जनता जानती न हो।**

छायाचित्र दालनात फेरफटका मारताना महात्माजींच्या जीवनाचा चित्रपट जणू नजरे समोरून जातो

त्यानंतर दुसऱ्या दालनात प्रवेश केला तेथे सुरुवातीला म गांधीचे शब्द लिहिले आहेत —

**मेरा जीवनही मेरा संदेश है।**

या दालनात प्रख्यात चित्रकारांनी गांधीजीची चित्रित केलेली भव्य चित्रे आहेत चित्रकार चंदूलाल शहा यांनी अनेक भव्य व आकर्षक चित्रे काढली आहेत त्यात १९३० ची दांडीयात्रा, चरख्यावर सूतकताई करताना, जानेवारी १९४८ चा ऐतिहासिक उपवास सोडताना, अनेक नेत्यांसमवेत चर्चा करताना इ अनेक चित्रे उल्लेखनीय आहेत गांधीजीबद्दल जगातील मान्यवर व्यक्तींनी काढलेले उद्‌गार ' सत्याग्रहसे स्वराज्य ' या दालनात आहेत बर्नार्ड रसेल, बर्नार्ड शॉ, रवींद्रनाथ टागोर, खान अब्दुल गफारखान, मार्टिन ल्यूथर किंग इ नी म गांधींबद्दल काढलेले गौरवोद्‌गार दिसतात. तेथील एक मजेदार चित्र लक्ष वेधून घेते परदेशातील वास्तव्यात बॉलडान्सच्या प्रसंगी बापूजींना पृच्छा केली जाते ' मि गांधी, क्या आप हमारे साथ नृत्यमें भाग लेंगे ? " त्यावर बापूजी उद्‌गारतात—" अवश्य, यह छडी मेरी साथिन बनेगी। " गांधी ग्रंथालय विभागात म गांधीचे जीवन, कार्य, संदेश इ विषयावर ७००० पेक्षा अधिक पुस्तकांचा संग्रह आहे


दस्तऐवज—कागदपत्रे विभागात म गांधीनी पाठवलेल्या अथवा

त्यांना आलेल्या सुमारे तीस हजार पत्राचा सग्रह केला आहे परदेशातून आलेल्या एका पत्रावरील वैशिष्ट्यपूर्ण पत्ता असा –

*M K Gandhi*
*Wherever he may be*
*India*

अर्थात देशभर दौऱ्यावर असणाऱ्या गांधीजीना हे पत्र मिळालेच 'यग इडिया, ' नवजीवन व 'हरिजन' मध्ये प्रकाशित झालेल्या त्याच्या चारशे लेखाचे हस्तलिखित येथे आहे

सग्रहालय पाहून आवारातील गाधीजीचे 'हृदयकुज' नावाने ओळखले जाणारे निवासस्थान पहायला आलो हृदयकुज एक साधे कौलारू बैठे घर पुढे साधा व्हरांडा आहे बाजूला गांधीजीची खोली आहे तेथे त्यांचा चरखा जतन करून ठेवला आहे गाधीजींच्या सत्याग्रहाचे सिद्धात समाविष्ट केलेले त्याच्या जीवनचक्राचे चित्र तेथील भिंतीवर लावले आहे विनोबाजीनी ते तयार केले आहे याच खोलीत म गांधी देशविदेशाच्या लोकाना मुलाखती देत असत ही खोली म्हणजे देशातील अनेक ऐतिहासिक, महत्त्वाच्या घटनाची साक्षीदार आहे अनेक महत्त्वाचे निर्णय येथूनच घेतले गेले



हृदयकुजच्या आतील बाजूलाही व्हराडा असून दोन्ही बाजूने खोल्या आहेत एक खोली पाहुण्यासाठी असे मागे कस्तुरबांची खोली असून तेथे त्यांची गाधीजींबरोबरची छायाचित्रे लावली आहेत म गाधीच्या पोरबदर

येथील जन्मस्थानाची प्रतिकृती तेथे आहे आणखी एका खोलीत दांडी-यात्रेतील काठीची प्रतिकृती आहे गांधीजींनी आपल्या हातांनी हरिजनांसाठी बनवलेला कुंडताही तेथे आहे

१९३० च्या दांडीयात्रेची सुरुवात हृदयकुंजातूनच झाली नंतर १९३३ साली या आश्रमाचे विसर्जन करण्यात आले हृदयकुंजाशेजारी त्यांच्या परदेशी शिष्येची कुटी आहे मीराबाई हे त्यांनी तिचे ठेवलेले नाव। तसेच बाजूला आहे उपासनामंदिर। येथे गांधीजींनी अनेक धर्मप्रवचने केली तेथे नियमित प्रार्थना होत असे.

साबरमती आश्रमाची भेट आटोपली होती एव्हाना अंधार पडला होता सायंकाळचे सात वाजले होते साडेसातला सुरू होणाऱ्या ध्वनी-प्रकाश (*Sound and Light*) या कार्यक्रमाची मोठ्या आतुरतेने वाट पहात होतो हृदयकुंजासमोर खुर्च्या मांडून ठेवले या होत्या मागील बाजूला साबरमती नदीचे विशाल पात्र दिसत होते पूर्वी दिल्लीला लाल किल्ल्यात व श्रीनगरला शालीमार बागेत साऊंड अँड लाईट कार्यक्रम पाहिले होते त्यामुळे साबरमती आश्रमातील कार्यक्रमाची उत्सुकता वाटत होती

ठीक साडेसातला गुजराती भाषेत ध्वनिमुद्रित केलेल्या गोड आवाजाने कार्यक्रम सुरू झाला १८६९ मध्ये म गांधींच्या पोरबंदर येथील जन्मापासून ते इतिहासप्रसिद्ध दांडीयात्रेसाठी त्यांनी १९३० मध्ये आश्रम सोडला या काळातील महत्त्वाच्या घटनांचा इतिहास केवळ ध्वनी आणि प्रकाश यांच्या सहाय्याने साकार केला आहे इंग्लंडमध्ये त्यांनी मिळवलेली वकिलीची सनद, आफ्रिकेतील कार्य व नंतर या आश्रमाची स्थापना, हरिजनोद्धाराचे प्रयत्न यांची माहिती रसाळ भाषेत मिळते

११ मार्च १९३० हा ऐतिहासिक दिवस। आश्रमातून दांडीयात्रेसाठी कूच करण्याची त्यांनी घोषणा केली दांडी हे नवसारी जिल्ह्यातील समुद्र-काठावरील छोटेखानी खेडे। मीठ सत्याग्रहासाठी २४० मैलांच्या व २४ दिवसांच्या खडतर प्रवासासाठी त्यांनी १२ मार्च १९३० ला ७९ आश्रम-वासियांसमवेत कूच केले संपूर्ण स्वातंत्र्य हा त्यांचा ध्यास होता स्वातंत्र्य प्राप्त झाल्याशिवाय आश्रमात परतणार नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होती

अशाप्रकारे १९१५ मध्ये स्थापन केलेल्या आपल्या प्रिय आश्रमाचा त्यांनी निरोप घेतला दांडीयात्रेसाठी केलेल्या प्रस्थानाची तुलना गौतमबुद्धाच्या सर्वसंगपरित्यागाशी होऊ शकेल

पाऊण तासाच्या या कार्यक्रमात ध्वनी आणि प्रकाश यांचा मोठ्या चातुर्याने उपयोग केला आहे ध्वनीच्या होणाऱ्या लहानमोठ्या आवाजावरून ध्वनी एका ठिकाणाहून दुसरीकडे जात आहे असा भास होतो आश्रमातील हृदयकुंज, मीराकुटीर, उपासनामंदिर याठिकाणी रंगीबेरंगी प्रकाश योग्य वेळी पाडला जातो व त्याच्याशी निगडित ऐतिहासिक घटना व संदर्भ यांची माहिती सांगितली जाते समर्पक शब्द, संगीत, प्रकाश व ध्वनी याच्या अचूक समन्वयामुळे हा कार्यक्रम पहाताना आगळाच आनंद मिळतो स्वातंत्र्यापूर्वी म गांधींनी राष्ट्राला दिलेली दिव्य शक्ती व प्रेरणा याची प्रचीती कार्यक्रम पाहून येते जुना इतिहास जिवंत होऊन डोळ्यासमोर नाचू लागतो उपासनामंदिरात प्रवचने करणारा, दांडीयात्रेसाठी कूच करण्यास आवाहन करणारा त्याचा पवित्र ध्वनी आजही जणू वातावरणात घुमतो गांधीजींचा आवाज ऐकून ' छेदोनि तुफाना स्वर हा मंजुळ वढे ' या काव्यपंक्तीची आठवण झाली

या कार्यक्रमाच्या यशात लेखक अली सरदार जाफरी, संगीतकार जयदेव, गायक मन्नाडे व उषा मंगेशकर यांचा महत्त्वाचा सहभाग आहे ध्वनी व प्रकाश याची अचूक योजना फिलीप्स इंडिया कंपनीने केली आहे

साबरमती आश्रमाची भेट आटोपून लाल दरवाजा मध्यवर्ती बसस्थानकावर पोहोचलो हॉटेल साबरमध्ये गुजराती जेवणाने तृप्त झालो तीन दिवसांची अहमदाबाद भेट संपली होती

घाईगर्दीत पाहिलेले अहमदाबाद कसे वाटले ? आकाशात उंच उंच भिडलेल्या, धूर फेकणारी नळकांडी असलेल्या गिरण्यांचे गाव ! पैशासाठी धावपळ करणाऱ्या बनीया–शेठ लोकांचे गाव ! एकीकडे दिसतात अलिशान इंपोर्टेड, एअरकंडिशन गाड्यातून कडक टिनोपाल इस्त्रीचे कपडे घालून फिरणारे बनीये तर दुसरीकडे दिसतात टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी

घाम गाळीत मोठमोठी ओझी असलेल्या हातगाड्या ओढणाऱ्या, धुळीने माखलेल्या, अनवाणी गुर्जर स्त्रिया ! केवढी ही सामाजिक विषमता !

अहमदाबाद म्हणजे जुन्या संस्कृतीवर व्यापाराने विजय मिळवलेले गाव ! एकेकाळी सुलतान मालक असलेले पण आज कापड गिरणीवाल्या लक्षाधीश मालकाचे गाव ! प्रचंड व्यापारी उलाढालीचे गाव ! एकेकाळी १२ वेशी असलेले अरुंद रस्त्याने स्कूटर, बस, मोटारी, रिक्षा याच्या गर्दीतून जीव मुठीत धरून चालताना नाकी नऊ येणारे गाव ! जुन्या मुसलमान संस्कृतीची याद करून देणाऱ्या दर्गे आणि मीनार यांचे गाव !

अहमदाबादमध्ये एकूण हॉटेल्सची कमतरताच आहे श्रीमंत असो वा गरीब बाहेर रस्त्यावर गाडीजवळ उभे राहून खाण्यातच त्याला मजा वाटते रंगीबेरंगी बुशशर्ट, बेलबॉटम घातलेल्या फॅशनेबल तरुण-तरुणी जसे पाणीपुरी, मलई–कुल्फी, सामोसे, खमण ढोकळे खाताना दिसतात तसेच धोतर सावरीत चविष्टपणे भजी, फरसाण, खमण खाणारे जुन्या पिढीतील गुजरातीही दिसतात

जेवण आटोपल्यावर साबरमती काठी एलिस ब्रिजच्या कठड्याजवळ विसावलो होतो दुपारी साबरमतीच्या वाळूने तप्त होऊन भाजून निघालेला, उष्ण वारे, धुळीचे लोट यांनी लपेटलेला लाल दरवाजाचा भाग रात्री नदीवरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकांमुळे थंड झाला होता त्यावेळी मोगल बादशहा जहांगीर याने ' उन्हाळ्यात साबरमतीची वाळू तप्त होऊन धूळ आणि उष्णतेने भाजून निघणारे धुळीचे गाव–अहमदाबाद ' असे लिहून ठेवलेले वर्णन आठवले खरच होत ते !

अहमदाबाद सोडताना डोळ्यासमोर येत होत्या मशिदी आणि मीनार ! फारसे सुंदर नसलेले, धावपळ, गर्दी, अरुंद रस्ते, कापड गिरण्या असलेले गाव !

✦ ✦



ग्रं. क्र. ६५८
दा. क्र. २५३८६
[illegible]
ग्रंथ. शाखा (स्थक

## भावनगर

# शत्रुंजय – जैनांची मंदिरनगरी

अहमदाबादची भेट आटोपून सौराष्ट्रातील भावनगरला जाण्यासाठी सकाळी सातला स्टेशनवर आलो सौराष्ट्रातील राजकोट, पोरबंदर, भावनगर येथे जाण्यासाठी अहमदाबादच्या ब्रॉडगेज स्टेशनच्या मागील बाजूला मीटरगेज गाड्यासाठी प्लॅटफॉर्मस् आहेत सकाळी सव्वासातला मेलने अहमदाबाद सोडले गाडीची बोगी कोरीकरकरीत असून सीटला कुशन होते डब्यावर दांडी यात्रेचे प्रतीक–काठीचे चित्र होते रेल्वेमंत्र्यांनी वाढवून दिलेल्या सुविधा अमलात आल्याचा प्रत्यय आला

अहमदाबाद–भावनगर २६९ कि मी अंतराचा प्रवास सुरू झाला गाडीत जागा ऐसपैस मिळाली उल्का, उदय पत्ते खेळून वेळ घालवीत होते तर चंद्रकांत स्टेशनवर मिळालेल्या पेपरमध्ये डोके खुपसून बसले होते गाडीतून आजूबाजूच्या सुपीक गुर्जरभूमीचे दर्शन होत होते सकाळचे साडेनऊ वाजले तेव्हा ढोलका स्टेशन आले स्टेशनवर भजियो ' खेरीज दुसरे काही मिळत नव्हते मुलांनाही भूक लागली होती गरम भजावर चान्स मारण्याखेरीज इलाज नव्हता पुन प्रवास सुरू झाला गाडी मेल होती पण

मीटरगेज, त्यामुळे वेग फार नव्हता व प्रवास कटाळवाणा होता दुपारी बाराच्या सुमाराला गाडी बोटद या जक्शनवर थावली तेथून एक फाटा सुरेंद्रनगर, राजकोटला जातो गाडीचा मुक्काम स्टेशनवर अर्धा तास होता जेवणाची ताटे डब्यात आली, पण जेवणाने फारच निराशा केली गुजरात-मध्ये मोठ्या शहराखेरीज जेवणाचे हालच ! दुपारी दीडला ढोला जक्शन आले तेथून वेरावळ, पोरबदरला फाटा जातो स्टेशनचे नाव वाचन मुले हसू लागली दुपारी अडीचच्या सुमाराला गाडी सिहोर जक्शनला पोहोचली तेथून पालिटाणाला रेल्वेचा छोटा फाटा जातो स्टेशन समोरच 'खोडीयार' मॅनिटरीवेअर्सची मोठी फॅक्टरी होती तासाभराने भावनगर स्टेशन आले भावनगरमध्ये प्रवेश करून सौराष्ट्र भेटीची सुरुवात केली सौराष्ट्राच्या वैशिष्ट्याबाबत पुराणातील एका श्लोकात म्हटले आहे

**सौराष्ट्रे पचरत्नानि नदी नारी तुरगमा ।**
**चतुर्थ सोमनाथश्च पचम हरिदर्शनम् ॥**

नदी, नारी, घोडे, सोमनाथ, द्वारका ही सौराष्ट्राची पाच वैशिष्ट्ये आहेत

स्टेशनवर रिटायरिंग रूम न मिळाल्याने गावात रिक्षाने खूप हिडलो, अखेर पचायतभवन येथे स्पेशल रूम मिळाली तोपर्यंत पाच वाजले दिवस-भराच्या प्रवासाने थकलो होतो जेवण आटोपून घेतले व रात्री आठलाच निद्राधीन झालो

दुसरा दिवस उजाडला सकाळी साडेआठला भावनगर पहाण्यासाठी निघालो भावनगर हे साधारण तीन लाख लोकसख्येचे गुजरात–सौराष्ट्राच्या दक्षिणपूर्व किनाऱ्यावरील बदर ! इ स १७१३ मध्ये हे शहर अस्तित्वात आले पूर्वीच्या काठेवाडातील ही एका सस्थानाची राजधानी भावनगर हे खबायतच्या आखाताच्या पश्चिम बाजूला येते नर्मदा व तापी या नद्या येऊन मिळतात ती खबायतच्या आखाताची पूर्व बाजू विद्या, कला व सस्कृती यांचे भावनगर हे माहेरघर आहे

प्रथम गेलो भावनगरचे नवे बदर पहायला हे बदर शहरापासून १२

कि मी अंतरावर असून तेथील लॉकगेट पहाण्यासारखी आहे त्यासाठी पोर्ट ऑफिसरची परवानगी घ्यावी लागते आशियाखंडात अशा तऱ्हेचे गेट फक्त येथे आहे अशी माहिती मिळाली ओहोटीच्या वेळी जहाजे तरंगण्यासाठी आवश्यक असलेले पाणी या गेटद्वारे आत घेतले जाते बंदरापासून जवळच सेंट्रल सॉल्ट अँड मरिन केमिकल रिसर्च इन्स्टिट्यूट असून तेथे विविध प्रकारचे संशोधनकार्य चालू असते

भावनगर पोर्टची भेट आटोपून तख्तेश्वर महादेवाचे मंदिर पहायला आलो हे छोटेसे सुंदर संगमरवरी मंदिर भावनगरचे महाराज तख्तसिंह यांनी १८९३ मध्ये एका छोट्या टेकडीवर बांधले मंदिरात महादेवाची पिंड आहे मंदिर पहाण्यासाठी बाजूला कठडे असलेल्या पायऱ्या चढून जावे लागते तेथून बाजूचे उद्यान, जलाशय व भावनगर शहर यांचे विहंगम दृश्य दिसते मंदिराच्या बाजूला छान आखीव बगीचा असून त्यात बालकांच्या खेळांसाठी विविध सोयी आहेत तसेच बालकांसाठी प्लॅनिटोरियम – ग्रहतारांगण मंडळ आहे गावाला पाणी पुरविण्यासाठी महाराजांनी बांधून घेतलेला गौरीशंकर तलाव तेथेच आहे हा एक छान निसर्गसुंदर पिकनिक स्पॉट वाटला

भावनगरला पहाण्यासारखे आणखी एक मंदिर आहे – रूपा परी देवी मंदिर । या लोकप्रिय मंदिरातील देवीची मूर्ती थोडी उग्र वाटली ही देवी नवसाला पावते अशी तेथील भक्तांची धारणा आहे

एव्हाना दुपार झाली होती जेवण आटोपून विश्रांतीसाठी मुक्कामाला आलो दुपारी चारला महात्मा गांधींचे स्मारक, म्युझियम व लायब्ररी पहाण्यास प्रथम गेलो गांधीजींच्या स्मृतींशी निगडित छायाचित्रे, पुस्तके, विविध वस्तू तेथे आहेत तेथील भेट आटोपून वल्लभभाई पटेल या सुंदर, रेखीव बगीच्यात चक्कर मारली तेथे पोहण्याचा तलाव तसेच रेस्टॉरंटही आहे बगीचा पाहून भावनगरच्या अरुंद, गजबजलेल्या बाजाराच्या रस्त्यामधून फिरत फिरत परतलो दुसऱ्या दिवशी पहाटे पालिटाणाला जायचे होते उद्या खूप पायऱ्या चढून डोंगरावर मंदिरे पहायला जायचे आहे असे उल्का-उदयला म्हणताच ते चट्कन झोपी गेले

### शत्रुंजय–जैनांची मंदिरनगरी –

दुसऱ्या दिवशी सकाळी सातला उठलो भावनगर स्टँडवर येऊन आठची भावनगर–पालिटाणा गाडी पकडली प्रवाशानी गच्च भरलेल्या गाडीतून ५६ कि मी अतराचा प्रवास सपवून १० वाजता पालिटाणा स्टँडवर पोहोचलो पालिटाणा हे सुमारे पन्नास हजार लोकसख्येचे गाव असून रेल्वेचा फाटा येथपर्यंत आलेला आहे

शत्रुजय टेकडी जैनाचे पवित्र तीर्थस्थान मानले जाते। जैनधर्मीयाची शत्रुजय, गिरनार, तारगा (गुजरात), माऊट अबू (राजस्थान), समेतशिखर (बिहार) ही पाच गिरीशिखरे पवित्र मानली जातात। प्रत्येक जैनधर्मीय आयुष्यात एकदा तरी या पवित्र तीर्थस्थानाचे दर्शन व्हावे अशी आकांक्षा बाळगतो शत्रुजयचे महात्म्य फार मोठे आहे शत्रुजय जैनाची काशी आहे

प्राचीन काळी जैनाचे प्रथम तीर्थंकर ऋषभदेव याचा विहार या शत्रुजय तीर्थावर झाला होता त्याचप्रमाणे अनेक जैन साधू–महात्म्याना या ठिकाणी मुक्ती मिळाली आपल्या मनातील राग, द्वेष, माया, लोभ आदी विकाररूपी शत्रूवर त्यांनी विजय मिळवला म्हणून या स्थानाचे नाव 'शत्रुजय' असे पडले शत्रुजय हे सिद्धक्षेत्र मानले जाते श्वेतावरपथीय जैन शत्रुजयला सर्वात पवित्र मानतात जैन श्रावकाना शत्रुजयची यात्रा अनवाणी करावी लागते श्रावकानी तेथे जेवणखाण, थुंकणे लघुशका इ गोष्टी करणे निषिद्ध मानले जाते

पालिटाणा गावाच्या पश्चिमेला शत्रुजयचा हा पवित्र पहाड आहे बसस्टँडपासून पायथ्यापर्यंत पोहोचण्यासाठी तीन कि. मी. अतर टाग्याने गेलो वाटेत यात्रेकरूच्या सोयीसाठी उत्तम बाधलेल्या, चकचकीत, भव्य अशा अनेक धर्मशाळा आहेत अल्प भाड्याने तेथे यात्रिकाची सोय केली जाते असे टागेवाला म्हणाला

शत्रुजय टेकडीच्या पायथ्याला पालिटाणा गाव सपते ही टेकडी दोन हजार फूट उचीची असून चढ पाच कि मी अतराचा आहे चढताना उपयोगी पडणाऱ्या काठ्या पायथ्याशी भाड्याने मिळतात तसेच डोल्याही भाड्याने मिळतात माणसाच्या वजनाप्रमाणे डोलीवाले पैसे घेतात डोंगर

चढायला मोठ्या उत्साहाने सुरुवात केली काही ठिकाणी पायऱ्या काही ठिकाणी नुसता चढ होता ठिकठिकाणी बांधलेल्या सुमारे तीन हजार पायऱ्या चढून जाव्या लागतात उल्का–उदय पटापट पायऱ्या चढून पुढे जाऊन आमची वाट पहात थांबत पायऱ्या चढताना दक्षिणेला शत्रुंजी नदीवर बांधलेल्या धरणाने अडविलेल्या प्रवाहामुळे झालेल्या जलाशयाचे विहंगम दृश्य दिसत होते पायऱ्यांची चढण व अधूनमधून सरळ चढाचा मार्ग असा प्रवास साडेदहाला सुरू झाला होता ऊन डोक्यावर येत चालल्याने चांगलेच थकल्यासारखे वाटत होते वाटेत ठिकठिकाणी गार पाणी मिळत होते अनेक लोक मध्येच विश्रांती घेत व पुन चढायला सुरुवात करीत पण एक जैन मध्यमवयीन स्त्री मात्र कुठेही न बसता डोंगर चढत होती अगदी दमल्यावर उभी राहूनच ती विश्रांती घेत होती वाटेत माणसांना डोलीतून नेणारे डोलीवाले घामाने निथळताना दिसत होते पायथ्यापासून माथ्यापर्यंत चहाफराळाचे एकही दुकान नव्हते स्वच्छतेच्या व पवित्रतेच्या दृष्टीने ते योग्यच होते म्हणा दोन तास चढ चढल्यावर आम्ही शत्रुंजय या पवित्र पहाडाच्या माथ्यावर पोहोचलो होतो गुजराती स्त्रिया थंड दही विकताना दिसल्या बाकी काहीच तेथे मिळत नव्हते मीठ घातले या दह्यावर ताव मारल्यावर उन्हामुळे आलेला शीण कमी झाला

जैनांच्या नाभेय ते वर्धमान या चोवीस तीर्थंकरापैकी तेवीस तीर्थंकर शत्रुंजयवर आले फक्त बाविसावे तीर्थंकर नेमीनाथ येथे आले नव्हते अशी ही जैन तीर्थंकरांच्या चरणरजाने पुनित झालेली भूमी—शत्रुंजय।

मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर या पहाडाच्या माथ्याला दोन रस्ते फुटतात डाव्या बाजूने जाणाऱ्या रस्त्याने मुख्य मंदिराकडे आलो हे दादा टुक होय दुसरा उजवीकडील रस्ता नवटुकच्या मंदिराकडे जातो दादा टुकच्या प्रचंड प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर दिसणाऱ्या असंख्य मंदिराच्या दर्शनाने अवाक् झालो तेथील मंदिरांची संख्या ८६३ असून लहानलहान मंदिरांची गणती दोन हजारावर भरते एका छोट्या टेकडी-वर एवढी मंदिरे असलेले हे स्थान जगात एकमेव असावे या टेकडीवरील मंदिराच्या निर्मितीचे कार्य अकराव्या शतकापासून आजतागायत वर्षानुवर्षे

सतत चालू आहे वरीचशी मंदिरे पांढरीशुभ्र चुन्याच्या गिलाव्याची आहेत तर काही संगमरवरी आहेत

श्रीआदिश्वर अथवा ऋषभदेव या पहिल्या जैन तीर्थंकराचे मंदिर हे या टेकडीवरील सर्व मंदिरात पवित्र समजले जाते सुमारे पाचशे वर्षांपूर्वी हे मंदिर बांधण्यात आले व सोळा वेळा त्याचा जीर्णोद्धार झाला मंदिरासाठी आग्ऱ्याहून दगड आणला मंदिरात आदिश्वराची चांदीच्या सिंहासनावरील भव्य मूर्ती पद्मासनाधिष्ठित आहे मूर्तीच्या डोळ्यांच्या ठिकाणी मौल्यवान काच व रुपे बसविले असल्याने डोळे चमकतात काही वर्षांपूर्वी या मंदिरावर वीज पडून मुख्य मूर्तीच्या नाकाच्या काही भागास चीर पडली होती मूर्ती बदलण्याचे ठरविण्यात आले पण मूर्ती काढताना चमत्कारिक आवाज झाला त्यामुळे मूर्ती हलवण्याचा विचार सोडून देऊन लेप देऊन नाकाची चीर बुजवण्यात आली मात्र शेजारी एक नवे मंदिर बांधून त्यात नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आज ते मंदिर आदिश्वरदादाचे म्हणून ओळखले जाते श्रीआदिश्वराच्या मूर्तीच्या पुढे चांदीची महिरप असून दरवाजाही चांदीचा आहे कागदावर बारीक कातरकाम करावे तसे नक्षीकाम असलेला गाभारा आहे मंदिरात स्वच्छता, पावित्र्य व भव्यता यांचा सुरेख संगम झाला आहे

आदिश्वर मंदिरावर सोन्याचा कळस आहे मंदिरासमोर गोलाकार प्रार्थना मंडप आहे त्याच्या गोलाकार छताच्या आतील बाजूने स्त्रियांच्या विविध देखण्या मूर्ती आहेत मंदिराच्या बाहेरील भिंतीवर सौंदर्यशाली स्त्रियांच्या विविध आकर्षक मूर्ती आहेत आरशात पाहून सौंदर्य न्याहाळणारी, चेंडूबरोबर क्रीडा करणारी, बालकाला कडेवर घेतलेली इ विविध विलोभनीय स्त्री-मूर्ती आहेत तसेच अग्नी, सूर्य, गणेश, हनुमान इ च्याही रेखीव मूर्ती आहेत मंदिराच्या बाह्य भिंतीवर एक इंचही जागा अशी नाही की जी नक्षीकामाने सजली नाही

मंदिराच्या मागील बाजूला ज्या वृक्षाखाली अडीच हजार वर्षांपूर्वी आदिश्वर भगवान उपदेश करायला आले होते तो रायण वृक्ष आहे वृक्षाखाली आदिनाथांच्या विशाल पादुका आहेत तेथे साप, मोर हत्ती एकत्र रहात म्हणून त्यांच्या मूर्ती कोरल्या आहेत तसेच सुंदर स्त्रियांच्याही

विविध मूर्ती आहेत येथे या मूर्ती आहेत याचा अर्थ भगवान या स्त्रियांकडे ढुकूनही पहात नाहीत म्हणजेच त्यानी मोहावर विजय मिळवला आहे

आदिनाथाच्या मुख्य मदिराजवळ पूजेचे सामान, फुले, पेहरावाचे केशरी रगाचे कपडे इ ठेवण्यासाठी खास मोठमोठ्या खो या बाध या असून तेथे जैनधर्मीयाची गर्दी होती पुजाऱ्याचा वेष धोतर व बडी हा असून ते आपली वस्त्रे गेरूने रगवतात मदिरात मूर्तीसमोर ताज्या गुलाबी फुलाचा तसेच सब्जाचा खच पडला होता या मदिराच्या मालकीची काही अतिमौ यवान, दुर्मिळ रत्ने, हिरे, माणके इ सपत्ती आहे ती पहाण्यासाठी आनदजी कल्याणजी ट्रस्टची खास परवानगी घ्यावी लागते


आदिश्वरप्रभूच्या शिष्याची, त्याच्या धर्माचा प्रसार करणाराची असख्य छोटी छोटी मदिरे बाजूला आहेत तसेच आदिनाथ, कुमारपाल, विमलशाह, सप्रीतीराजा व चार्यमुख ही महत्त्वाची पाच मदिरे आहेत चार्यमुख म्हणजे तेथील मूर्तीला चार मुखे असून मदिराला चार प्रवेशद्वारे आहेत तेथे प्रमुख प्रवेशद्वारासमोर प्रशस्त प्रार्थनामडप आहे

या टेकडीवर एवढी मदिरे कशी बाधली गेली याबद्दल चौकशी केली असता जैन पुजारी म्हणाला की जैन समाजातील व्यक्तीजवळ पैसा जमला की या शत्रुजय पर्वतावर तीर्थंकराचे लहानमोठे जमेल तेवढे मदिर बांधून ट्रस्टला अर्पण करायचे असा प्रघात झाला आहे त्याचमुळे येथे एवढी मदिरे बांधली गेली आणखी बाधली जात आहेत मदिर बाधणाऱ्या व्यक्तीनी आपले नाव, गाव, बांधल्याचे वर्ष इ कोरून ठेवले आहे जैनधनिकाच्या दानधर्मातून या मदिरांच्या निर्मितीचे कार्य गेली हजार वर्षे सतत चालू आहे आजपर्यंत या कामी कोट्यवधी रुपये खर्च झाले लोकांची श्रद्धा, धनिकांचा पैसा व शिल्पकाराची कला या सर्वांचा येथे उत्कृष्ट सगम झाला आहे काही मदिरांचे शिल्पकाम अप्रतिम आहे तर काहींमध्ये तोचतोचपणा आहे जैन तीर्थंकराच्या जीवनातले विविध प्रसग शिल्पकृतीत साकार केले आहेत मदिरांची शिखरे, त्याची आकर्षक रचना या सर्वांकडे पहाताना मन थक्क होते कार्तिक पौर्णिमा, चैत्रपौर्णिमा अक्षय तृतीया या तीनवेळी टेकडीवर मोठी यात्रा भरते टेकडीवर रोज दीड-दोन

हजार भाविक येतातच यात्रेच्या वेळी मात्र पन्नास हजारपर्यंत भाविक जमतात

शत्रुजयाच्या या पहाडावरील मंदिरे निरनिराळ्या विभागात विखुर-लेली आहेत प्रत्येक विभागाला 'टुक' म्हणतात या पहाडावर एकूण १० टुक आहेत आदिनाथ ऋषभदेवाचे हे मुख्य टुक आहे इतर नावे अशी— मोतीशाची, बालावसी, प्रेमवसी, हेमवती, उजमबाईची, साखरवसी, छीपावसी, चौमुखजी अथवा सवासोमाची, खरतखसी व पायथ्याचे घनवसी तळाच्या धनवसी टुकाशेजारी जैनांच्या पावापुरी तीर्थाची प्रतिकृती असे सुंदर जलमंदिर आहे एका टुकमध्ये काही मंदिरे व त्याभोवती भिंतीचा कोट असतो लहानगा टुकमध्ये तीनचार मंदिरे तर मोठ्या मोतीशा टुक-मध्ये १६ मंदिरे आहेत पश्चिमेकडील मुख्य आदिनाथ टुकमध्ये सर्वाधिक मंदिरे आहेत

या प्रत्येक टुकमागे श्रद्धा व त्याग यांचा इतिहास आहे त्यातील काही मनोवेधक प्रसंग असे आहेत सबचंदशेठ नावाचा प्रतिष्ठित मोठा व्यापारी वणथली नगरात फार वर्षांपूर्वी रहात होता त्याच्याकडे एका जमीनदाराने एक लाख सुवर्णमोहरा ठेव म्हणून ठेवल्या होत्या त्या नगरी-तील दुसऱ्या एका व्यापाऱ्याने त्या जमीनदाराचे कान भरले की तुझी सबचंदशेठजीजवळ ठेवलेली ठेव बुडाली त्यामुळे तो घाबरून सबचंदकडे आला त्यावेळी शेठजींची जहाजे दूरदेशात व्यापारासाठी गेलेली असल्याने खजिन्यात रक्कम शिल्लक नव्हती अपकीर्तीच्या भयाने सबचंद चिंताक्रांत झाला पण अंधारात प्रकाशाचा किरण दिसावा त्याप्रमाणे सबचंदला मार्ग सुचला अहमदाबादला सोमचंद नावाच्या धनाढ्य व्यापाऱ्याची मोठी पेढी होती प्रत्यक्ष परिचय नसताना व त्याच्याकडे खाते नसतानाही सबचंदने सोमचंदच्या नावावर हुंडी लिहून जमीनदाराला पाठवले जमीनदार सोमचंदकडे गेला थरथरत्या हाताने लिहिलेले हुंडीचे अक्षर व त्यावर अश्रूंचे पडलेले थेंब पाहून त्याच्या मनात माणुसकी जागृत झाली एका प्रतिष्ठित व्यापाऱ्याने विश्वास ठेवून ही हुंडी लिहिली हे त्याने जाणले खाते नसतानाही त्याने हुंडीचे पैसे जमीनदाराला दिले तो खूष होऊन



सय्यद सिद्दी जाळी, अहमदाबाद

↓ नखी सरोवर, माऊंट अबू





शत्रुंजय - जैनांची मंदिर नगरी, पालिटणा

परत गेला अशा प्रकारे माणुसकीमुळे मार्ग निघाला पुढे काही वर्षांनी सबचंदशेठची जहाजे परदेशातून व्यापारात खूप नफा कमवून परतली ती येताच सवचंद एक लाख सुवर्णमोहरा व त्याचे व्याज घेऊन अहमदाबादला सोमचंदशेठकडे गेला अडचणीच्या वेळी आपली लाज राखली याबद्दल त्याने कृतज्ञता व्यक्त केली तथापि सोमचंद ती रक्कम सव्याज परत घेईना कारण त्याने ती रक्कम आपल्या खाती टाकून दिली होती सबचंदही ही रक्कम परत न्यायला तयार होईना त्यातून एक मार्ग शोधून काढण्यात आला या रकमेत भर घालून शत्रुंजय टेकडीवर एक टुक बांधले तेथे मंदिरे उभारली दोघांच्या नावामुळे हे टुक सवासोमाजी टुक या नावाने प्रसिद्ध झाले तेथे बांधलेल्या सुंदर चौमुख मंदिरात आदिनाथ दादाची चौमुखी प्रतिमा आहे पहाडावरील हे सर्वात उंच शिखराचे मंदिर असून २५ मैलावरून दिसते

आणखी एक दुसरी मनोरंजक कथा अशी आहे मुंबईचे मोतीचंद नावाचे मोठे व्यापारी शत्रुंजयवर यात्रेला आले असताना त्यांना या पवित्र क्षेत्रावर एक मंदिर बांधण्याची इच्छा झाली पण पर्वतावर जागा नव्हती पर्वताच्या दोन्ही टेकड्या मंदिराने भरलेल्या ! त्यांना एक कल्पना सुचली दोन टेकड्यामध्ये एक खोल दरी होती तिला 'कुंतासनगाळा' असे नाव होते दरीत वरून पाहिल्यास हत्तीही चिमणी एवढा बारीक दिसे असे म्हणतात ती दरी भरून घेण्याचे त्यांनी ठरवले पहाडाच्या तळापासून हजारो मजूर लावून दगड, माती, पाणी यांची तीन मैलांची चढाची वाहतूक करून ती दरी लाखो रुपये खर्च करून भरून काढण्यात आली हे अवघड काम पूर्ण झाल्यावर टणक जमीन तयार करण्यात आली शत्रुंजय पहाडाच्या मध्यभागी वसलेले हे टुक मोतीशाची नावाने ओळखले जाते तेथे लहानमोठी १६ मंदिरे आहेत त्यापैकी नलिनी गुल्म या विमानाच्या आकाराचे मंदिर कलासौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे तेथे या मोतीशा टुकवर उंटाची एक दगडी मूर्ती उभी आहे तिच्या पोटाखालून, पायामधून जो जाईल तो पुण्यवान ' पापी माणसाला त्या लहान जागेतून पलीकडे जाता येत नाही असा समज आहे

शत्रुंजय पहाडावरील ही मंदिरे दर्शनासाठी सकाळी सातला उघडली जातात तर सायंकाळी सातला बंद होतात सकाळी नऊला जेव्हा अग्निपूजा होते त्यावेळी मूर्तीला दागिने चढवतात पावणे दहाला मूर्तीला स्नान घातले जाते त्यानंतर पावणेअकराला पूजेची वेळ असते दुपारी तीनला मूर्तीला रत्नाचे अलंकार चढविले जातात सायंकाळ झाली की पुजाऱ्यासकट अगदी सर्वजण टेकडीच्या पायऱ्या उतरून टेकडीला व मंदिरांना परमेश्वराच्या स्वाधीन करून पायथ्याशी येतात आणि गावात परततात ।

**अंगारशाह पीर**

जैन मंदिरे पाहून झाली होती परतताना अंगारशाह पीर दर्गा पाहिला ह्या पीरावर चांदीचे तसेच लाकडाचे असंख्य पाळणे चढवलेले दिसले निपुत्रिक स्त्रीपुरुष पीराला संततीसाठी नवस करतात त्यानंतर मूल झाल्यानंतर कुवतीप्रमाणे सोने, चांदी अथवा लाकडाचा पाळणा पीराला अर्पण करतात या अंगारशाह पीराबद्दल एक दंतकथा अशी सांगतात की अल्लाउद्दीन खिलजीने शत्रुंजयवर मंदिरे उध्वस्त करण्यासाठी चढाई केली होती त्यावेळी येथील मुस्लीम साधूने त्याला निरोप दिला की– " क्या दीन (म्हणजे इस्लाम धर्म) क्या जैन सब एक हैं। तुम इन मंदिरोंको मत तोडो। मैं इनका रखवाला हूँ।" पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून अल्लाउद्दीनने हल्ला करण्यास सुरुवात केली आणि काय चमत्कार ! पीराने वरून सेनेवर अग्नि-वर्षाव (अंगार) केला त्यामुळे फौज परत गेली व शत्रुंजयचे रक्षण झाले तेव्हापासून या पीराचे ' अंगारशाह पीर हे नाव रूढ झाले या दर्ग्याच्या ठिकाणाहून पालिटाणा शहराचे व आसमंतातील प्रदेशाचे दृश्य मनोहारी दिसते विशेषत सपाट मैदानातून वाहणाऱ्या शत्रुंजी नदीची रजतधारा मोहून टाकते

दुपारचे दोन वाजले होते टेकडीवरील असंख्य मंदिरे व अंगारशाह पीर पाहून पायऱ्या उतरायला सुरुवात केली कडक ऊन पडले होते सुमारे तीन हजार पायऱ्या व चढ चढल्याने पायात गोळे आले होते त्यामुळे उतरणेही त्रासदायक वाटत होते वाटेत दरिद्री, अपंग, वृद्ध, निराश्रित असे अनेक भिकारी केविलवाणेपणाने भीक मागत होते भीक मिळण्यासाठी

पराकोटीचे लाचार होणारे ते भिकारी पाहून मनाला वेदना होत होत्या असंख्य मंदिरात गुंतवलेले कोट्यावधी रुपये जर शैक्षणिक संस्था, रुग्णालये, वाचनालये, वृद्धाश्रम इ. साठी खर्च केले तर कितीजणांची सोय होईल असाही विचार मनात आला

टेकडीच्या तळाशी उतरल्यावर जवळच असलेल्या भोजनालयात पोहोचलो तेव्हा तीन वाजले होते कडकडून भूक लागली होती पण भोजनालयात भोजन देणे बंद झाले होते आणखी दोन-चार भोजनालयात फिरलो पण सर्वत्र भोजन बंद! मुले तर चांगलीच वैतागली टांगा करून पालिटाणा गावात हॉटेल शोधण्यासाठी निघालो गावातील अरुंद रस्ते, सर्वत्र असणारी कमालीची अस्वच्छता पाहून अधिकच वैताग आला मंदिराच्या ट्रस्टींनी हे गाव दत्तक घेऊन त्याला आधुनिक स्वरूप प्राप्त करून द्यावे हजारो यात्रिक नित्य जेथे येतात त्या गावाच्या सुधारणेसाठी पैशाचा ओघ वळेल तर किती बरे होईल एका दाक्षिणात्य हॉटेलमध्ये फराळाचे पदार्थ खाऊन बसस्टॅन्डवर भावनगरला जाण्यासाठी परतलो स्टॅन्ड गर्दीने फुलला होता बडोद्याप्रमाणेच बेशिस्तीचा कळस होता क्यू नाही काही नाही पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही धक्काबुक्की करून जागा पटकावीत होत्या आणि तसे करावेच लागत होते कारण त्याशिवाय गाडीत प्रवेश मिळणे अशक्य होते स्टॅंडवरील पोलीस निर्विकारपणे गर्दीकडे पहात होते धक्काबुक्कीत एक वृद्ध स्त्री चांगलीच चेंगरली गेली पण कुणालाच त्याचे काही वाटत नव्हते प्रयत्न करूनही आत घुसता न आल्याने दोन बसेस सोडाव्या लागल्या अखेर पाच वाजता बसमध्ये घुसण्यात यश मिळाले सायंकाळी सातला भावनगरला पोहोचलो उतरतानाही पुन्हा लोटालोट! बसमधून उतरलो तेव्हा युद्धभूमीवरून सुखरूप परतलेल्या सैनिकासारखे वाटत होते

◆ ◆



## नरसी मेहताचे जुनागढ

भावनगर स्टेशन रात्री ९ वाजता जुनागढला जाण्यासाठी सोडले वेरावळला जाणाऱ्या प्रवाशांसाठी राखून ठेवलेल्या डब्यातील शयनयानात जागा मिळाल्याने चिंता नव्हती पहाटे चारच्या सुमारास गाडी जेटलसर स्टेशनला पोहोचली सकाळी साडेसहाच्या सुमाराला तेथून निघालेली पॅसेंजर गाडी साडेसातला जुनागढ स्टेशनला पोहोचली तेव्हा जुनागढचा प्लॅटफॉर्म यात्रेमुळे जमलेल्या असंख्य यात्रेकरूमुळे गच्च भरलेला दिसला

सुदैवाने रिटायरिंग रूम मिळाली पटापट सामान उतरून खोली ताब्यात घेतली तासाभरात आवरले जुनागढच्या वास्तव्यात पहिल्या दिवशी जुनागढ गावाच्या परिसरातील विविध दर्शनीय स्थळांना भेट द्यायची होती स्टेशनजवळ रिक्षा ठरवली त्याला भेट द्यावयाच्या स्थळाची यादी सांगितली सर्व स्थळे दाखविण्याचे त्याने मान्य केले

जुनागढ हे गुजरातमधील प्राचीन शहर समजले जाते गिरनार पर्वताच्या पायथ्याशी वसलेले हे गाव वनराजींनी बहरलेले असल्याने कसे हिरवी चादर पांधरल्यासारखे वाटत होते

जुनागढचा इतिहास पौराणिक काळापासून सुरू होतो स्कद पुराणात गिरनार पर्वताचा उल्लेख आहे चिनी प्रवासी ह्यू-एन-त्सगने इ स. पूर्वी ६३५ मध्ये या गावाला भेट दिली होती त्याने लिहून ठेवले आहे की, " दहा मैलाचा घेर असलेल्या या गावात पन्नास मठ असून तीनशे भिक्षू राहतात या गावातील लोक श्रीमत आहेत " जुनागढचे सर्वात पूर्वीचे इतिहास कालीन नाव गिरीनगर इ स पूर्वी तिसऱ्या शतकात मगध देशाचा राजा चद्रगुप्त मौर्य याने सौराष्ट्रावर जेव्हा विजय मिळवला तेव्हा त्याने तेथील कारभारासाठी पुष्पगुप्त वैशाची नेमणूक केली पुष्पगुप्ताने जुनागढ येथे त्यावेळचा प्रसिद्ध सुदर्शन तलाव बाधला चद्रगुप्त मौर्य याचा नातू सम्राट अशोक याच्या इ स पूर्व २५६ च्या कारकोर्दीत सुदर्शन तलावाच्या बाजूच्या दगडावर कोरलेला शिलालेख आजही आढळतो इ स पूर्व दुसऱ्या शतकात माळव्याच्या शक राजाची ही राजधानी होती इ स च्या सातव्या आठव्या शतकानतर जुनागढ जीर्ण दुर्ग – जुना किल्ला या नावाने ओळखले जात असे त्यावेळी जुनागढ वस्ती नसल्याने उजाड होते त्यानतर गुजरात प्रांतातील पाटणच्या सोळखी राजाच्या कारकीर्दीत गिरनार नावाने हे शहर ओळखले जाई पधराव्या शतकात मुसलमानांनी या गावावर कब्जा घेतल्यावर किल्ले गिरनार या नावाने हे गाव सबोधले जाई अठराव्या शतकात ब्रिटिशाच्या काळात सध्याचे जुनागढ हे नाव रूढ झाले

**उपरकोट–जुनागढचा किल्ला**

ज्यावरून जुनागढ नाव पडले तो जुनागढचा उपरकोट नावाने ओळखला जाणारा प्राचीन किल्ला पहाण्यासाठी प्रथम निघालो उपरकोट किल्ला जुनागढच्या उत्तरपूर्व दिशेला स्टेशनपासून साधारण चार कि मी अतरावर आहे रिक्षाने किल्ल्याच्या अतर्भागातही जाता येते हा किल्ला भुईकोट आहे

यादवाच्या काळात बाधला गेलेला हा किल्ला पौराणिक काळात उग्रसेनगढ नावाने ओळखला जाई चंद्रगुप्त मौर्य याने त्याच्या कारकीर्दीत या किल्ल्यावर कब्जा मिळवला त्यावेळी किल्ल्याचे गिरीदुर्ग हे नाव प्रचलित होते सातव्या शतकानतर दुर्लक्षित झालेल्या या किल्ल्याची दुरुस्ती राजा नवघण याने दहाव्या शतकात केली त्याच्या मुलाने बाधलेली ' अडीचडी– वाव ' ही किल्ल्यातील मोठी बारव पहाण्यासाठी प्रथम गेलो

अडी व चडी या नावाच्या दोन सख्ख्या बहिणी राजा नवघण याच्या दासी होत्या त्यांच्या बलिदानानतर या प्रचड विहिरीला पाणी लागले त्यानतर अडीचडीवाव या नावाने ही विहीर ओळखली जाऊ लागली या विहिरीचे वैशिष्ट्य आहे तिच्या प्रचड तीनशेदहा फूट लाबीत । तिची खोली सव्वाशे फूट असून त्यात उतरण्यासाठी साठ फूट लाबीच्या पावणे- दोनशे पायऱ्या असलेला मार्ग आहे या विहिरीच्या एका टोकाला उभे राहिले की तिची प्रचड लाबी पाहून आपण चकीत होतो धन्य त्या दासी की ज्याच्या बलिदानामुळे ह्या विहिरीला पाणी लागले ।

त्यानंतर नजीकची गुफा पहायला आलो या गुफा बुद्धकालीन आहेत पहिल्या शतकात बाधलेल्या या गुफाचे छत सहा सुदर स्तभावर आधारीत आहे मध्ये अकरा चौरसफूट मापाचे कुड असून तीन बाजूला व्हराडा आहे तसेच बसण्यासाठी दगडी आसन आहे गुफेत उतरण्यासाठी असलेल्या दगडी पायऱ्या उतरून गुफेचा फेरफटका केला इ स तीनशेच्या सुमारास बाधलेला एक बौद्ध विहार तेथे होता

त्यानतर किल्ल्याच्या पश्चिम टोकावर पूर्वी बसवलेल्या दोन तोफा पहाण्यासाठी आलो त्यातील मोठ्या तोफेचे नाव ' नीलम ' असून तिची लाबी पधरा फूट आहे तोफेच्या तोडाचा व्यास साडे नऊ इच आहे पच धातूच्या या तोफेचे वजन एक टन आहे इ स १५३८ मध्ये पोर्तुगिजा- बरोबर झालेल्या युद्धात जुनागढच्या रक्षणासाठी ही तोफ गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याने बसविली असे गाईड म्हणाला दुसऱ्या तोफेचे नाव आहे कडानाल

नजीकच झाडाझुडुपानी वेढलेली एक जुनी मशीद आहे पूर्वी तेथ हिंदू राजाचे वास्तव्य होते उग्रसेन राजाच्या कारकीर्दीत तेथे राणकदेवीचा महाल होता या महालाला हिंदू शिल्प—पद्धतीचे दीडशे स्तंभ आहेत गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याने इ सन १४४२ च्या स्वारीत या महालाचे मशिदीत रूपांतर केले राजा व प्रधान याना बसण्यासाठी वेग-वेगळ्या ठिकाणी आसने असून त्याना संगमरवरी मोहरपी आहेत मशिदी-खाली नजीकच विहीर आहे धान्य साठवण्यासाठी असणारी प्रचंड तेरा कोठारेही आहेत

उपरकोट किल्ल्यातील नवघण कुआँ—विहीर म्हणजे किल्ल्यातील एक आश्चर्यच ! ही प्रचंड चौकोनी विहीर ३२ चौरस फूट मापाची असून तिची खोली १७१ फूट आहे ! विहिरीत उतरण्यासाठी दक्षिणेला बारा फूट रुंदीचा, २३६ पायऱ्याचा मार्ग दगड फोडून काढण्यात आला आहे त्याच-प्रमाणे पायऱ्या वळण घेत गेल्याने बाजूला विश्रांतीसाठी जागा आहे हवा प्रकाश येण्यासाठी व्हेंटीलेटर्स आहेत विहिरीत खाली उतरलेली माणसे वरून एखाद्या कबुतराच्या घरात बसावी अशी दिसत होती विहिरीच्या प्रचंड खोलीने थक्क झालो खाली पहाताना डोळे गरगरतात ही विहीर नवघण राजाने बांधल्याने तिला हे नाव देण्यात आले ती अजून उत्कृष्ट स्थितीत आहे गाईडने एक म्हण सांगितली—

अडी चडी ने नवघण कुवो ।
जे न जुए ई जीवतो मुवो ।।

अडीचडी व नवघण ह्या विहिरी ज्यांनी पाहिल्या नाहीत तो जिवंत असूनही मृतातच जमा धरावा

किल्ल्याच्या पूर्व बाजूला एक अवघड कडा आहे तो धक्काबारी नावाने ओळखला जातो पूर्वीच्या काळात गुन्हेगाराचा तेथून कडेलोट करून त्यांना शासन केले जाई

किल्ल्यात एक प्रचंड जलाशय असून तेथे डोंगरावरून येणारे पाणी साचवले जाते येथूनच सर्व गावाला पाणीपुरवठा केला जातो जलाशया-

तील नितळ पाणी पाहून मन अगदी प्रसन्न झाले बाजूला लांबवर दिसणारा गिरनारचा डोंगर लक्ष वेधून घेत होता सर्व किल्लाभर सीताफळाची असंख्य झाडे आहेत स्वस्त मिळालेली गोड सीताफळे खात किल्ल्याचा निरोप घेतला

**नरसी मेहतानो चोरो–**

उपरकोट किल्ला पाहून गुजरातचा प्रसिद्ध संतकवी नरसी मेहता याचे वास्तव्य जेथे असे त्या मंदिरात आलो हे मंदिर नरसी मेहतानो चोरो म्हणून ओळखले जाते चोरो म्हणजे मोठा ओटा, सर्वांनी एकत्र जमायची गावातील जागा पूर्व भागातील माजेवाडी गेटनजीक हे स्थान आहे याठिकाणी नरसी मेहता प्रवचन करीत असे

मंदिरात प्रवेश केल्यावर प्रथम दामोदरजी, गोपनाथ व काठेवाडी पगडी घातलेला नरसी मेहता याच्या मूर्ती आहेत नरसीचे उपास्य दवत श्रीकृष्णाचीही मूर्ती आहे ज्या गोलाकार आसनावर बसून नरसी प्रवचन करीत असे तो कट्टाही तेथे आहे बाजूला नरसी मेहतांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसगांचे चित्ररूप दर्शन करून देणारे छोटे सग्रहालय आहे त्यात नरसीच्या बालपणापासूनचे विविध प्रसग चित्रीत केले आहेत तेथील व्यवस्थापक रसाळ भाषेत त्या त्या चित्रावरून नरसीची जीवनकहाणी सांगू लागले

नरसी मेहताचा जन्म जुनागढ नजीकच्या तळाजा गावी नागर ब्राह्मण समाजात झाला नरसी जन्मत मुका होता वयाच्या सात वर्षापर्यंत त्याला बोलता येत नव्हते त्याची आजी सारखी काळजी करीत असे तिने एकदा नरसीला गावातील महादेवाच्या दर्शनाला नेले तेथे एका साधुपुरुषाच्या पायावर नरसीचे डोके ठेवले त्या साधूने नरसीला राधेशाम म्हणावयास सांगताच त्याला वाचा फुटली व नरसी राधेश्याम म्हणत भजन करू लागला हा बालक पुढे भगवताचा मोठा भक्त होणार आहे असे त्या साधु-पुरुषाने सांगितले नरसीच्या घरी त्याच्यापेक्षा वयाने १७ वर्षांनी मोठा असलेला भाऊ व त्याची कजाग बायको होती नरसीचा वयाच्या ९ व्या

वर्षी माणिकगौरी नावाच्या बालिकेशी विवाह झाल्यावर त्याच्या आजीने सुखासमाधानाने प्राण सोडला वयाच्या सोळाव्या वर्षी नरसीला कुँवरीबाई ही कन्या व नतर दोन वर्षांनी सामळदास हा पुत्र झाला

नरसी ससारात कधी रमलाच नाही लहानपणापासून भजनपूजनात तो सदैव मग्न असे गावातील महादेवाच्या मदिरात भजन करण्यात तो दग असे त्याच्या कजाग भावजयीच्या चिथावणीवरून त्याच्या मोठ्या भावाने त्याला घराबाहेर काढले जगलातून, काट्याकुट्यातून नरसी चालू लागला अतिशय थकून एका शकराच्या मदिरात तो गेला तेथील पिंडीवर सतत सात दिवस डोके टेकून तो आराधना करीत राहिला भगवान शकर प्रसन्न झाले त्याच्यासमोर प्रगट होऊन वर माग म्हणाले, त्यावर नरसी म्हणाला, "मला भगवान श्रीकृष्णाचे दर्शन घडवा" भगवान त्याला द्वारकेला घेऊन गेले तेथे श्रीकृष्णाचे अद्‌भूत दर्शन नरसीला घडले भगवान भक्ताच्या सभेत बसले आहेत नतर शरद पौर्णिमा आली आणि गोपाल कृष्णाचा रास तेथे अवतरला नरसी मुग्ध होऊन तन्मयतेने सर्व साक्षात अनुभवत होता नरसीनेही रासामध्ये मशाल धरली होती तिच्या ठिणगीने त्याची नाही पेटली आणि त्याचा हात जळू लागला तरीपण त्याला त्याचे भान नव्हते. श्रीकृणाच्या हे लक्षात आले व त्यानी त्याचा हात बरा केला श्रीकृष्ण म्हणाले, "तुझ्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे तुला काय पाहिजे तो वर माग" त्यावर नरसी म्हणाला, "देवा आपले दर्शन झाले हीच परम-भाग्याची गोष्ट ! मला पैसाअडका, दागदागिने, घरदार कशाचाही लोभ नाही मला फक्त आपली चरणसेवा करायची आहे"

त्यावर भगवान म्हणाले "मनुष्य जन्माला येतो तो परमेश्वर, पितर आणि समाज याची ऋणे घेऊन येतो पूर्वकर्मानुसार ही ऋणे फेडल्याशिवाय त्याला गती मिळत नाही तेव्हा तू परत जा ससार कर लोकाना परम-भक्तीचा, निष्काम कर्मयोगाचा आदर्श घालून दे शेवटी तू माझ्याजवळ आल्यावर तुला सद्‌गती मिळेल"

भगवतानी नरसीला आपली एक मूर्ती व भजनाकरिता चिपळ्याचा जोड दिला ते घेऊन नरसी तृप्तीने जुनागढला परतला नरसीने भोलानाथ

शंकराची कृपा, द्वारकागमन, द्वारकाधीश श्रीकृष्णाचे दर्शन, गोपीकृष्णाची अनुभवलेली रासक्रीडा इ. सर्व हकीकती स्वतःच्या 'शामळशानो विवाह' या आत्मचरित्रपर काव्यात सांगितली आहे.

मस्तकावर मोरपिसाचा मुकूट, हातात चिपळ्या व कृष्णमूर्ती अशा वेषात नरसी घरी परतला खरा पण त्याचा भाऊ व भावजय त्याला रागावून म्हणाले "घरात यायचे असेल तर हा विक्षिप्त वेष फेकून दे, नाहीतर येथून चालता हो." या कठोर शब्दांनी नरसी दु:खी झाला. प्राणप्रिय वस्तू तो फेकून कशा देणार? बायको-मुलांसह तो धर्मशाळेत आला. दु:खी पत्नीचे सांत्वन करीत नरसी भजनामध्ये गुंग झाला. रात्र झाली. भजनाचा आनंद मनसोक्त लुटून नरसी जमिनीवर अंग टाकणार तोच नरसीसमोर भगवंत एका अज्ञात शेठजीच्या रूपाने प्रगट झाले. नरसीकडून सर्व हकीकत ऐकताच त्यांनी नरसीसाठी एका घराची व्यवस्था केली. त्यात संसारोपयोगी सर्व वस्तूंची सोय केली. तसेच भजनपूजनाकरिता श्रीकृष्णाचे मंदिरही उभारून दिले. संसारात नरसीवर सारखी संकटे कोसळत असत. त्यावेळी भगवान विविध मानवरूपे धारण करून संकट निवारण करीत होते व भक्ताचे सत्त्व राखीत होते. नरसीच्या मुलीच्या लग्नातही सर्व पैसा, भांडी-कुंडी भगवंतानेच दिली.

नरसीच्या धर्मपत्नीच्या मृत्यूचा प्रसंग तर फार करुण आहे. एकादशीचा दिवस होता. तब्येत बरी नसतानाही ती पतीबरोबर भजनात सामील झाली होती. भजन संपले. त्यानंतर नरसी सायंस्नानासाठी बाहेर गेला. घरी परतत असताना एका अस्पृश्य भक्ताने त्याला घरी भजनाला बोलावले. त्याप्रमाणे नरसी त्याच्या विनंतीला मान देऊन त्याच्या घरी गेला. रात्रभर भजन केले. सकाळी घरी येऊन पहातो तर नरसीची धर्मपत्नी माणिकगौरी शेवटचे क्षण मोजत होती. एकवार नरसीकडे पाहून नामस्मरण करीत तिने प्राण सोडला.

**"बाईल मेली मुक्त झाली**
**देवे माया सोडविली"**

ही जशी संत तुकारामाची वृत्ती तीच या कृष्णभक्ताचीही होती या कारण प्रसंगानंतर आणखी एक संकट नरसीवर कोसळले अस्पृश्याच्या घरी जाऊन आल्यामुळे त्याच्या जातीबांधवांनी त्याला वाळीत टाकले

असे हे नरसीचे भक्तीपर जीवन ! काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ इ षड्रिपूपासून अलिप्त ! अनेक चमत्कारांनी भरलेले नरसीचे जीवन व संत तुकारामांचे चरित्र या दोहोत खूप साम्य आहे संत तुकारामांनी ज्याप्रमाणे सदुपदेशाने एका वारांगनेला भक्तीमार्गाला लावले व तिचा उद्धार केला त्याप्रमाणे नरसीने चंचला नावाच्या एका वारांगनेचा उद्धार केला नरसीची भजने तुकारामाच्या अभंगाइतकीच गोड आहेत नरसीचे एक भजन तर म गांधीना फार प्रिय होते—

**वैष्णव जन तो तेने कहिये**
**जो पीड पराई जाने रे**
**पर दु:खे उपकार करे तो**
**ये मन अभिमान न आन रे ।।**

या आणि संत तुकाराम महाराजाच्या

**जे का रंजले गांजले**
**त्यासी म्हणे जो आपुले**
**तोचि साधु ओळखावा**
**देव तेथेची जाणावा ।।**

या अभंगातील भावार्थ एकच ! तुकारामासारखाच नरसीचा अकारण छळ झाला त्याच्या भक्तीचा ' उन्माद ' उतरवण्यासाठी गावातील लोकांनी अनेक कारस्थाने करून त्याची फजिती करण्याचा प्रयत्न केला पण परमेश्वराने नाना चमत्कार करून नाना रूपे धारण करून भक्ताचे सत्त्व राखले

' नरसी मेहतानो चोरो ' च्या भेटीने गुजरातच्या या संतश्रेष्ठाच्या जीवनकार्याचा परिचय झाला व सात्त्विक समाधान मिळाले



**गीर गिरनार गरबा**

उपरकोट आणि नरसी मेहताच्या मंदिराची भेट आटोपेपर्यंत दुपारचा दीड वाजला होता. गुजराती पद्धतीच्या चवदार जेवणाने क्षुधाशांती केली. विश्रांतीची गरज होती. रिटायरिंग रूमवर परत आलो. दोन तास विश्रांती घेऊन चारच्या सुमाराला रिक्षाने जुनागढच्या मध्यवर्ती दिवाण चौकात आलो. तिथे पहायचे होते दरबार म्युझियम।

**दरबार म्युझियम**

जुनागढच्या महाबतखान नावाच्या नबाबाने १८५१ मध्ये बांधलेल्या भव्य इमारतीत हे म्युझियम आहे. महाबतखान हा जुनागढचा कलाप्रेमी नबाब। जुनागढ हे एक रमणीय शहर व्हावे यासाठी त्याने खूप प्रयत्न केले. त्याच्याच प्रेरणेने दरबार हॉल म्युझियमची स्थापना झाली.

म्युझियममध्ये प्रवेश केल्यावर पहिल्या मजल्यावर प्रथम दिसतो ऐंशी फूट लांब व चाळीस फूट रुंदीचा भव्य दरबार हॉल व त्यात मांडून ठेवलेल्या विविध उंची वस्तूंचा संग्रह। राजाचे बसायचे भव्य चांदीचे सिंहासन, राजदरबारात येणाऱ्या मान्यवर व्यक्तींसाठी असलेल्या चांदीच्या खुर्च्या, रंगीत किंमती गालिचा, छतावरील आकर्षक रंगीबेरंगी झुंबरे, मखमली पडदे इ. नी दरबार हॉल सजला आहे. कटग्लासचे टेबल, चांदीचे टी पॉय, चांदीचे पानदान, किंमती बेल्जियमचे आरसे, मौल्यवान घड्याळे, चांदीच्या नारळाची अत्तरदाणी इ. वस्तू चित्त वेधून घेतात. दिवाणखान्याच्या भिंतीवर शोकेसमध्ये नबाबांना मिळालेली विविध मानपत्रे दृष्टीला पडतात. दरबार हॉल जुनागढच्या नबाबाच्या वैभवाची साक्ष पटवून देतो.

दरबार हॉल नंतर आहे पालखीविभाग। या विभागात हत्तीवर बसण्यासाठी वापरात येणाऱ्या चांदीच्या विविध अंबाऱ्या अथवा चांदीचे हौदे (पालख्या) ठेवलेल्या आहेत. युद्ध शिकार अथवा खास समारंभप्रसंगी नबाब हे बारीक नक्षीकामाने सजलेले चांदीचे हौदे वापरीत. नबाबाच्या बेगमासाठी पडदे लावलेल्या बंद अंबाऱ्या असत. काही चांदीच्या हौद्यावर गणेश इ. हिंदूंच्या देवदेवतांची चित्रे कोरलेली आहेत. अंबारीवर चढण्यासाठी शिड्याही चांदीच्या असत.

त्यानंतरच्या शस्त्रागार विभागात विविध हत्यारे आहेत त्यात दिसतात विविध प्रकारच्या तलवारी, ढाली, गुप्ती, खंजीर, रायफली, भाले अंकुश, वाघनखे, कुऱ्हाडी, धनुष्यबाण, रिव्हॉल्व्हर, तोफा, मशिनगन्स इ । याच दालनात नवाबसाहेबाच्या विवाहप्रसंगी घातलेल्या मंडपाची प्रतिकृती आहे ती पाहून त्यावेळच्या मंडपाच्या भव्यतेची कल्पना येते

वस्त्रागार विभागात शाही पोषाखांचे विविध नमुने, गालीचे, हत्तीच्या सोंडेवर घालावयाच्या विविध झुली, चांदीची मूठ असलेली छत्री इत्यादी आहेत

या म्युझियममधील पिक्चरगॅलरी लांबच्या लांब एकशेचार फूट लांबीची व बारा फूट रुंदीची आहे त्यात दोन विभाग आहेत एक आहे छायाचित्रांचा विभाग व दुसरा तैलचित्राचा । शोकेसमध्ये निरनिराळ्या नवाबाच्या कारकीर्दीतील विविध ऐतिहासिक चित्रे आहेत याच विभागात जुनागढचा आठवा नवाब रसूलखान याचे भव्य तैलचित्र आहे त्याने जुनागढच्या विकासासाठी लक्ष घातले होते

जुनागढच्या शेवटच्या नवाबाचे नाव महाबतखान (तिसरा) हा कुत्र्याचा विलक्षण शौकीन होता कुत्र्याबरोबरचे त्याचे अनेक फोटो आहेत म्युझियममधील गाईड सांगत होता की नऊ बेगमा असलेल्या या शेवटच्या नवाबाने ९०० कुत्रे पाळले होते त्यासाठी प्रतिवर्षी लाखो रुपये खर्च येई त्याने कुत्रे ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारती बांधल्या होत्या त्यांच्यासाठी स्वतंत्र दवाखाना बांधला होता या नवाबाच्या एका आवडत्या कुत्रीच्या लग्नाची धामधूम काय वर्णावी ? त्याने या लाडक्या कुत्रीच्या लग्नाची आमंत्रण पत्रिका छापून त्या केवळ गुजरातमधील राजेरजवाड्यानाच पाठवल्या नाहीत तर दिल्लीच्या व्हाईसरॉयला व देशातील इतर संस्थानिकानाही पाठवल्या अर्थात दिल्लीच्या व्हाईसरॉयने नवाबाच्या या मूर्खपणाकडे दुर्लक्ष केले ते निराळेच । नवाबाने नियोजित वरकुत्र्याच्या स्वागतासाठी जुनागढ स्टेशनवर खास लाल गालिचा पसरला होता गावातील काही कुत्रे अलंकारांनी नटून सजवलेल्या हत्तीवर पालखीत बसवून मिरवणुकीने स्टेशनवर वराच्या स्वागतार्थ आणण्यात आले होते । गावातील लोकांना विवाहाप्रीत्यर्थ मिष्टान्नाचे भोजन दिले होते

असा हा कुत्र्याचा शौकीन नवाब । त्याच्या विक्षिप्तपणाला हसावे की रडावे कळत नव्हते त्याचे दिवाण होते सर शहानवाझ भुट्टो-पाकिस्तानचे दिवगत पतप्रधान झुल्फीकार अली भुट्टोंचे वडील । त्याचीही छायाचित्रे या गॅलरीत आहेत भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानतर या नवाबाने लोकेच्छा डावलून जुनागढचे पाकिस्तानात विलीनीकरण जाहीर केले व कुटुबियासह पाकिस्तानात पलायन केले शेवटी ७ नोव्हेंबर १९४७ ला जुनागढवर तिरगी झेंडा फडफडला व ते भारतात विलीन झाले या शेवटच्या नबाबाचे वशज पाकिस्तानात हॉटेल चालवितात अशी गाईडने माहिती दिली

दरबार हॉलची भेट खूपच आवडली होती मोजक्या दालनात मौल्यवान वस्तूचा सग्रह म्हणजे नयनाना मेजवानीच होती

**सक्कर बाग**

सक्करबाग ही जुनागढची जुनी प्रख्यात बाग तेथे प्रथम चक्कर मारली प्राणीसग्रहालयात । गुजरातमधील सर्वात जुने समजले जाणारे हे प्राणीसग्रहालय इ स १८६५ मध्ये स्थापन झाले तेथील वैशिष्ट्य म्हणजे तेथे गीरच्या सिंहांचे दर्शन होते तसेच त्याची पैदासही केली जाते व ते देशातील इतर प्राणीसग्रहालयात पाठविले जातात या प्राणीसग्रहालयात वाघ, चित्ते, मगरी, हरीण इ पशू व विविध पक्षी आहेत मुले रमली होती पण आम्हाला मात्र उत्सुकता लागली होती जुनागढचा आठवा नवाब रसूलखान यानी पाऊणशे वर्षांपूर्वी स्थापन केलेले तेथील म्युझियम पहाण्याची । या नवाबाचे भव्य तैलचित्र दरबार हॉल म्युझियमच्या पिक्चर गॅलरीत तर पाहिले होते त्याने सग्रह केलेल्या देशीविदेशी वस्तू या म्युझियममध्ये ठेवल्या आहेत

या म्युझियमच्या तळमजल्यावरील दालनात जुन्या हस्तलिखितांचा विभाग आहे सुप्रसिद्ध सतकवी नरसी मेहता याच्या ‘ मामेरा ’ या हस्तलिखिताची १७ व्या शतकातील नक्कलप्रत तेथे आहे ताडपत्रीवरील उडिया भाषेतील जुनी हस्तलिखिते तसेच सचित्र जैनपुराणाचे हस्तलिखित

इ  तेथे जतन केले आहे  या विभागात राजपुत शैलीतील गोपीवस्त्रहरण, रासक्रीडा इ  पौराणिक तसेच धार्मिक प्रसगावरील चित्रे आहेत  मोगल शैलीची चित्रेही आहेत

पुरातत्त्व वस्तू विभागात आहेत जुने बुद्धविहार, स्तूप इ  चे नमुने ! जैन तीर्थंकर, बुद्ध, सूर्य, कृष्ण, विष्णू इ  च्या १६ व्या शतकातील धातूंच्या प्रतिमाही खूप आहेत  जुन्या नाण्याचा तर मोठा सग्रह आहे  अभिलेख-विभागात जुने ताम्रपट, दगडात कोरलेले शिलालेख दिसतात  त्यावर जुन्या ब्राह्मी लिपीत तसेच सस्कृत, फारसी, गुजराती भाषेत कोरलेले लेख आहेत

एका दालनात सोनेरी तसेच रुपेरी, भरजरी, भरतकामाने नटलेले, फुलवेली, विविध भौमितिक आकृत्या, नक्षीकाम यानी भरगच्च मखमली शोभिवत गालिचे आहेत  शाही महालाच्या वैभवाची ते कल्पना देतात  काष्ठकला विभागात लाकडावरील विविध नक्षीकामाचे नमुने आहेत  त्यातील नक्षीकामाने कोरलेले पार्टीशन सुदर आहे  १७ व्या शतकातील जैन मडपाची प्रतिकृती गुजरातच्या प्रगत काष्ठकलेचा अद्वितीय नमुना समजला जातो  या जैन मडपात जैन तीर्थंकराच्या जीवनातील विविध प्रसग कोरले आहेत  हाँगकाँगमधील तयार केलेल्या एका आकर्षक पेटीवर बुद्धाच्या जीवनातील विविध प्रसग कोरले आहेत  पेटी उघडल्यावर त्यातून कर्पूराचा सुवास येतो  या पेटीचा उपयोग नबाब साहेबाची किमती वस्त्रे ठेवण्यासाठी होई

लोककला विभागात नाजूक मोतीकामाने केलेल्या सौराष्ट्रातील भरतकलेचे दर्शन होते  वस्त्रकला विभागात राजपूत शैलीचा घागरा, गुज-राती पद्धतीच्या बाधणी साडीचे विविध नमुने आहेत  अडीच किलो वजनाचे जरीचे ब्लाऊजही तेथे आहेत  जुनागढचा शेवटचा नबाब महाबतखान (तिसरा) हा कुत्र्याचा शौकीन !  त्याने आपल्या लाडक्या कुत्र्यासाठी तयार करून घेतलेल्या झुली हे येथील आणखी एक आकर्षण !

विदेशकला विभागात ग्रीक, इटालियन सगमरवरी कलाकृतींचे दर्शन होते  इजिप्तशियन सस्कृतीच्या स्त्रीची धातूची प्रतिमा रेखीव आहे  मायकेल एजेल यांच्या *Love and Soul* या जगप्रसिद्ध कलाकृतीची प्रतिकृतीही पहायला मिळाली


या म्युझियममधील सर्वात प्रेक्षणीय दालन आहे सिल्व्हर गॅलरी। त्यात चांदीच्या समया, नबाबाना मिळालेल्या मानपत्राच्या पेटचा, घोड्या-वर घालावयाचे अलकार, शिवपार्वतीच्या प्रतिमा, कोरीव काम असलेले चादीचे कुलूप, हातापायात घालायचे चांदीचे अलकार, चादीचा मिनी दर-बार, घोडागाडी, अत्तरदाणी, पखा इ अनेक कलात्मक वस्तू आहेत चादीचे पानदान तर मोटार, वीणा व पुस्तक यासारख्या निरनिराळचा आकारात पाहून मौज वाटली. सिल्व्हर गॅलरीप्रमाणेच ग्लास गॅलरीही वैशिष्टचपूर्ण आहे बेल्जियमचे खास ओरिजिनल आरसे हे काचविभागाचे एक आकर्षण आहे बेल्जियमच्या कपबशांवर नबाबाचे छोटे रगीत चित्र आहे ब्रिटिश राजमुद्रा *Heavens light our Guide* हे छानपैकी कोरलेली बशीही आहे काचेच्या विविधरगी व सुमारे अर्धालाख किमतीच्या आकर्षक झुंबराची शोभा काय वर्णावी ? केवळ काचा वापरून तयार केलेला फ्रीजही तेथे आहे मद्य भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोठमोठ्या चिनी मातीच्या भाड्याचा सग्रह तेथे आहे विविध आकारातील नाजूक फुलदाण्या, फ्लॉवर-पॉट्स शोभिवत आहेत

भारतातील ठिकठिकाणची विविध म्युझियम्स पाहिली होती पण येथील सिल्व्हर व ग्लास गॅलरी वैशिष्टचपूर्ण व आगळी वाटली अरेबियन नाईट्समधल्या एखाद्या जादूनगरीत तर आपण फेरफटका मारीत नाहीना असा भास होत होता

जुनागढ स्टेशनजवळ परतताना रिक्षावाल्याने केवळ पाचच मिनिटाच्या अतरावरील नबाब महाबतखानाच्या मकबऱ्याजवळ रिक्षा थांबविली इ स १८९९ मध्ये बाधलेल्या या मकबऱ्याचे वैशिष्टच आहे त्याच्या बाहेरील चार गोलाकार निमुळत्या मीनारामध्ये। या मीनाराना वर जाण्यासाठी आकर्षक गोलाकार जिने आहेत एखाद्या स्तभाला सापाने विळखे घालावे असे ते जिने वाटत होते

जुनागढचा पहिला दिवस उपरकोट किल्ला, नरसी मेहताचे मदिर, दरबार हॉल म्युझियम व सक्कर बागेच्या भेटीत आनदात सपला होता दुसऱ्या दिवशी सफर करायची होती गिरनारची। त्यासाठी पहाटे लवकर उठायला हवे होते रेल्वे रिटायरिंगच्या चौकीदाराला झोपण्यापूर्वी उद्या लवकर उठव म्हणून सूचना केली

◆ ◆



# गिरनारची सफर

पहाटे चारला चौकीदाराने हाका मारून उठवले गाढ झोपेतून खडबडून जागे झालो गिरनारवर चढायचे तर लवकर उठून, सर्व आवरून बाहेर पडणे आवश्यकच होते तासभरात आवरून पहाटे पाचला बाहेर पडलो स्टेशनवर गरम चहा घेऊन रिक्षाने पाच कि मी अंतरावरील गिरनारच्या पायथ्याशी पोहोचलो असंख्य यात्रेकरू उत्साहाने पर्वत चढण्यास सुरुवात करीत होते देशातील कानाकोपऱ्यातून आलेल्या या यात्रेकरूत सर्व जातीधर्मांचे, वयाचे स्त्री-पुरुष दिसत होते त्यातले अनेकजण पर्वतावर तीन दिवस परिक्रमा करीत फिरणार होते देव-दिवाळी, कार्तिक शुक्ल एकादशीला भवनाथ मंदिरापासून ही परिक्रमा सुरू होते आणि कार्तिक शुक्ल पौर्णिमेला भवनाथ मंदिराजवळ ही परिक्रमा संपते

हिमालय पर्वताच्या खालोखाल हिंदूंनी पवित्र मानलेला गिरनार हा पार्वतीचा भाऊ मानला जातो तसा पुराणात उल्लेख आहे दक्षप्रजापतीची कन्या सती-पार्वती हिचा विवाह हिमालयातील त्रिलोकनाथ शंकराबरोबर झाला त्यावेळी पार्वतीचा भाऊ गिरी याने विवाहप्रसंगी पाहुणे म्हणून आलेल्या देवांची उत्कृष्ट व्यवस्था केली चांगले आदरातिथ्य केले त्यामुळे

प्रसन्न होऊन गिरीला त्यांनी वरदान दिले की– "तू सर्व पर्वतात अधिक पवित्र मानला जाशील तुझ्यावर सर्व देवांचे वास्तव्य राहील तुझ्या परिसरात तपश्चर्या करणारांना तपसाफल्य व सिद्धी प्राप्त होईल तू गिरीनारायण या नावाने ओळखला जाशील " गिरीनारायण या नावाचा अपभ्रंश होऊन गिरनार हे नाव सध्या रूढ झाले यादवांनी जेव्हा मथुरा सोडून द्वारका वसवली तेव्हा गिरनार ही त्यांची लीलाभूमी होती गिरनार पर्वतावरील यात्रेचा प्रसंग साधून अर्जुनाने सुभद्राहरण केले

हिंदूप्रमाणेच गिरनार हे जैनांचेही पवित्र तीर्थस्थान मानले जाते जैनांचे २२ वे तीर्थंकर नेमीनाथ यांची दीक्षा, केवलज्ञान व मोक्षप्राप्ती – निर्वाण येथेच झाले शत्रुंजय-पालिटाणा येथे येणारे जैन यात्रेकरू बहुधा गिरनारला येतातच त्यासंबंधी खालील गुजराती दोहा प्रसिद्ध आहे

**जगमा तीरथ दो बडा, शत्रुंजय गिरनार**

**एक गढ ऋषभ समोसर्या, बीजे नेमीकुमार**

(जगात दोन तीर्थक्षेत्रे मोठी आहेत एक शत्रुंजय व दुसरे गिरनार एका पर्वतावर ऋषभदेव तर दुसरीकडे नेमीनाथ मोक्षास गेले )

शत्रुंजय पर्वताची यात्रा सफल व्हायची तर जैनांनी गिरनार चढायलाच हवा असे जैन धर्मशास्त्र सांगते हिंदू व जैनधर्मीयांनीही पवित्र मानलेला हा गिरनार चार हजार फूट उंचीचा व सत्तर चौरसमैलाच्या परिसराचा आहे

ठीक सहा वाजता गिरनारचा पहिला टप्पा चढण्यास सुरुवात केली हा टप्पा ४१०० पायऱ्यांचा आहे या पायऱ्या सहा-सात फूट लांबीच्या असून टप्प्याची उंची सहा इंच आहे जुन्या काठेवाडातील संस्थानिकांनी सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी हा रस्ता करून यात्रेकरूंची सोय केली पायऱ्या चढताना आजूबाजूच्या हिरव्यागार, तजेलदार निसर्गदर्शनाने उत्साह वाटत होता पायऱ्या चढताना वाटेत चहा, कॉफी, थंड पेये यांची दुकाने लागतात थंडगार पाणीही मिळते मुले पटापट पळत पुढे जाऊन आमची वाट पहात

थाबायची पायथ्याशी भाड्याने घेतलेली काठी टेकवीत पायऱ्या चढून पहिला टप्पा संपायला चार तास लागले तेथील जैन मंदिराचा समूह पहायचा होता

प्रथम श्री नेमीनाथ जैन मंदिराजवळ येऊन पोहोचलो हे गिरनारवरील सर्वात जुने तीर्थस्थान समजले जाते जैन पुराणानुसार नेमीनाथ हे कृष्णाचे चुलतभाऊ त्यांचा विवाह मथुरेचा राजा उग्रसेन याची कन्या राजमती हिच्याबरोबर ठरला होता विवाहाच्या मिरवणुकीच्या वेळी त्यांना मेजवानीसाठी बांधलेली मुकी जनावरे दिसली आपल्या विवाहाप्रीत्यर्थ त्याची हत्या होणार या विचाराने दु खी होऊन त्याना विरक्ती प्राप्त झाली संसाराच्या पाशात पडण्यापूर्वीच ते गिरनारवर आले आपले केस उपटून त्यानी दीक्षा घेतली त्यांना पुढे येथेच केवलज्ञान प्राप्त झाले त्याचे निर्वाणही येथेच झाले हे मंदिर अकराव्या शतकात सोळंखी राजाच्या काळात सज्जन नावाच्या मंत्र्याने बांधले मंदिरात नेमीनाथस्वामीची काळ्या संगमरवराची मूर्ती आहे तिच्या अंगावर मौल्यवान जडजवाहीर आहे मंदिराचा मध्यवर्ती मंडप रंगमंडप नावाने ओळखला जातो तेथील नक्षीदार स्तंभावर स्वस्तिक इ चिन्हे कोरली आहेत छतावरही दहा चौरसफूट मापाचे भव्य स्वस्तिक चिन्ह कोरले आहे शेजारी रासमंडप आहे तेथे एक पुरुष व पधरा स्त्रिया नृत्यात मग्न दाखविल्या आहेत चौदाव्या शतकातील तेथील शिलालेखावरून दररोज तेथे पूजा कशी करावी हे नमूद केले आहे.

नेमीनाथ मंदिराशेजारी प्रथम तीर्थंकर ऋषभदेव याचे मंदिर आहे तेथे भगवानांची बारा फूट उंचीची भव्य मूर्ती आहे शेजारी पार्श्वनाथ मंदिर असून या मंदिराचे छत व दरवाजावरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे एक मस्तक व पाच देह ही येथील प्रेक्षणीय कलाकृती आहे

जैन मंदिराच्या दुसऱ्या समूहातील कुमारपालचे मंदिर छोटेखानी असून त्याचे नक्षीदार स्तंभ आकर्षक आहेत तिसऱ्या समूहातील मंदिर १३ व्या शतकात गुजरातमध्ये राज्य करणाऱ्या विशालदेव याचा मंत्री वास्तुपाल याने बांधले आहे या मंदिराचे शिल्प सर्वोत्कृष्ट समजले जाते विशेषत मध्यवर्ती मंडपाच्या छताचे कोरीव काम प्रेक्षणीय आहे

भगवान नेमीनाथ याची सहधर्मचारिणी राजमती ऊर्फ राजुलदेवी हिच्या वास्तव्याची गुफा राजुलगुफा या नावाने ओळखली जाते

एकदरीत पहिल्या टप्प्यावरील सर्व जैन मदिरांची बाधणी एकाच प्रकारची वाटली तसेच जैन तीर्थंकरांच्या मूर्तीचे चेहरे एकसारखे वाटले या मूर्तीतील काही मूर्ती सगमरवरी होत्या मदिराची शिखरे पांढरीशुभ्र होती मदिरात आढळणारी शातता व स्वच्छता मात्र उल्लेखनीय आहे

जैनमदिरे पाहिल्यावर अर्धा तास विश्राती घेतली बहुतेक जैन यात्रेकरू दर्शन आटोपून परत गेले पुढचा टप्पा ७४० पायऱ्याचा होता ऊन वाढू लागले होते आमच्यासारखे पायऱ्या चढणारे उतरणाराना विचारीत होते की अजून किती पायऱ्या आहेत ? त्यावर 'खूप' असे उत्तर येई आणि चढणारे नर्व्हस होत डोलीतून जाणारेही बरेच दिसत होते डोली वाहून नेणारे घामाघूम झालेले दिसत होते आमच्याबरोबर भगव्या वस्त्रातील एक मध्यमवयीन व्यक्ती पायऱ्या चढत होती आम्ही सहज काय कुठून आलात अशी चौकशी करताच अस्खलित इग्लिशमध्ये त्याने बोलण्यास सुरुवात केली मग गप्पाच्या नादात जैन तत्त्वज्ञान, हिंदू तत्त्वज्ञान सोप्या पण प्रभावी इग्रजीत तो सागू लागला त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्या परिसरात तो 'इग्लिशबाबा' म्हणून ओळखला जाई त्याने स्वत चा एक स्वतत्र पथ स्थापन केला होता व आपले शिष्यगण अमेरिकेसारख्या देशातही आहेत असे तो म्हणाला इग्लिशप्रमाणे इतरही बऱ्याच भाषा त्याला येत होत्या गिरनारवर परिक्रमा करण्यास तो निघाला होता त्याचे शिष्य मात्र कुणी दिसत नव्हते दुपारचे बारा वाजले होते व आम्ही दुसऱ्या टप्प्यावरील श्री अबाजीमदिरात पोहोचलो होतो इग्लिशबाबाशी गप्पा मारता मारता पायऱ्या कधी सपल्या कळले नाही अखेर 'आपले कुणी शिष्य बरोबर दिसत नाहीत ?' ह्यानी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर न देताच इग्लिशबाबा झट्दिशी मदिरात जाऊन दिसेनासे झाले आम्ही थोडा वेळ विश्रांती घेऊन मग मदिरात प्रवेश केला

गिरनारवर श्री अबाजी म्हणजे पार्वती वास्तव्याला कशी आली याबद्दल पौराणिक आख्यायिका अशी आहे—पूर्वी पर्वताना पख होते पर्वत पक्षासारखे

उडू लागले म्हणजे देवदेवींना त्रास होई त्यामुळे इद्राने पर्वतांचे पख तोडून टाकण्यास सुरुवात केली पख तोडून टाकतील या भीतीने पार्वतीचा भाऊ गिरनार हा समुद्रात दडून बसला पार्वतीला गिरनारला भेटण्याची इच्छा झाली पण तो सापडेना भगवान शकर आणि विष्णु त्याच्या शोधार्थ निघाले त्यांना अतर्ज्ञानामुळे समजले की, गिरनार समुद्रात लपून बसला आहे भगवानाच्या आज्ञेने समुद्र मागे हटला गिरनार पुन प्रगट झाला आपला लाडका भाऊ गिरनार भेटल्याने पार्वतीला आनद झाला आपल्या भावाचे सरक्षण व्हावे, त्याला कोणापासून त्रास होऊ नये म्हणून पार्वतीने अबाजीच्या रूपाने गिरनारवर कायम वास्तव्य करण्याचे ठरविले म्हणून श्री अबाजीचे मदिर तेथे आहे मदिरातील देवी अबाजीची मूर्ती सिंदुराने माखलेली असून भव्य आहे तिला चादीचे डोळे आहेत समोर तिचे वाहन असलेल्या सिंहाची मूर्ती आहे या मदिरात अनेक नवविवाहित जोडपी दर्शनासाठी आलेली दिसली हे मंदिर गुप्तकालात बाधले गेले असा समज आहे या स्थानाला ५२ शक्तीपीठापैकी एका पिठाचा मान मिळाला कारण कैलासासारखे गिरीशिखर सोडून अबादेवी येथील शिखरावर राहायला आली म्हणून।

अबाजीचे दर्शन आटोपल्यावर बरेचसे यात्रेकरू परतू लागले खरे म्हणजे आम्हीसुद्धा पूर्ण थकलो होतो उल्का–उदय मात्र म्हणाले– 'इतका चढ चढलो शेवटपर्यंत जाऊ आता ' आम्हीही म्हटले 'परत कशाला येण होतय आपल ? आलो आहोत तर जाऊ वरपर्यंत।' चहाबिस्कीटे खाऊन जयअबाजी म्हणून शेवटचा साडेसहाशे पायऱ्याचा टप्पा चढू लागलो वाटेत जय गिरनार ! जय अबे। जय भवनाथ। अशा गर्जना ऐकू येत होत्या चढ चढताना वर निळे आकाश, खाली खोल दऱ्या साथ देत होत्या. त्यावेळी

उचो गढ गिरनार
वादळथी वातो करे।

( उच गिरनार गड ढगाशी गप्पा मारतो ) ह्या येथील लोकप्रिय म्हणीची आठवण झाली

पहाडाच्या मोठमोठ्या शिळाना वळसे घालत गोरखनाथ शिखरावर पोहोचलो गोरखनाथ हे गिरनारचे समुद्रसपाटीपासून ३६६२ फूट उच्च असलेले सर्वोच्च टोक । तेथे गोरखनाथाचे मंदिर आहे मंदिर पहाताच मनात आदरभाव उत्पन्न होतो तो इतक्या उंचीवर ते बांधणाऱ्या कारागिरा-बद्दल ।

गोरखनाथ हे मूळचे नेपाळचे नेपाळमधील गुरखा ( गोरखा ) ही जमात त्यांनीच निर्माण केली गोरखनाथ हे मच्छिंद्रनाथाचे पट्टशिष्य । मच्छिंद्रनाथ हे स्त्रीराज्यात रममाण झाले त्यांच्या शोधार्थ ' चलो मच्छिंदर, आया गोरखनाथ ' असा पुकारा करीत अनेक ठिकाणी भटकत भटकत गोरखनाथ गिरनारवर आले त्यांनी तेथे उग्र तपश्चर्या केली त्याचे फळ म्हणून त्यांना सिद्धी प्राप्त झाली गोरखनाथानी राजा गोपीचंद व राजा भर्तृहरी याना सदुपदेश करून त्याचा उद्धार केला मंदिरात योगीराज गोरखनाथ याच्या पादुका व धुनी आहे गोरखनाथ हे शिखर सुळक्यासारखे अरुंद असून तेथे जेमतेम पन्नास लोक बसू शकतात थोडाफार पाय घसरला की मोक्षप्राप्ती !

खर म्हणजे गिरनारच्या या सफरीत आता पूर्ण थकलो होतो पायात त्राण राहिला नव्हता पण मनाचा हिय्या करून साडेसातशे पायऱ्या चढून पुन उतरण्याचा चौथा टप्पा संपवला तेव्हा गुरुदत्तात्रय शिखरावर दमून-भागून पोहोचलो चढताना गुरुदेवदत्त, जय सीताराम इ घोषणा ऐकू येत होत्या शिखरावरील गुरुदत्तात्रयाच्या छोटेखानी मंदिरातील पादुकादर्शनाने तृप्त झालो

पुराणातील कथेप्रमाणे श्री दत्तात्रेय हे अत्रीऋषी आणि अनसूया याचे सुपुत्र अत्रीऋषींनी सर्व देवामधील सद्‌गुण ज्याच्या अंगी एकवटले आहेत अशा पुत्राच्या प्राप्तीसाठी घोर तपश्चर्या केली तेव्हा ब्रह्मा, विष्णू, महेश प्रसन्न झाले त्यानी अत्रीऋषींना वर मागण्यास सांगितले तेव्हा त्यानी तुमच्यासारखा पुत्र व्हावा असे वरदान मागितले पुढे यथाकाल अत्रीऋषींची धर्मपत्नी अनसूया प्रसूत होऊन दत्तात्रेयाचा जन्म झाला तो दिवस होता मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेचा।

ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन देवाच्या सद्‌गुणाचे एकत्रीकरण श्रीदत्तात्रेयात झाल्याने त्याना तीन मुखे व सहा हातही आढळतात श्री दत्तात्रेय म्हणजे पावित्र्य, साधेपणा, सेवावृत्ती, त्याग याचे प्रतीकच त्याचा महिमा अगाध आहे गिरनारच्या सिद्धभूमीवर त्यांचे वास्तव्य होते असे मानले जाते गुरु-दत्तात्रय शिखरावरच निरजन, रघुनाथ, किनाराम इ दत्तोपासकाला दत्ताचा साक्षात्कार झाला

गिरनारचा शेवटचा पाचवा टप्पा आहे तीनशे पायऱ्या उतरण्याचा व तेवढ्याच चढण्याचा ! शेवटी दत्तात्रेयाच्या धुनीपर्यंत पोहोचलो गिरनार उतरायला सुरुवात केली पर्वत दाट धुक्याने वेढला होता त्यामुळे उन्हाचा त्रास होत नव्हता आदल्या दिवशी पाऊस झाल्याने हवेतही गारवा होता वरून दिसणारे सृष्टिसौंदर्य अपूर्व, चिरस्मरणीय आहे हिरव्यागार वृक्षानी वेढलेला गिरनार पाहून थकवा कुठल्याकुठे पळतो पायथ्याशी असलेले जुनागढ शहर पर्वताच्या कुशीत पहुडल्यासारखे वाटत होते

गिरनार उतरताना पायात विलक्षण गोळे आले होते पाय लटपटत होते पायथ्याशी पोहोचलो तेव्हा सायकाळचे सहा वाजले होते गिरनारची यात्रा सपली होती

प्रसादाची खरेदी करून परतताना दामोदर कुडाजवळ थाबलो हे कुड पौराणिक कथेनुसार कृष्णाचा नातू वज्रनाथ याने बांधले येथे सतकवी नरसी मेहता याने स्नान केले व श्रीकृष्णाने नरसीच्या गळयात पुष्पहार अर्पण केला असे म्हटले जाते २७५ फूट लाब व ५० फूट रुदीच्या या कुडा-भोवती दगडी पायऱ्याचा घाट आहे कुडात स्नान करणारे यात्रेकरू दिसत होते या कुडात अस्थीविसर्जन केले जाते कारण कुडातील पाण्यात हाडे विरघळून जातात कुंडाच्या बाजूला थोडया अतरावर श्रीभवनाथ महादेवाचे मदिर आहे तेथे महाशिवरात्रीला मोठा मेळावा भरतो

### सम्राट अशोकाचा शिलालेख

गिरनारची भेट आटोपून परत जुनागढ स्टेशनकडे परतताना वाटेत सम्राट अशोकाचा शिलालेख पहाण्यासाठी उतरलो कलिग युद्धानतर सम्राट अशोकाने बुद्धधर्म स्वीकारला बुद्धधर्माच्या प्रचारासाठी लोकाना त्याने सर्व भारतात व भारताबाहेरही पाठविले हिंदुस्थानच्या चारी दिशांना चौर

ठिकाणी त्याने या आज्ञा कोरल्या त्यापैकी पश्चिमेचे हे स्थान गिरनारच्या वाटेवर स्टेशनपासून सुमारे चार कि मी अतरावर आहे


अशोकाचा शिलालेख ज्यावर कोरला आहे त्याचा शोध कर्नल टॉड या इग्रजाने १८२२ मध्ये लावला ह्या प्रचड खडकाचा घेर आहे सुमारे ७५ फूट तर जमिनीपासून उची १२ फूट । तो लालसर ग्रानाईट आहे त्याच्या-वर ब्राह्मी लिपीत १४ लेख कोरले आहेत ऊन, वारा, पाऊस यापासून सुरक्षित रहावा व जतन व्हावा म्हणून या खडकाभोवती दगडी इमारत बाधली आहे तसेच आत शिलेभोवती कठडा आहे त्यामुळे प्रेक्षकाना चारी बाजूंनी फिरून शिलालेख पहाता येतो

या दगडाच्या उत्तरपूर्व भागात मौर्यसम्राट अशोक याच्या राजाज्ञा कोरलेल्या आहेत त्यात पशुहत्या करू नये, भूतदया दाखवावी, नैतिक मूल्यांची जपणूक करावी, ब्राह्मण आणि श्रमण, पालक यांना मान द्यावा, अहिंसा पाळावी, मुलास व नोकरास योग्य वागणूक द्यावी, सर्वधर्मसहिष्णुता पाळावी, शाततेचे पालन करावे इ आज्ञा कोरल्या आहेत

याच पाषाणाच्या पश्चिम बाजूला रुद्रदामनचा शिलालेख आढळतो त्यावर चद्रगुप्त मौर्याने बाधले या सुदर्शन तलावाचा उल्लेख केला आहे या सुदर्शन तलावाचे महापुरामुळे कसे नुकसान झाले याचाही उल्लेख आहे प्रजेवर कर न बसविता तो दुरुस्त केला ही माहितीही कोरली आहे या खडकाची उची अकरा फूट असून रुदी साडेपाच फूट आहे शिलालेख ब्राह्मी व सस्कृत भाषेत आढळतो तिसरा शिलालेख उत्तरपश्चिमेला असून तो गुप्तसम्राट स्कदगुप्त याचा आहे त्यात परत पुरामुळे फुटलेल्या सुदर्शन तलावाचा तसेच तेथील अधिकाऱ्याने तो दुरुस्त करून घेतल्याचा उल्लेख आहे या तिन्ही शिलालेखाच्या मजकुराचे इग्रजी व हिंदी भाषातर बाजूला भितीवर फ्रेममध्ये लावले आहे

अशोकाचा शिलालेख पाहून स्टेशनवर पोहोचलो दोन घास कसेबसे पोटात ढकलले शरीर विलक्षण थकले होते पाय तर नुसते ठणकत होते रूमवर जाऊन प्रत्येकाने कपडे बदलून गादीवर अग टाकून दिले उद्याचा दिवस पूर्ण विश्राती घ्यायची असा निर्णयही सर्वांनीच जाहीर केला

◆ ◆



# अजरामर सोमनाथ

एक दिवस पूर्ण विश्राती घेतल्यानतर दुसऱ्या दिवशी सकाळी स्टेशनवर आलो साडेसात वाजता वेरावळकडे जाणारी गाडी जुनागढच्या प्लॅटफॉर्मवर आली वीस मिनिटानी वेरावळ स्टेशनकडे जाण्यासाठी गाडी निघाली यात्रेकरूनी गाडी गच्च भरली होती हमालाच्या कृपेने बसायला चागली जागा मिळाली होती एक दिवस पूर्ण विश्रांती घेतल्याने उत्साह वाटत होता सोमनाथ मदिर पहायला मिळणार या कल्पनेनेच शरीरावर रोमाच उठले

सोमनाथ मदिर ! भारताच्या इतिहासातील एक धगधगते प्रकरण ! भयानक विध्वस आणि कठोर प्रतिकार याचा ज्वलत इतिहास गेले हजार वर्षे पाहिलेली भूमी ! मन नुसत अधीर झाल होतं सोमनाथच्या दर्शनाला

जुनागढ ते वेरावळ मार्गावर वाटेत केसोद हे एक महत्वाचे स्टेशन-लागते पूर्वी नबाबाने बाधलेल्या विमानतळाचा उपयोग सध्या मुबईकडे

जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या विमानासाठी होतो गाडी अकराच्या सुमाराला वेरावळ स्टेशनवर थांबली वेरावळ हे पश्चिम रेल्वेचे पश्चिम किनाऱ्या-वरील शेवटचे स्टेशन ! तसेच वेरावळ हे बंदरही आहे सध्या वेरावळ हे तालुक्याचे ठिकाण असून येथील लोकसंख्या सुमारे पाऊणलाख आहे स्टेशन वर उतरून थोडे पायी चालत मुख्य रस्त्याच्या कोपऱ्यावर पोहोचलो तेथून लगेच प्रभासपट्टणला जाणारी बस मिळाली वेरावळ ते प्रभासपट्टण हे अंतर केवळ ८ कि मी असून सोमनाथचे प्रख्यात मंदिर प्रभासपाटण गावाच्या नैऋत्य दिशेला आहे

## प्रभासतीर्थ

प्रभासपाटणचा इतिहास पौराणिक काळापासून सुरू होतो वेदकाळ-पूर्वी प्रभास हे महत्त्वाचे बंदर होते पर्शियन गल्फ प्रदेशाशी येथून व्यापार चालत असे चंद्रवंशीय आर्यांच्या काळात ते सोमतीर्थ नावाने ओळखले जाई समुद्रकिनारी असलेल्या या स्थानी सूर्य व चंद्र यांचे एका विशिष्ट कोनातून पडणारे किरण अधिक प्रकाशमान वाटतात म्हणून प्रभास हे नाव पडले असे मानले जाते तर स्कंदपुराणात चंद्राचे गेलेले तेज येथे प्राप्त झाले म्हणून प्रभास नाव पडले असा उल्लेख आहे त्यामागील पौराणिक कथाभाग असा आहे

ब्रह्मदेवाचा मानसपुत्र दक्ष प्रजापती याला २७ कन्या होत्या त्यांचा विवाह सोमाशी म्हणजे चंद्राशी झाला होता या कन्या म्हणजे २७ नक्षत्रे त्यात रोहिणी सर्वात सुंदर ! रोहिणीखेरीज इतर २६ जणींकडे चंद्र दुर्लक्ष करीत असे तेव्हा इतर कन्या दक्ष प्रजापतीकडे गेल्या व त्यांनी आपले गाऱ्हाणे सांगितले त्याने संतापाच्या भरात चंद्राला शाप दिला की तुला क्षय लागेल त्यामुळे चंद्र झिजू लागला त्याने दक्षप्रजापतीची क्षमा मागि-तली मग दक्षाने उःशाप दिला की सोमाने सर्व पत्नींशी समान वागणूक ठेवावी सरस्वती नदीच्या पावन तीर्थामध्ये त्याने स्नान करावे म्हणजे त्याचा देह वाढू लागेल मात्र पौर्णिमेनंतर तो पुनः क्षीण होईल व अमावस्येनंतर पुनः त्याचे तेज त्याला हळूहळू प्राप्त होईल

सोमाने येथील सरस्वती नदीच्या तीर्थक्षेत्री अमावस्येला स्नान केले. शकराची पूजा केली सोमनाथ नावाच्या लिंगाची स्थापना केली तो कला-कलानी वाढू लागला व शीतकिरणानी युक्त असे तेज त्याला पुन प्राप्त झाले असे हे तेजोदायक तीर्थ प्रभास या नावाने प्रसिद्ध आहे भास्करतीर्थ, सोमनाथपूर, सोमतीर्थ, चद्रप्रभास इ आणखी त्याची नावे आहेत सौराष्ट्राच्या दक्षिणेकडील प्राताचे म्हणजे हल्लीच्या जुनागढ जिल्ह्याचे पूर्वीचे नाव सोरथ म्हणून सोरटी सोमनाथ या नावानेही प्रभासपाटण ओळखले जाई

प्रभासपाटणचा उल्लेख महाभारतातही आहे श्रीकृष्णाचा मोठा भाऊ बलराम याने प्रभासची दोनदा तीर्थयात्रा केली द्रौपदी व धर्मराज याच्या एकाताचा भग केल्यामुळे पाडवांमध्ये आपापसात ठरलेल्या सकेताप्रमाणे अर्जुनाने तीर्थयात्रा केल्या तीर्थयात्रा करताना तो प्रभासला आला व त्याला येथेच सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी ठरवण्यात आला आहे ही वार्ता कळली कविवर्य मोरोपत यानी ' सुभद्राहरण या आपल्या आख्यानातील आर्येत म्हटले आहे—

तीर्थे हिडत गेला धर्मानुज अर्जुन प्रभासला ।
आप्तप्रमुखे निजमातुलकुल वृत्तांतासि ऐकता झाला ।।

यादवांचा सहार व द्वारकेचा विनाश अटळ आहे असे भगवान श्रीकृष्णांनी जेव्हा जाणले तेव्हा त्यानी यादवाना आगामी सकटाची सूचना दिली की द्वारकेत मोठा उत्पात होणार आहे द्वारका समुद्रात बुडणार आहे तरी यादवांनी द्वारका सोडून प्रभासला रहावे

असे हे पौराणिक काळापासून प्रसिद्ध असलेले प्रभासपाटण[1] याच्या-भोवती चालुक्यकालीन किल्ल्याची भित आहे भोवताली खदक आहे सध्या तो अर्थातच कोरडा आहे या किल्ल्याच्या भितीला पूर्व व पश्चिम दिशेला दोन प्रवेशद्वारे होती गझनीच्या महमुदाने सोमनाथ स्वारीसाठी पूर्वेकडील प्रवेशद्वारातून प्रवेश केला प्रभासपाटण गावाच्या बाहेरून बसमधून जाताना किल्ल्याची भित दिसत होती बस सोमनाथ मदिरासमोरील आवारात

थाबली मोठ्या उत्सुकतेने मंदिराच्या महाद्वारातून प्रवेश केला आजचे नवे सोमनाथ मंदिर हे सातवे मंदिर मनामध्ये जुन्या रोमहर्षक इतिहासाच्या आठवणींनी कल्लोळ उठून गेला

**सोमनाथमंदिर**

सोमनाथमंदिर वेदकाळापासून प्रसिद्ध आहे वेदकाळात सोमराजाने सोमनाथचे सुवर्णमंदिर बांधले पुढे त्याचा नाश झाला त्रेतायुगात शिवभक्त रावणाने रौप्यमंदिर बांधले पुढे त्याचाही नाश झाला महाभारतकाळात श्रीकृष्णाने हे मंदिर चंदनाच्या लाकडाचे बांधले कालांतराने तेही नष्ट झाले

इ स च्या दुसऱ्या शतकात सोमनाथचे पहिले मंदिर या प्रभास-तीर्थावर बांधले गेले ते शिवोपासनेचे केंद्र होते त्यानंतर सातव्या शतकात पहिल्या जीर्ण झालेल्या स्थानावर दुसऱ्या मंदिराची निर्मिती झाली

सोमनाथचे तिसरे मंदिर चालुक्य राजाच्या काळात चौथा धारसेन याने इ स च्या आठव्या शतकात बांधले लाल तांबडसर पाषाणांनी हे विशाल मंदिर बांधले गेले त्यावेळी सोमनाथचे महात्म्य खूप होते त्यानंतर दोन शतके सोमनाथचे हे मंदिर अतिशय वैभवाने तळपत गेले मंदिरासाठी वापरलेले पत्थर इतके गुळगुळीत व घोटीव होते की त्यात प्रतिबिंब चमकत असे मंदिराचे स्तंभ रत्नजडित होते मंदिराचे गोपूर तेरा मजली होते व त्यावर सुवर्णकलश होते मुख्य सोमनाथ लिंगाखेरीज निरनिराळ्या आकाराची लिंगे व मूर्ती सोन्याच्या व रत्नाच्या होत्या गर्भगृहातील दीप सोन्याचांदीचे असून रत्नजडित होते पिंडीखाली भुयारात शतकानुशतके संग्रहीत केलेली, भक्तांनी अर्पण केलेली कोट्यवधी रुपयांची संपत्ती होती मंदिरासमोरची सुवर्ण शृंखला दोनशे मण वजनाची होती मंदिराचे २०० स्तंभ मौल्यवान रत्नांनी सजले होते मंदिरासाठी दहा हजार गावांचे उत्पन्न लावून दिले होते सोमनाथपूजेसाठी हजार ब्रह्मवृंद नेमले होते तर नृत्यगायनासाठी होत्या साडेतीनशे देवदासी त्यापैकी एक होती चौलादेवी सोमनाथच्या मंदिरातील नृत्यचंद्रिका ! चंद्रलोकातील नर्तिका चौलादेवी आकाशात विहार करीत

असताना चुकून चंद्रमौलीश्वर सोमनाथच्या मंदिरावरील ध्वजाला तिचा पदस्पर्श झाला त्यामुळे संतप्त झालेल्या चंद्राकडून ती शापभ्रष्ट झाली प्रायश्चित्त म्हणून भूतलावर सोमनाथच्या मंदिरात सोमनाथची सेवा करण्यास ती अवतरली तेथे राजा भीमदेवाची आणि तिची भेट झाली मंदिराची मुख्य देवनर्तकी म्हणून तिची नेमणूक करण्यात आली मंदिरातील पुजाऱ्याचा शिष्य नटनंदी चौलादेवीच्या प्रेमात पडला पण चौलादेवीने त्याला उत्तर दिले-- " मी एक वीज ! एक झरा ! एक वाऱ्याची झुळूक ! कुठेही बांधलेली नाही आणि साक्षात परमेश्वराची बांधिलकी मात्र मानणारी मी अन्य कुणाच्या हातीही लागणार नाही " दरम्यान राजा भीमदेवही चौलादेवीवर अनुरक्त झालेला असतो त्यामुळे नटनंदी अधिकच मत्सराने पेटतो एवढ्यात सोमनाथवर मुसलमानांचे आक्रमण होते चौलेच्या प्राप्तीसाठी कोणतेही दुष्कृत्य करण्यास सिद्ध झालेला नटनंदी आक्रमकाना फितुर होतो त्यामुळे प्रथम राजा भीमदेवाचा त्यात पराभव होतो खचलेल्या मन स्थितीत तो आत्महत्त्येसही प्रवृत्त होतो अशा वेळी राजा भीमदेवाला प्रेरणा व प्रोत्साहन द्यायचे काम चौलादेवी करते त्यामुळे उत्साहित होऊन तो यावनी हल्याला समर्थपणे तोंड देतो नटनंदीलाही आक्रमकांकडूनच फंदफितुरीबद्दल शिरच्छेदाची शिक्षा मिळते आक्रमकानी उध्वस्त केलेले सोमनाथ मंदिर पुन आकार घेऊ लागते याच अवधीत शापभोगाची मुदत संपलेली चंद्रलोकीची प्रसन्नशलाका चौलादेवी गगनांगणात विहार करण्यास परत जाते !

## विध्वंस आणि प्रतिकार

सोमनाथच्या वैभवाची कीर्ती अफगाणिस्तानातील गझनीच्या पराक्रमी महमुदाच्या कानी गेली इ स १०२५ च्या ऑक्टोबर महिन्यात तो गझनीहून निघून सिंधू नदी ओलांडून ६ जानेवारी १०२६ ला सोमनाथला पोहोचला आठ दिवस घनघोर लढाई झाली हिंदूंनी अपूर्व शौर्याने कडवा प्रतिकार केला पन्नास हजाराच्यावर हिंदू युद्धात ठार झाले पण अखेर त्यांना पराभव पत्करावा लागला गझनीच्या महमुदाने मंदिरात विजयोन्मादाने प्रवेश केला त्यावेळी मंदिराच्या पुजाऱ्यानी टाहो फोडून सांगितले--

शिवलिंगाच्या वजनाइतके सोने देतो पण ते फोडू नका पण मूर्तीभजक महमूदाने स्वत शिवलिंग फोडून त्याचे चार तुकडे केले त्यातील दोन त्याने नतर मक्का मदिनाला नेले तर दोन गझनीला जुम्मामशिदीच्या दारापुढे ठेवले तसेच चदनी दरवाजे पण नेले फोडलेल्या शिवलिंगाच्या पोकळीत असख्य हिरेमाणके रत्ने होती ती खळखळ बाहेर पडली त्याने हिरे, माणके, मोती उटावर लादून नेली मदिर पूर्ण उध्वस्त करून लुटले अमाप सपत्ती घेऊन गझनीचा महमूद कच्छच्या रणातून सिंध प्रातातून परत गेला खरा पण वाटेत हिंदू राजानी त्याचा पाठलाग केला त्यामुळे त्याचे हाल झाले तो हालअपेष्टा सहन करीत परतला

सोमनाथच्या या पहिल्या विध्वसात तिसरे मदिर नष्ट झाले या भयानक विध्वसानंतर गुजरातचा हिंदू राजा परमदेव व भीमदेव यानी इ स १०२० ते १०४० च्या दरम्यान मदिराच्या पूर्वीच्या चौथऱ्यावर पाढरा पाषाण वापरून नवे मदिर बाधले अकराव्या शतकात या मदिराची कीर्ती परत सर्वत्र पसरली मुसलमानाच्या मक्का मदिनेइतके हिंदूचे हे पश्चिम किनाऱ्यावरील मदिर पवित्र समजले जाऊ लागले

त्यानतर बाराव्या शतकात चालुक्यवशीय कुमारपाल या राजाच्या आश्रयाखाली सोमनाथचा भक्त भवबृहस्पती याने मदिराची पुनर्रचना करून देवालयाचा विस्तार केला त्याने सोमनाथमदिरासमोर सुदर स्तभाचा मडप बाधला राजासाठी सभागृह बांधले शुद्ध पाण्यासाठी जलाशय बांधला सोमनाथचे हे पाचवे मदिर !

तेराव्या शतकात दिल्लीच्या तख्तावर अल्लाउद्दीन खिलजी राज्य करीत होता त्याची सेना प्रदेश काबीज करीत करीत गुजरातमध्ये शिरली लूटमार करीत सेना प्रभासपाटणपर्यंत पोहोचली पुन सोमनाथवर आक्रमण झाले ! मदिराच्या रक्षणासाठी राजपूत सैनिकानी पराक्रमाची शर्थ केली व सोमनाथसमोर आत्मसमर्पण केले परत मुसलमान आक्रमकाचा विजय ! मुसलमान सेनापती आसफखान मदिर फोडून आत शिरला शिवलिंगाचे तुकडे तुकडे केले ते त्याने दिल्लीला नेले त्याचा आपण चुना बनवू हे त्याचे उद्दाम उद्गार ! सोमनाथने पाहिलेला हा दुसरा विध्वंस ! सोमनाथचे पाचवे मदिर उध्वस्त झाले

जुनागढचा चुडासमा वंशातील राजा महिपाल याने मंदिराची पुनर्निर्मिती केली व त्याच्या मुलाने चौदाव्या शतकाच्या मधल्या काळात लिंगाची स्थापना केली यानंतरच्या काळात गुजरातमधील अहमदाबाद--कर्णावती येथे सुलतानशाही स्थापन झाली महमूद बेगडा या हिंदूद्वेष्टया जुलमी सुलतानाची पधराव्या शतकात सोमनाथवर वक्र दृष्टी वळली त्याने सोमनाथवर स्वारी करून शिवलिंग फोडले मंदिर भग्न करून त्याच्या चबुतऱ्यावर मशीद उभारली मंदिरावर मशीद उभारून सोमनाथचे पावित्र्य पुन एकदा नष्ट करण्यात आले

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला परत लिंगस्थापना करून धार्मिक विधी, पूजाअर्चा इ सुरू झाले त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर मोगल सम्राट अकबर होता त्याच्या सहिष्णू धोरणाने नतरचा काळ शांततेत गेला

अठराव्या शतकाच्या सुरुवातीला धर्मवेडया औरंगजेबाच्या काळात त्याचा सेनापती मुअज्जम याने सोमनाथचे लिंग पुन उखडले सोमनाथचा हा शेवटचा विध्वस ।


यानतर गुजरातमध्ये मराठ्याचा अमल सुरू झाला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर याना स्वप्नात दृष्टात झाला त्याप्रमाणे जुन्या भ्रष्ट, भग्न सोमनाथ मंदिरासमोर लहानसे मंदिर इ स. १७८३ मध्ये बाधण्यात आले तळघरात शिवलिंगाची स्थापना करण्यात आली सोमनाथचे हे सहावे मंदिर आजही असून तेथे धार्मिकविधी, पूजाअर्चा होते

नतर सुरू झाला इग्रजांचा अमल । १९४७ साली त्याच्या गुलामगिरीतून भारत मुक्त झाला स्वातन्त्र्य मिळाले पण भारताची फाळणी झाली पाकिस्तानची निर्मिती झाली शेवटचा नबाब महाबतखान याच्या आडमुठ्या धोरणामुळे जुनागढचे भारतात विलीनीकरण झाले नव्हते उलट त्याने जुनागढचे पाकिस्तानात विलीनीकरण जाहीर केले व स्वत ही पाकिस्तानात पळून गेला पण लोकाच्या खबीर धोरणामुळे व विरोधामुळे जुनागढचे भारतात कायदेशीर विलीनीकरण झाले कै सरदार वल्लभभाई पटेल, कै न वि ऊर्फ काकासाहेब गाडगीळ जामनगरचे अधिपती नबाबसाहेब याच्या समवेत वेरावळला आले होते त्यावेळी समुद्रकिनाऱ्यावर फिरत

असताना सोमनाथचे भग्न मदिर त्याच्या दृष्टीस पडले त्याच वेळी त्यानी मदिराची पुनर्निमिती करण्याचा निश्चय केला १५।११।४७ ला या भग्न मदिरासमोर एक सभा भरविण्यात येऊन हे मदिर पुन' बांधण्याचा निर्णय घेण्यात आला स्व कन्हैय्यालाल मुन्शी विश्वस्तपदाचे अध्यक्ष होते नव्या मदिरासाठी जामनगरच्या अधिपतीनी एक लाख रुपयाची देणगी दिली तर जुनागढच्या लोकसत्ताक शासनाचे प्रमुख सामळदास गाधी यानी अर्धा लाख रुपये दिले लोकानीही उत्स्फूर्तपणे देणग्या पाठवल्या मदिराच्या पुनर्बांधणी-साठी पचवीस लाखावर रक्कम जमा झाली १९।४।५० रोजी मदिराचे भूमीपूजन व उत्खननविधी त्यावेळेचे सौराष्ट्राचे मुख्यमत्री कै ढेबरभाई याच्या हस्ते सपन्न झाला

यावेळी केलेल्या उत्खननात जुने भग्न पाषाण, त्यावर कोरलेल्या पण खराब झालेऱ्या मूर्ती, पिवळसर रगाच्या काही विटा सापडल्या सहाव्या शतकातील वल्लभी राजांच्या काळातील काही शिलालेख सापडले अक-राव्या शतकात कोरलेल्या पशुपक्षी, देवदेवता, नृत्याच्या त्रिभग, द्विभग आविर्भावातील नर्तिकाच्या मूर्तीही सापडल्या गर्भगृहाचा पाया तेरा फूटावर खाली मिळाला मदिर खचू नये म्हणून वाळूवर दगडाचा थर होता त्यावर मूळ ब्रह्मशीला होती पूर्वीचा पाया असलेल्या त्याच ब्रह्मशिलेवर नवे मदिर उभारण्याचे काम सुरु झाले नव्या मदिराचा पाया तीस फूट खोल घेण्यात आला ८ मे १९५० रोजी जामनगरच्या अधिपतीनी मदिराची कोनशिला विधीपूर्वक बसवली

मदिराची रचना सोमनाथचे वशपरपरागत शिल्पशास्त्रज्ञ सोमपुरा व इतर तज्ज्ञाच्या साह्याने झाली मदिर उभारणीसाठी मूळ दगड वापरलेल्या खाणीचा शोध परिश्रमपूर्वक घेण्यात आला तेथूनच मदिरासाठी दगड आणण्यात आले ११।५।५१ हा सोमनाथने पाहिलेला भाग्याचा दिवस ! त्यादिवशी राष्ट्राध्यक्ष डॉ राजेद्रप्रसाद यांच्या हस्ते वैदिक मत्राच्या घोषात सोमनाथलिंगाची पुन्हा प्राणप्रतिष्ठा झाली या धार्मिक कार्यक्रमाला भारता-तील नामवत वैदिक ब्रह्मवृद बोलावले होते त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व त्याचे गुरुवर्य वाई प्राज्ञपाठशालेचे केवलानद सरस्वती यानाही पाचारण करण्यात आले होते



सोमनाथ नवे मदिर व भग्नमदिर







वर - भल्लकतीर्थ

खाली - देहोत्सर्ग, श्रीकृष्णाचे निर्वाणस्थान

मंदिराच्या प्रवेशद्वारावर ३१ फूट रुंदीचे, ५२ फूट लांबीचे व भव्य उंचीचे 'दिग्विजय द्वार' आहे. जामनगरचे जामसाहेब श्री दिग्विजयसिंहजी यांच्या स्मरणार्थ राजमाता श्रीमती गुलाबकुंवर यांनी हे नवे प्रवेशद्वार १९७० साली बांधले. त्यासाठी साडेसहा लाख रुपये खर्च आला. त्याचे उद्‌घाटन श्री सत्यसाईबाबांनी केले.

भारताच्या किनाऱ्यावर परत वैभवाने तळपू लागलेले हे नवे सोमनाथ मंदिर पांढऱ्या वालुकामय पाषाणाचे असून ते पूर्वमुखी आहे. त्याच्या पश्चिमेला व दक्षिणेला समुद्र आहे तर उत्तरेला प्रभासपाटण गांव आहे. मंदिराची पूर्वपश्चिम लांबी सव्वाशे फूट असून दक्षिणोत्तर लांबी ११५ फूट आहे. मंदिराला तीन प्रवेशद्वारे आहेत. फक्त पश्चिमेला म्हणजे मागील बाजूला नाही.

सोमनाथ मंदिराजवळ अतिशय उत्सुकतेने आलो. प्रवेशद्वारावर सुंदर नक्षीकाम असून देवदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. प्रवेशद्वाराच्या संगमरवरी पायऱ्या ओलांडून आत प्रवेश केला. तेथील प्रार्थनामंडप पंचाहत्तर फूट लांबीचा असून त्याला आठ नक्षीदार, आकर्षक, प्रमाणबद्ध स्तंभ आहेत. त्यावर देवदेवतांच्या मूर्ती कोरल्या आहेत. एकाआड एक दोन स्तंभात नक्षीदार महिरप आहे. गोलाकार छतावर देवदेवतांच्या सुंदर सोळा मूर्ती आहेत. या मंडपाची फरशी संगमरवरी आहे. मंडपात काही अंतरावर भव्य संगमरवरी नंदी आहे. मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाजूला डावीकडे गजाननाची तर उजवीकडे हनुमानाची मूर्ती आहे.

मंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा चांदीचा आहे. गाभारा प्रशस्त असून मुख्य शिवलिंग काळ्या पाषाणाचे आहे. मागे चांदीच्या दिव्याची महिरप आहे. हे शिवलिंग बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असून "**सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैलेमल्लिकार्जुनम् ।**" असे पहिले मानले जाते. पिंडीच्या मागे सोमनाथाचा चांदीचा मुखवटा आहे व त्यावर छाया धरणारी चांदीची शेषाची मूर्ती आहे. आरतीच्यावेळी हा मुखवटा शेषासह पिंडीच्यावर चढवतात. तसेच

आदिशक्ती पार्वतीची सालङ्कृत सुबक मूर्ती पिंडीमागे असून तिच्या उजव्या हाताला चतुर्मुख ब्रह्मदेवाची व डाव्या हाताला भगवान विष्णूची मूर्ती आहे मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश मिळतनाही एकचित्तमनाने दर्शन घेतले ज्याच्या दर्शनासाठी मन आसुसले होतेत्या शिवलिंगाच्या दर्शनाने मन तृप्त झाले या लिंगाबद्दल म्हटले आहे.–

**सोमलिंग नरो दृष्ट्वा सर्व पापात प्रमुच्यते ।**

**लब्ध्वा फल मनोऽभीष्टं मृत· स्वर्गसमीहते ॥**

( सोमलिंगाच्या दर्शनाने सर्व पापापासून मुक्ती मिळते आणि मनातील इष्ट फलप्राप्ती होऊन मृत्यूनतर स्वर्गप्राप्ती होते )

सोमनाथचे हे नवे मंदिर तीनमजली आहे मंदिराच्या पहिल्या मजल्यावर सोमनाथचे चित्ररूप दर्शन होते तेथे पहिल्या मूळ मंदिराची छायाचित्रे ठेवलेली आहेत भग्नमंदिरे व त्यावरील नक्षीकाम अप्रतिम आहे नव्या मंदिराला भेट दिलेल्या मान्यवर व्यक्तींची छायाचित्रेही तेथे आहेत

दुसऱ्या मजल्यावर *Somnath Temple Through Ages* या फलकावर महाभारतकालापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीनतरच्या या मंदिराशी निगडित अशा २१ महत्त्वाच्या विशेष घटनांची नोंद केलेली आढळते मंदिराला मुसलमानी स्वरूप देण्यासाठी त्यावर घुमट उभारला होता त्याचेही छायाचित्र त्यात आहे

मंदिरात सकाळी सात, दुपारी बारा व सायकाळी सूर्यास्ताबरोबर आरती होते आम्ही गेलो तेव्हा दुपारच्या आरतीचा लाभ झाला सध्या मंदिरासमोर ७५ फूट लांबीचा व ५५ फूट उंचीचा नवा नृत्यमंडप बांधायचे काम चालू आहे

सोमनाथलिंगाची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर चौदा वर्षांनी १३ मे १९६५ ला १५५ फूट उंचीच्या मंदिराच्या शिखरावरील कळसाची प्रस्थापना होऊन ध्वजदंड उभारला गेला त्यावेळी २१ तोफांची सलामी देण्यात आली ५१ ब्राह्मणांच्या उपस्थितीत नवानगरच्या जामसाहेबांच्या हस्ते हा धार्मिक विधी झाला त्यांनी एक लाख एकशेएक रुपयांची देणगी दिली त्यावेळेपर्यंत या नव्या मंदिराच्या निर्मितीला पंचवीस लाख रुपये खर्च आला स्वातंत्र्य-

प्राप्तीनतर भारताच्या दक्षिण टोकावर सागराच्या किनाऱ्यावर विवेकानद-स्मारक जसे लोकाच्या देणगीतून उभारले गेले तसेच पश्चिम टोकावर सागरकिनारी सोमनाथमदिर लोकाच्या उत्स्फूर्त देणग्यातूनच उभे राहिले तथापि सोमनाथमदिराच्या आकाराचे 'कैलासमहामेरु प्रसाद' नावाने शिल्पशास्त्रदृष्टचा उभारलेले गेल्या आठशे वर्षातले हे एकुलतेएक मदिर आहे

सोमनाथमदिराचे दर्शन घेऊन आवारात प्रदक्षिणा मारली अथाग निळ्या सागराने वेढलेल्या या मदिराभोवती फिरताना खळाळणाऱ्या लाटाचा रौरव कानी पडत होता मदिराच्या प्रागणात जुन्या भग्न पार्वती-मदिराच्या जोत्याचे अवशेष, भग्नमूर्ती पाहून मन विषण्ण होत होते सोमनाथ म्हणजे पत्थरांचा रोमान्स ! विध्वस आणि प्रतिकार याचे प्रतीक ! धर्मांध-पणा आणि सहिष्णुता याचे प्रतीक ! अनेकवेळा विध्वस होऊनही वैभवाने तळपणाऱ्या सोमनाथचा सदेश आहे 'विध्वसावर धर्म उभारता येत नाही '

सोमनाथमदिर पाहून मदिराबाहेर पडल्यावर समोरच सरदार वल्लभभाई पटेल याचा भव्य पुतळा दृष्टीला पडला सोमनाथचे नवे मदिर उभारण्यात त्यांचा महत्त्वाचा भाग आहे या यथोचित स्मारकाचे उद्घाटन गुजरातचे सुप्रसिद्ध गाधीवादी रविशकर महाराज यानी १९७० मध्ये केले

शेजारीच इदूरच्या अहिल्यादेवी होळकर यानी उभारलेले मदिर आहे ते पहाण्यासाठी आत प्रवेश केला असे सागतात की साध्वी अहिल्या-देवीना भगवान सोमनाथानी स्वप्नात दृष्टात दिला त्यानुसार भग्न सोमनाथ मदिराचा प्रथम जीर्णोद्धार करावयाचे ठरले तथापि येथील ब्राह्मणांनी सुचवले की नवे सोमनाथमदिर बाधावे त्यानुसार हे मदिर इ स १७८८ मध्ये बांधले या मदिराचे वैशिष्टच म्हणजे शिवलिगाचा परकीयाना सुगावा लागू नये म्हणून त्याची स्थापना तळघरात केली आहे अरुद जिन्याने आम्ही उतरलो व तळघरात प्रवेश केला तेव्हा दुपारची आरती चालू होती धन्य ती अहिल्यादेवी की जिने भारताच्या काना-कोपऱ्यातील हिंदू देवस्थानांचा उध्दार केला

सोमनाथमंदिरानजीकची स्थाने पाहण्यासाठी टांग्याने निघालो वाटेत प्रथम सरस्वती, कपिला, हिरण्या या तीन नद्या सागराला जेथे मिळतात ते त्रिवेणी संगमाचे स्थान लागते नंतर निघालो भगवान श्रीकृष्णाचे निर्वाण-स्थान पहाण्यासाठी

## देहोत्सर्ग

भगवान श्रीकृष्णाने ज्या ठिकाणी देह ठेवला ते स्थान देहोत्सर्ग नावाने प्रसिध्द असून हिरण्या नदीच्या काठावर आहे सोमनाथ मंदिरापासून हे स्थळ साधारण तीन कि मी अंतरावर पूर्व दिशेला आहे एका लहानशा संगमरवरी चबुतऱ्यावर श्रीकृष्णाच्या पादुका आहेत या ठिकाणी श्रीकृष्णाने अंतिम क्षण घालवून पार्थिव देहाचा त्याग केला भाविक यात्रेकरू मंडळी पादुकांना प्रथम अभिषेक करतात आप्ताच्या श्राध्दविधीनंतर त्यांच्या शाश्वत शांतीसाठी ते वृक्षाभोवती प्रदक्षिणा घालताना दिसले हिरण्या नदीला घाट बांधला असून पायऱ्या उतरून यात्रेकरू नदीतून अभिषेकासाठी पाणी आणताना दिसले हे स्थान शांत व पवित्र आहे महाभारतातील एका तेजस्वी महापुरुषाने आपल्या जीवनातील अंतिम क्षण जेथे व्यतीत केले त्या स्थानाची भेट अविस्मरणीय होती

तेथे शेजारीच गीता मंदिर आहे मुरलीधर कृष्णाची संगमरवरी मूर्ती असून बाजूला नववा व दहावा अध्याय कोरला आहे या मंदिराला दोन्ही बाजूला प्रत्येकी आठ संगमरवरी स्तंभ असून त्यावर गीतेचे अध्याय कोरले आहेत अशा प्रकारे गीतेचे एकूण अठरा अध्याय बाजूला आठ-आठ व समोर दोन असे कोरले आहेत

देहोत्सर्गस्थानानजीक लक्ष्मीनारायण मंदिर असून त्यात सुंदर संगमरवरी मूर्ती आहेत कृष्णाचा मोठा भाऊ बलराम याचे जेथे निर्वाण झाले ती बलराम गुफा वाटेवर आहे तेथील छोट्या मंदिरात बलरामाची मूर्ती आहे तेथे भिंतीवर शेषाचे चित्र आहे बलराम हा शेषाचा अवतार मानतात बलरामाने या ठिकाणी मानवी अवतार संपवला व शेषाच्या रूपाने पाताळात प्रवेश केला असे मानले जाते त्याला अनुसरून बाजूला भुयार

आहे व ते पाताळापर्यंत गेले आहे असे पुजारी सागत होता दर नागपंचमीला भाविक लोक बिळातून आत दूध टाकतात अशी माहिती मिळाली वाटेत शारदा पीठ आहे तेथे शकराचार्यांचा मठ आहे तेथे आद्य शकराचार्यांचे छायाचित्र आहे तसेच द्वारकापीठावरील शकराचार्यांचीही छायाचित्रे आहेत

प्रभासपाटण गावातील बाजारात म्युझियम असून तेथे जुन्या सोमनाथ मदिराचे काही भग्न अवशेष ठेवले आहेत सोमनाथ पाहून प्रभासपाटणहून वेरावळ स्टेशनकडे परत जाताना वाटेत हजारो थडगी दिसतात धर्मवेडे पणामुळे झालेल्या सहाराची कल्पना येते

**भालकातीर्थ**

वाटेत भालकातीर्थ ऊर्फ भल्लकतीर्थ पहाण्यासाठी उतरलो याठिकाणी भगवान श्रीकृष्ण महाभारतीय युद्ध सपल्यावर पांडवाचे कसे होणार याचा विचार करीत एका पिपळाच्या वृक्षाखाली बुध्याला टेकून भूमीवर पसरलेल्या आपल्या रेशमी उत्तरीयावर वीरासन घालून म्हणजे उजव्या पायावर डावा पाय आडवा ठेवून ध्यानमग्न बसले होते त्यावेळी त्याचा गुलाबी तळवा दुरून हरिण समजून एका भिल्लाने चुकून बाण मारला त्यात भगवान जबर जखमी झाले त्यानी आपली जखम ज्या कुडात प्रथम धुतली ते हे भल्लक-तीर्थ या घटनेमागे होता गाधारीचा शाप महाभारताच्या भीषण युद्धसमाप्तीनतर गाधारीला कृष्ण भेटण्यास गेला असता तिने शाप दिला – " आमच्या कुळाचा जसा सर्वनाश झाला, तसा यादव कुलाचाही होईल " त्यानतर कालातराने यादवकुमारानी कृष्णाचा पुत्र साब याला गर्भवतीचा वेष देऊन त्याला कण्व, विश्वामित्र, दुर्वासमुनी यांच्याकडे नेले व विचारले 'मुनिवर्य हिला मुलगा होईल की मुलगी ?' त्या थट्टेने क्रोधीत होऊन मुनीनी शाप दिला की– " हिच्या पोटी मुसळ जन्माला येऊन ते यादवाचा नाश करील ' सांबाच्या पोटावरील वस्त्रे सोडताच त्यातून खरोखरच मुसळ निघाले यादवानी शापाच्या भीतीने त्या मुसळाचे चूर्ण करून त्याची भुकटी समुद्रात फेकली चूर्ण केल्यावर एक लोखडाचा तुकडा उरला होता, तोही


ग्रंथालय

त्यांनी समुद्रात फेकला हा लोखंडाचा तुकडा एका माशाने गिळला जरा नावाच्या भिल्ल शिकाऱ्याला हा मासा मिळाला त्याने तो चिरला तर त्यातून लोखंडाचा तुकडा निघाला माशाच्या पोटात सापडलेला लोखंडाचा तुकडा जर बाणाला लावला तर त्यापासून चांगली शिकार मिळते अशी समजूत असल्याने त्या शिकाऱ्याने त्यापासून बाण तयार केला व तो शिकारीला निघाला याच बाणाने भगवान जखमी झाले

आपली चूक समजल्यावर तो भिल्ल पळत पळत येऊन भगवानाची क्षमायाचना करू लागला त्यावर श्रीकृष्ण म्हणाले– " जन्म, मरण, आधी, व्याधी, संसारातील सुखदु:खे इ. माणसाचे भोग असतात जो तो आपल्या पूर्व कृत्यानुसार फळे भोगत असतो अरे, रामजन्माच्या वेळी तू वाली – वानराचा राजा होतास तर मी प्रभु रामचंद्र होतो त्यावेळी तुझा कोणताही अपराध नसताना मी तुला ठार मारले होते तुझा हा वध असमर्थनीय होता त्या वधाचा बदला तुला माझ्या कृष्णावतार समाप्तीच्यावेळी घेता येईल असे वचन त्यावेळी मी तुला दिले होते अशा प्रकारे पूर्वजन्मी वाली असलेल्या तू मला जखमी करून तो बदला घेतला आहेस तुझ्या क्षमायाचनेची जरूरी नाही "

तीर्थाशेजारी एक मंदिर आहे तेथे पिंपळाचा वृक्ष आहे कृष्णाची देखणी नवी मूर्ती वीरासन घालून बुंध्याला टेकलेली विश्रांती घेताना दिसते त्यांना बाण मारणाऱ्या भिल्लाची मूर्ती शेजारी क्षमायाचना करताना दाखविली आहे भगवान त्याच्याकडे पहात आहे असे दाखविले आहे

भालकातीर्थ येथे बाणाने विध्द झाल्यावर कृष्णाने विधीलिखित ओळखलेले होतेच त्याच्या इच्छेनुसार अर्जुनाला त्वरित बोलावणे गेले जखमी श्रीकृष्णाला हिरण्यानदीच्या काठी एका पिंपळाच्या वृक्षाच्या छायेत देहोत्सर्ग येथे आणले गेले या ठिकाणी कृष्णाने आपल्या आयुष्यातील अंतिम क्षण घालवले व देहत्याग केला एका तेजःपुंज दिव्य महापुरुषाचा अस्त झाला होता ! त्याच्या सावळ्या प्रसन्न मुद्रेवर समाधानाचे हास्य विलसत

होते अर्जुन तेथे पोहोचला पण वेळ निघून गेली होती । जन्मभर श्रीकृष्णाने पांडवावर अगणित उपकार केले पण त्यांना त्या उपकाराची परतफेड करता आली नाही त्याच्या मृत्यूनतर जणू ही फेड व्हायची होती । अर्जुनाने श्रीकृष्णाचा पार्थिव देह हिरण्यानदीच्या काठी चितेवर ठेवून मन्त्राग्नी दिला पण त्या देहाचे फक्त हातपाय जळून गेले बाकीचे शरीर कितीही तूप टाकले तरी जळेना । अर्जुन खूप काळजीत पडला त्यावेळी आकाशवाणी झाली "हे अर्जुना, ज्या हातापायांनी पुण्य केले ते जळून गेले पण आता हे शरीर जळणार नाही तरी तू ते शरीर हिरण्या नदीत विसर्जित कर" त्याप्रमाणे अर्जुनाने तो पार्थिव देह हिरण्या नदीत विसर्जित केला व उत्तर-क्रिया सरस्वती, कपिला व हिरण्या या तीन नद्या समुद्राला जेथे मिळतात त्या त्रिवेणी सगमात केली

भगवान श्रीकृष्णाच्या अतिम स्मृतीशी निगडीत देहोत्सर्ग व भालका-तीर्थ या स्थानाच्या दर्शनाने मन हेलावून गेले भालकातीर्थाची भेट आटोपून वेरावळ बस स्टॅन्डवर पोहोचलो तेव्हा दुपारचे दोन वाजले होते गीरला जाण्यासाठी बस दुपारी अडीचला असल्याने जेवणाऐवजी फराळाचे आटोपून घेतले जगलातले सिंह पहायचे म्हणून उल्का, उदयचा उत्साह वाढला होता

✦ ✦



# वनराजांचा मुक्त विहार – सासनगीर

दुपारी अडीचला वेरावळ बसस्टँडवरून गीरला जाण्यासाठी बसने निघालो ४२ किलोमीटर अंतराचा प्रवास दीड तासात संपला व सासनला उतरलो

सासन म्हणजे गुजराती भाषेत 'छोटे खेडे' सासन पाच हजार वस्तीचे आहे गीर हा शब्द संस्कृत गिरीपर्वत, टेकड्या यापासून रूढ झाला या प्रदेशात २७० च्या वर टेकड्या व १०० च्या वर दऱ्या आहेत सिंहा-प्रमाणेच गीरच्या गाई व म्हशी प्रसिद्ध आहेत

गीरचे ११५ चौ किलोमीटर क्षेत्रांचे जंगल दुनगर, सासन, जामवाला व जसधर हे चार भाग मिळून १२२ खेड्यांचा समावेश असलेले आहे दाट जंगल 'जडी गीर' व थोडे विरळ जंगल 'अच्छी गीर' नावाने ओळखले जाते गीरचे हे जंगल महाभारतकालात नैमिषारण्य या नावाने ओळखले जाई हिरण्या व सरस्वती नदी येथून वहात जातात ऋषी मुनी येथे आश्रम स्थापन करून तप करीत कृष्णाचा मोठा भाऊ बलराम याने येथून प्रवास केला असे मानले जाते पाचव्या ते आठव्या शतकात गीरचा हा प्रदेश गुजरातच्या वल्लभी राजाच्या राजवटीखाली होता त्यानंतर

बाराव्या शतकात सोळखी राजांची राजवट आली त्यांच्यातील राजा भीमदेवाने या प्रदेशात मदिर बाधले नतर गीरचा हा प्रदेश गुजरातच्या सुल्तानाच्या अमलाखाली आला त्यानतर या प्रदेशाचा काही भाग बडोद्याच्या गायकवाडांच्या अमलाखाली होता नतर तो जुनागढच्या नबाबाच्या अमलाखाली आला

सपूर्ण आशिया खडात केवळ गीर येथे सिहाची वस्ती आहे एके काळी या जगलात तीनशेच्या दरम्यान सिह होते सिहाच्या सख्येचे चित्र असे आहे – १९३६ मध्ये २८७, १९५० मध्ये २२७, १९५५ मध्ये २१९, १९६३ मध्ये २८५, १९६८ मध्ये १७७, १९७४ मध्ये १८२ सिह गीरच्या जगलात होते १९७९ च्या ताज्या खानेसुमारीत सिहांची सख्या २०५ आढळून आली या सख्येत ६५ सिह, ८२ सिहीणी आणि ५८ छावे आहेत फॉरेस्ट गार्डने सांगितले की, दर पाच वर्षांनी सिहाची खानेसुमारी होते त्यावेळी झाडावर माणसे बसवून पिचकारीनें सिहावर रग टाकला जातो व मोजणी केली जाते पावलाच्या ठशावरूनही मोजणी केली जाते गीरचे हे जगल आरक्षित समजले जात असून कायद्याप्रमाणे सध्या शिकार करता येत नाही एकोणिसाव्या शतकात इग्रज व भारतीय सस्थानिकाच्या शिकारीच्या शौकामुळे सिहाची संख्या घटत गेली चोरून सिहाची शिकार करून त्याचे तोंड, दात, नखे, कातडे परदेशात विकले जाते

[सिह हा आरामप्रिय धीरगभीर प्राणी आहे स्वत केलेल्या शिकारीचा आस्वाद घेणे त्याला खूप प्रिय आहे सिहाला उष्णता मानवत नाही म्हणून सकाळी कमी उष्णतामान असलेल्या आणि वाऱ्याच्या झुळुका येत असलेल्या दाट छायेच्या जागीच तो आश्रय घेतो सध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी आळस झटकून सिह उठून बसतो व अधार पडल्यावर शिकारीच्या शोधार्थ बाहेर पडतो सिह हा निशाचर प्राणी समजला जातो शिकारीवर झडप घालण्यापूर्वी तो वेगाने धावत सुटतो व वेध घेऊन झडप घालतो त्यावेळी प्राण्याला जीव वाचवणे अशक्यच सिहाच्या पजाच्या दणकट घावाने अजस्त्र प्राणी कोसळतो सिह साधारण २५० किलो वजनाची शिकार जबड्यात धरून फरफटत घेऊन जातो इतकी सिहशक्ती प्रचड आहे म्हणूनच त्याला 'जंगलचा राजा' म्हटले जाते]

सिंहाचे वजन साधारण ४५० किलो असते त्याचा आहार २५ किलो असतो सिंहाचा धावण्याचा वेग ताशी ५० किलोमीटर असतो सिंहगर्जना साधारण तीन-चार मैलापर्यंत ऐकू जाते नर सिंहाला भरदार आयाळ असते तर मादीला विरळ असते

सासनला उतरल्यावर प्रथम तेथील वनविभागाच्या भव्य आवारात असलेल्या स्वागत कक्षामध्ये गेलो तेथे वनराजाच्या दर्शनासाठी उत्सुक स्त्री-पुरुष, मुले जमलेली होती जगल प्रवेश करण्यासाठी प्रत्येकी बारा रुपये भरून पास काढले पर्यटकांना गीरच्या जगलात नेण्यासाठी जीप, मेटॅडोर इ वाहनाची सोय केली जाते जगलात जितक्या दूरपर्यंत पर्यटकाना नेले जाते त्या अतराच्या किलोमीटरप्रमाणे रक्कम अर्थात पर्यटकाकडून वसूल केली जाते त्यासाठी माणशी दहा रुपये आणखी रक्कम गोळा केली ज्याच्याकडे स्वत ची वाहने होती त्यानी पैसे भरल्यावर त्यांना वेगळा पास देण्यात आला

अगोदर ज्यानी पैसे भरून पास काढले होते त्याना जगलात जाण्यासाठी तुम्हाला जीप अथवा मेटॅडोर देऊ असे सांगितले होते पण पाच वाजले तरी कोणत्याही जीपचा अथवा मेटॅडोरचा पत्ता नव्हता सर्वजण अस्वस्थ झाले अखेर सर्वांना सागण्यात आले की जीप अथवा मेटॅडोर उपलब्ध होऊ शकत नाही गाड्या ब्रेक डाऊन आहेत कपाऊड बाहेर एक ट्रक उभा आहे पर्यटकांचा नाईलाज होता कारण वेळेला महत्त्व होते ट्रकवाला खाजगी मालक व सरकारी वनविभाग याचे सधान असावे असे सर्वजण कुजबुजत होते भाडायला वेळ नव्हता कारण जगलातले सिंह पाहून ज्याला त्याला परतायचे होते तेथील महागड्या रेस्टहाऊसमध्ये मुक्कामाला कोण रहाणार ? ट्रक तर ट्रक अशाप्रकारे सुमारे पन्नास-साठ हौशी पर्यटक नाराजीने ट्रकमध्ये चढले पर्यटकात तरुण, तरुणी जसे होते तसेच काही वृद्धही होते त्याचे ट्रकमध्ये चढताना हाल होत होते पर्यटकात आमच्यासारखी कुटुबे जशी होती तशीच हनीमूनला निघालेली जोडपीही होती अभ्यासाच्या दृष्टीने जगलाला भेट देणारे कॉलेज विद्यार्थीही होते

साग, चदन, शीसम इ मूल्यवान दाट वृक्षानी वेढलेल्या या जगलात वनखात्याच्या कृपेमुळे मिळालेली आमची उघडी ट्रक हिंदोळ्यासारखी जात होती त्यापुढे खाजगी गाड्याचा ताफा होता रस्त्याच्या बाजूच्या झाडाच्या फांद्या ट्रकमध्ये आल्या की एकच ओरडा व्हायचा– बैठो, बैठो ! थोडे जरी बेसावध राहिले तरी फादीने झोडपून निघण्याचा धोका होता अधून-मधून पावसाच्या जोरदार सरी यायच्या व प्रवाशाना अक्षरश स्नान घडायचे वाटेत छोटे छोटे ओढे–नाले लागले की धक्के बसायचे व ट्रकमध्ये एकच गलका व्हायचा प्रत्येक जण ट्रकच्या कडाना घट्ट धरून उभा होता नाहीतर चेडूप्रमाणे इकडे तिकडे टोलवले जाण्याची शक्यता होती अशाही परिस्थितीत उत्साही पर्यटक गमतीदार गाणी खड्या सुरात म्हणून स्वत चे व इतरांचेही मनोरजन करीत होते

अर्ध्या तासात साधारण पधरा कि मी अतर तोडून जगलात ट्रक थाबला लोकानी पटापट उड्या टाकल्या रस्ता सोडून आत जगलात साधारण दोन फर्लांग चालत गेलो तेव्हढ्यात उदय ओरडला – ' आई, लवकर बघ, सिंह चार आहेत ! सर्व लोक गर्दी करून उभे राहिले एके ठिकाणी चार तगड्या सिंहाचा समूह दिसला जगलात पडलेल्या पानावर दोन सिंह लोळत होते तर दुसरे दोन उभे होते जगलखात्याच्या लोकांनी दुपारी झाडाला रेडा बाधला होता त्या भक्ष्यावर ताव मारून सिंह सुस्त झाले होते काही जणानी पटापट फोटो काढले सिंहांपासून साधारण अर्ध्या फर्लांगावर जगलखात्याचे गार्ड हातात बदुका घेऊन उभे होते त्याच्या बाजूला सर्व लोक उभे होते सिंह मुक्तपणे पानावर लोळत होते एकमेकाच्या अगावर उड्या मारीत होते तेव्हढ्यात एका सिंहाने मोठ्याने गर्जना केली उदयने आमचे हात धरून मागे ओढले !

त्यानतर सर्वजण पुन ट्रकवर चढले गाडी परत सात-आठ कि मी अतरावर गेली पुन सर्वजण उतरले दोन तीन फर्लांग चालत गेल्यावर एक मादी तीन छाव्यांना खेळवत बसलेली दिसली फॉरेस्ट गार्ड सागत होता की हे छावे तीन महिन्याचे आहेत एक छावा शातपणे पर्यटकाकडे पहात होता तर दुसरे दोन छावे मादीच्या अगावर बागडत होते मादीही शातपणे

बसली होती आपल्या छाव्याबद्दलची वात्सल्यभावना तिच्या चेहे-यावर दिसत होती

एव्हाना अंधार पडू लागला होता पर्यटक परत ट्रककडे निघाले ट्रक परत निघाला ५ सिंह व ३ छावे यांचा लायन शो पहायला फॉरेस्ट पास, गाडीचे भाडे, कॅमेराचा पास इ ६६ रु खर्च आम्हा दोघाना व दोन मुलाना आला होता एक पुणेकर कुटुब म्हणाले– "पेशवेपार्कमध्ये फुकट सिंह पहायला मिळतात तिकडे कुणी ढुकून पहात नाही व्यर्थ धावपळ झाली व पैसे खर्च झाले" पिंजऱ्यात कोंडलेले सिंह तर आपण प्राणी संग्रहालयात पहातोच पण मुक्तपणे वावरणारे सिंह पहाण्यात आगळाच आनद आहे त्यात एक वेगळे थ्रिल आहे मात्र त्यासाठी एव्हढा खटाटोप, खर्च व पैसे देऊनही ट्रकचा प्रवास यामुळे विरस होतो पर्यटकांना अधिक सवलती दिल्या तर आणखी पर्यटक येथे आकर्षिले जातील असा विचार मनात आला गीरच्या फॉरेस्ट हाऊसमध्ये परतलो तेव्हा रात्रीचे साडेसात वाजले होते सर्वत्र अधाराचे साम्राज्य पसरले होते अधारात ठेचाळत इतर पर्यटकाबरोबर खूप घाईने स्टेशनवर आलो कारण जुनागढला जायला रात्री ८ ला गाडी होती गाडी वेळेवर आली तेव्हा हायसे वाटले दोन तासांनी जुनागढला मुक्कामी पोहोचलो

◆ ◆



# सुदामपुरी
## म. गांधींचे – पोरबंदर

जुनागढहून पोरबंदरला जाण्यासाठी रेल्वेने जेटलसर मार्गाने जावे लागते व गाडीही बदलावी लागते यात बराच वेळ जाईल म्हणून सकाळी आठला बसने निघून पोरबंदरला तीन तासात पोहोचलो

आजचे पोरबंदर म्हणजे पौराणिक काळातील सुदामपुरी श्रीकृष्णाचा बालमित्र सुदाम येथे रहात होता येथील खाडीत पोरबाई मातेच्या मंदिराचे अवशेष असून ते सुमारे ८०० वर्षांपूर्वीचे असावेत असा विद्वानाचा तर्क आहे त्यावरून पोरबंदर नाव पडले असण्याची शक्यता आहे पोरबंदर हे पश्चिम किनाऱ्यावरील बंदर ! तेथून आफ्रिका, आखात प्रदेश, इराण, अरब राष्ट्रे यांच्याशी व्यापार चाले पोरबंदर हे पूर्वीच्या काठेवाड संस्थानातील शहर पोरबंदरची लोकसंख्या सुमारे दीड लाख आहे

प्रथमदर्शनीच पोरबंदर शहर टुमदार व स्वच्छ वाटले रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुमजली इमारतींच्या रांगा त्यांना प्लॅस्टर करून रंग दिलेला असल्याने आकर्षक व शोभिवंत वाटल्या गुजरातच्या भेटीतील हे शहर रेखीव वाटले

पोरबंदरच्या भेटीत प्रथम पहायचे होते म. गांधीचा जन्म जेथे झाला ते घर ! म. गांधींचे वडील करमचंद गांधी पोरबंदर संस्थानचे दिवाण होते. त्यांचे घर म्हणजे जुन्या पद्धतीचा एक तीन मजली वाडा होता. तेथेच हे 'कीर्तीमंदिर' नावाचे नवे आकर्षक स्मारक उभारले आहे. या स्मारकात हिंदु, मुस्लिम शिल्पाचा समन्वय साधला आहे. कलाकुसरीच्या कोरीव कामाने सजलेले या स्मारकाचे आकर्षक तोरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. म. गांधींचे आयुष्यमान ७९ वर्षांचे ! त्याचे प्रतीक म्हणून या तोरणावर ७९ फूट उंचीचे शिखर उभारले आहे. तोरणातून आत गेल्यावर संगमरवरी फरशा बसवलेले अंगण आहे. त्याच्या भोवती २८ संगमरवरी स्तंभ आहेत. पहिल्या स्तंभावर संत नरसी मेहताचे गांधीजींचे आवडते 'वैष्णवजन तो तेने कहिये जो पीड पराई जाणे रे ।' हे पद कोरले आहे. बाकीच्या स्तंभावर गांधीजींचे जीवनविषयक सिद्धांत सांगणारी वचने कोरली आहेत. आतमधील इमारतीचा एक भाग गांधीजींच्या जन्मकाळी जसा होता तसाच ठेवला आहे. बाल-मोहनचा जन्म ज्या खोलीत झाला ती व तिच्या वरचा भाग मूळ स्वरूपात राखला आहे. त्यांचा जन्म जेथे झाला तेथे स्वस्तिक काढले असून त्याच्यावर भिंतीला त्यांचा सूत कातत असतानाचा रंगीत फोटो लावला आहे. समोरच्या भिंतीवर त्यांचे पिताजी श्री. करमचंद व आई पुतळीबाई यांचे फोटो लावले आहेत. तिसऱ्या मजल्यावर म. गांधी लहान वयात जेथे अभ्यासाला बसत ती खोली आहे.

जुन्या भागापलीकडे गांधीस्मारक संग्रहालय आहे. त्यात गांधीजींची वेळोवेळीची छायाचित्रे, त्यांच्या संबंधी प्रसिद्ध झालेली पुस्तके ठेवलेली आहेत. संग्रहाच्या बाजूला गांधीजींचे एकनिष्ठ अनुयायी मगनलाल गांधी व महादेवभाई देसाई यांचे स्मारक म्हणून दोन दालने आहेत. तळमजल्यावर विणकाम, सूतकताई इ. खादीनिर्मितीच्या क्रियांचे प्रात्यक्षिक दाखविले जाते. तसेच गांधींच्या तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांचा संग्रह, पुस्तकविक्री विभागही

आहे तसेच खादी ग्रामोद्योग प्रदर्शन विभाग, मूलोद्योग शिक्षणाचा बालविभाग, महिला पुस्तकालय इ विभाग तेथे आहेत

म गाधी पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये असताना १९४४ साली कीर्तीमदिर उभारण्याचे ठरविण्यात आले स्वत चे स्मारक व्हावे अशी त्याची इच्छा नव्हती त्यावेळी त्यानी समती द्यावी म्हणून त्याना बरीच गळ घालण्यात आली मग मात्र त्यानी समती दिली वडिलोपार्जित घराचा सदुपयोग जर होत असेल तर स्मारक उभारण्यास हरकत नाही असे त्याना वाटले किर्तीमदिराची पायाभरणी सौराष्ट्राचे गाधीवादी पुढारी दरबार गोपालदास यांच्या हस्ते १९४७ साली झाली तर उद्‌घाटन १९५० साली सरदार पटेल यांच्या हस्ते झाले पोरबदरचे एक कोटयधीश व्यापारी श्री नानजीभाई कालिदास मेहता याची गाधीजीवर खूप श्रद्धा, निष्ठा होती. त्यानीच ४ लाख रुपये स्वत खर्च करून हे स्मारक बाधून घेतले व भारत सरकारला अर्पण केले कीर्तीमदिर पहाताना तेथील शात पवित्र वातावरणात जगातील एका महान व्यक्तीच्या असामान्य कर्तृत्वाचा परिचय होतो. कीर्तीमदिर पाहून दुपारचे भोजन आटोपले तासभर विश्रांती घेऊन दुपारी तीनला सुदाम मदिराला भेट देण्यासाठी बाहेर पडलो

## सुदाममदिर

श्रीकृष्णाचा बालमित्र सुदाम ब्राम्हण येथे रहात होता त्याची पत्नी साध्वी होती घरात अठराविश्वे दारिद्रय असल्याने कटाळून अखेर तिने पतीला सुचवले की त्याने कृष्णाला भेटायला जावे दयाळू कृष्ण दारिद्रय-निवारण करील याची तिला खात्री होती पती कृष्णाला भेटायला निघाला खरा पण बरोबर काही तरी वस्तु भेट द्यायला हवी घरात तर काही नव्हते तिने चार मुठी पोहे भिक्षा मागून आणले व त्या पोह्याची पुरचुडी फाटक्या उपरण्यात बाधून सुदामा कृष्णभेटीला निघाला द्वारकेला पोहोचल्यावर श्रीकृष्णाने आलिगन देऊन सुदामाचे अत्यत प्रेमाने स्वागत केले व त्याने दिलेले पोहे आवडीने खाल्ले मात्र सुदामाने काहीही मागितले

नाही व श्रीकृष्णाचा निरोप घेऊन तो परतला श्रीकृष्णाने मात्र सर्व काही जाणले होते सुदामा घरी पोहोचला तो काय त्याची नगरी सुवर्णाची झालेली व त्याचे घरही राजवैभवाने भरलेले!

पोरबदरचे सुदामदेवाचे मदिर हे साधारण दोनशे वर्षांपूर्वीचे आहे मदिरात सुदामदेव, त्याची पत्नी यांच्या मूर्ती एका बाजूला आहेत तर दुसऱ्या बाजूला कृष्णरुक्मिणीच्या मूर्ती आहेत हे मदिर म्हणजे मित्रप्रेमाचे हृदयगम प्रतीक आहे


पोरबदरच्या भेटीतील शेवटचे स्थान होते– भारतमाता मदिर! या मदिरात भारतमातेची मोठी मूर्ती असेल अशा कल्पनेने कोणी जाईल तर त्याची निराशा होईल या मदिरात आहे भारताचा सिमेंट, वाळू इ नी तयार केलेला व सुदर प्लॅस्टर केलेला भारताचा प्राकृतिक नकाशा! या नकाशात भारतातील पर्वत जसे उचीच्या प्रमाणात आढळतात तशाच नद्याही आढळतात भारताच्या स्वाभाविक विभागाचे अशाप्रकारे दर्शन होते हेही मदिर पोरबदरचे श्री नानजीभाई कालिदास मेहता यानी उभारले आहे या नकाशाभोवतीच्या बाजूच्या स्तभावर भारतातील प्राचीन ऋषी-मुनी तसेच स्वामी विवेकानद, प नेहरु, लो टिळक, म गाधी इ मान्यवर व्यक्तीच्या मूर्ती कोरल्या आहेत

कीर्तीमदिर, सुदाम मदिर, भारतमाता मदिर ही मंदिरे पाहिली पोरबदरजवळ हर्षदेवीचे प्राचीन मदिर आहे पण वेळेअभावी ते पहाता आले नाही एक दिवसाची पोरबदरची भेट आटोपून रात्री जुनागढला परतलो

◆ ◆



स्वर्गद्वार - द्वारकाधीश मंदिर, द्वारका



कीर्तीमंदिर - म. गांधींचे जन्मस्थान, पोरबंदर



ग्रंथालय
शाखा

## राजकोट
## प्रिन्स रणजींचे जामनगर

सकाळी दहाला जुनागढहून निघालेली मेल दुपारी दोनच्या सुमाराला राजकोट स्टेशनवर पोहोचली जामनगरला जाणारी कनेक्टींग गाडी थोडक्यात चुकली त्यानतर सायंकाळी सहाला गाडी होती. ती जामनगरला रात्री नऊला पोहोचली असती रात्री काही पहाता आले नसते अनायासे अर्धा दिवस होता, तेव्हा राजकोट पहायचे ठरवले

रिटायरिंगरूमकडे मोर्चा वळवला रूम मिळाल्यावर सामानाची व्यवस्था लावली तासभर विश्रांती घेतली तोपर्यंत चंद्रकांत यानी बॅगमधील राजकोटचे माहितीपत्र काढले सौराष्ट्राच्या मध्यभागी असलेले राजकोट

पूर्वी राजधानीचे ठिकाण होते ब्रिटिशाच्या काळात काठेवाडातील पोलिटिकल एजटची कचेरी येथे होती अर्ध्या दिवसाच्या राजकोटच्या लादलेल्या भेटीत दोन ठिकाणे पहायची ठरवली प्रथम पोहोचलो कबा गांधीनो डेला ' या ठिकाणी

म गांधी इ स १९१५ ते १९३९ या काळात ज्या ठिकाणी रहात होते ते घर 'कबा गाधीनो डेला ' या नावाने ओळखले जाते बाजाराच्या मुख्य रस्त्याच्या मागील बाजूला छोटचा रस्त्याने गेल्यावर एक जुन्या पद्धतीचे मोठे लाकडी दिंडीसह असलेले प्रवेशद्वार लागते त्यातून प्रवेश केल्यावर थोडे मोकळे अगण दिसले त्या अगणात पूर्वी डावीकडे पेरूचे झाड होते, आता तेथे परत पेरुचे झाड लावले आहे अशी माहिती मिळाली धाब्याच्या या घराला व्हरांडा व पाच खोल्या आहेत व्हराडचाला जाळी लावलेली असून घर मूळ स्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे या घराचा इतिहास असा आहे – गाधीजींचे वडील श्री करमचद (कबा) गाधी पोरबदरहून निघून सौराष्ट्रातील राजकोट सस्थानात आले तेथे दिवाण झाल्यावर इ स १८८१ मध्ये या घरात (डेला) ते वास्तव्याला आले घरात डाव्या बाजूला त्याची बैठक असे विद्यार्थी दशेतील गाधीजी कोपऱ्यातील एका खोलीत अभ्यास करीत याच घरात त्यांनी आपल्या वाईट सगतीचा कबुलीजबाब दिला होता गांधीजीच्या आईवडिलांचे निधन याच घरात झाले विवाहानतर कस्तुरबाही येथे रहात होत्या बॅरिस्टर होण्यासाठी ते येथूनच परदेशी गेले बॅरिस्टर झाल्यावर ते येथेच परतले येथूनच ते दक्षिण अफ्रिकेत गेले व तेथील कामगिरीनतर येथेच परतले १९२० साली राजकोटमध्ये गाधी कुटुबाची आर्थिक स्थिती ढासळल्याने हे घर त्यांनी विकून टाकले स्वातत्र्यानतर तेव्हाच्या सौराष्ट्र राज्याने हे घर खरेदी केले व त्याचे स्मारक करून गांधी शताब्दीच्यावेळी १९६९ मध्ये सुप्रसिद्ध सर्वोदयवादी श्रीमननारायण आगरवाल याच्या हस्ते उद्घाटन केले

या स्मारकातील पहिल्या कक्षात गाधीजीच्या विद्यार्थीजीवनाचे फोटो लावले आहेत गाधीजी परदेशात जाण्यापूर्वी त्यांच्या आईने त्याना घ्यायला लावलेली प्रतिज्ञा, गाधीजींचे जन्मतारखेचे सर्टिफिकेट इ तेथे आहे दुसऱ्या

कक्षात गांधीजींच्या जन्मशताब्दीप्रसगी जगातील विविध देशातील गाधीजीच्या आठवणीशी निगडित छायाचित्राचा सग्रह केलेला आहे तिसऱ्या कक्षात गाधीजींच्या सौराष्ट्रातील कारकीर्दीतील महत्त्वाच्या घटनाची नोंद आढळते गांधीजी बॅरिस्टर झाल्यानतरचे फोटो तेथे आहेत दक्षिण आफ्रिकेत गाधीजीनी केलेल्या कामगिरीबाबतही माहिती मिळते चौथ्या कक्षात गाधीजींची सायकल चालवताना, आगगाडीतून प्रवास करतानाची छायाचित्रे आहेत त्याचे अनेक नेत्यांबरोबरचे फोटोही आहेत त्यात जयप्रकाश नारायण, त्याच्या पत्नी प्रभादेवी इ बरोबर फोटो आहेत गांधीजींचे फक्त चित्र व त्यापुढे *INDIA* असा पत्ता असलेले परदेशातून आलेले एक मजेशीर पत्रही त्यात आहे पाचव्या कक्षात स्वातत्र्यसग्रामाची चित्रे, दाडीयात्रेच्या सत्याग्रहाची चित्रे आहेत पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये कस्तुरबाचे टिपलेले अतिम क्षण व शोकमग्न गाधीजींचे फोटो पाहून मन द्रवते चार्लीचॅप्लीन, लुई फिशर, चँग कै शेक, रोमारोला, लॉर्ड माऊटबॅटन इ परदेशी व्यक्तींबरोबरचे गाधीजीचे फोटोही आहेत समग्रदृष्टचा पाहिले तर मोहनदासपासून महात्मा बनण्याच्या त्यांच्या आयुष्याच्या जडणघडणीच्या प्रवासाची प्रचीती ‘कबा गाधीनो डेला’ या वास्तूच्या भेटीने आली या स्मारकाच्या बाजूच्या एका खोलीत अनाथ स्त्रियांनी तयार केलेल्या वस्तूच्या विक्रीचे केंद्र आहे त्याचे नाव ‘श्री पुतलीबा उद्योगमदिर’ आहे बारीक रगीबेरगी मण्यापासून बागड्या, माळा, फ्लॉवरपॉट इ तयार केलेल्या अनेक नाजूक वस्तू तेथे मिळतात उल्कासाठी व तिच्या मैत्रिणीना भेट देण्यासाठी नाजूक माळाची व बागड्यांची खरेदी केली

तेथील भेट आटोपून पाचच्या सुमाराला ज्युबिली पार्कमध्ये आलो तेथील वॅटसन म्युझियम पहायचे होते पण वेळ फार थोडा असल्याने एक धावता फेरफटका मारला ज्युबिली पार्क हा राजकोटचा प्रसिद्ध पार्क तरुण तरुणी, मुले याची तेथे गर्दी उसळली होती उल्का-उदयही तेथे रमले पार्कमध्ये एक पब्लिक लायब्ररी आहे तेथे मराठी वृत्तपत्रे पहायला मिळाली राजकोटच्या बाजारात फेरफटका मारला चक्कर मारून रेल्वे रिटायरिंग रूमवर परतलो दुसऱ्या दिवशी जायचे होते जामनगरला

## प्रिन्स रणजींचे जामनगर

ओखाकडे धावणाऱ्या गाडीने ठीक सात वाजता राजकोट स्टेशन सोडले प्रवास कटाळवाणा होता दहाच्या सुमारास जामनगर स्टेशनवर गाडी थांबली प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या मजल्यावर रेल्वेचे छान रिटायरिंग रूम आहे जेवण व विश्राती घेऊन तीनच्या सुमारास टांग्यातून जामनगर दर्शनाला निघालो

जामनगर हे पूर्वीच्या नवानगर सस्थानच्या राजधानीचे ठिकाण। नतर ते सौराष्ट्र राज्यात विलीन झाले उत्तरेकडील जामहला या घराण्याने येथील जेठवा राजपूत यांचा शौर्याने पराभव केल्यावर राज्याची स्थापना करून इ स १५४० मध्ये नवे गाव वसवले ते हे जामनगर।

या शहराचे वैशिष्ट्य म्हणजे आतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रिकेटियर रणजितसिह याचे हे गाव। जामनगर म्हटले की आठवते प्रिन्स रणजीचे जगद्विख्यात क्रिकेट कौशल्य रणजीचा जन्म १० सप्टेंबर १८७२ रोजी जामनगरजवळील सरोदर या खेडेगावात झाला त्यांना नवानगरच्या महाराजानी दत्तक घेतल्याने ते राजकुमार झाले राजकोटच्या राजकुमार कॉलेजात शिकत असतानाच त्याना क्रिकेटची गोडी लागली त्यानतर ते विलायतेत केंब्रिजला शिक्षणासाठी गेले त्याच्याबद्दल असे सांगितले जाते की, त्यानी आपला उजवा पाय मेखेला बाधून क्रिकेटचे धडे गिरवण्यास सुरुवात केली हेतू हा की भीती नाहीशी व्हावी त्यानतर त्यांची भीती लोपली तीक्ष्ण नजरेच्या सहाय्याने दणदणीतपणे लेगकडे ते चेंडू टोलवीत शैलीदार फलदाज म्हणून त्यानी कीर्ती प्राप्त केली ऑस्ट्रेलियाविरुद्ध इग्लडतर्फे खेळण्यासाठी एम् सी सी सघात त्याची निवड होई इग्लडतर्फे कसोटी सामन्यात खेळणारे ते पहिले भारतीय क्रिकेटपटू होत रणजी १९०७ मध्ये सस्थानचे अधिपती झाले त्यामुळे त्याच्या क्रिकेटच्या खेळात खड पडत गेला रणजीनी प्रथम श्रेणी सामन्यात ७२ शतके काढली आणि २४६९२ धावा काढण्याचा विक्रम केला या ७२ शतकात १४ द्विशतके होती

रणजीच्या खाजगी जीवनाचे पैलूही मजेशीर आहेत मासे पकडण्याचा त्याना विलक्षण छद होता दम्याची व्यथा असल्याने रात्री त्याना झोप येत

नसे मग ते मासे पकडण्यात रात्र घालवीत अशा वेळी जागरण झाले तरी दुसऱ्या दिवशी त्याचे द्विशतक ठरलेले ! त्याची नजर तीक्ष्ण असल्याने त्यानी चेंडूवर हुकमत गाजवली जास्त धावा काढणाऱ्याना ते पारितोषिके जाहीर करीत इग्लडच्या आघाडीच्या फलदाजाला जास्त धावा काढल्याबद्दल सोन्याची सिगारेट केस त्यानी बक्षिस दिली रणजींना ज्योतिषाचाही नाद होता निरनिराळ्या ज्योतिषाकडून आपले भविष्य ते पडताळून पहात " राजपदाचा योग येईल " असे एका ज्योतिषाने त्यांना सागितले होते ते भविष्य खरे ठरले होते पहिल्या महायुद्धात त्यांनी लष्करात जागा स्वीकारली त्यावेळी " तुम्ही युद्धावरून सुखरूप परताल पण एक अवयव गमावून बसाल " असा इशारा एका ज्योतिषाने दिला होता तोही सत्य ठरला १९१५ मध्ये यॉर्कशायर येथे ते शिकारीला गेले असताना बदुकीचा छर्रा उडून त्याच्या उजव्या डोळ्याला जबर दुखापत झाली व रणजीवर एकाक्ष होण्याचा प्रसग ओढवला

रणजी अविवाहित होते त्याचा पुतण्या राजकुमार दुलीपसिंह याच्या-वर रणजींचे अतिशय प्रेम होते आतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दुलीपने मोठा लौकिक मिळवला रणजीच्या मार्गदर्शनाचा लाभ दुलीपला मिळाला दुलीपच्या खेळाकडे त्याचे सतत बारकाईने लक्ष असे त्याबद्दल एक आठवण अशी सांगतात की एकदा १९२६ साली दुलीपने ऑस्ट्रेलियन सघाविरुद्ध इग्लंडतर्फे खेळताना फक्त एकच धाव काढली रणजींना हे वृत्त समजल्यावर त्यानी आपल्या निवासस्थानातून रागाने तार पाठवली—

*Tell my nephew to give up cricket and to go and play tennis with Betty Nut-hall*

त्यावेळी नटहाल ह्या टेनिसपटू आग्लयुवतीशी दुलीपची ओळख झाली होती अर्थात रणजीचे असे लक्ष असल्याने दुलीपची प्रगती होऊ शकली

असे हे ' फलदाजीचा जादूगार म्हणून विख्यात असलेले रणजी वयाच्या ६० व्या वर्षी १९३३ मध्ये जामनगरला निधन पावले भारतातले रणजी करडक सामने हे त्याचे स्मारक होय जामनगरने देशाला रणजी-

सारखा श्रेष्ठ क्रिकेटपटू दिला तर क्रिकेटचा राजा रणजी यानी जामनगरला दिली—सुदर शाळा, कॉलेज, हॉस्पिटल, क्लॉक टॉवर, भव्य क्रिकेट क्रीडागणे यांची भेट!

**वैशिष्ट्यपूर्ण सोलेरियम - सूर्यस्नान आरोग्यधाम**

जामनगरची भेट तेथील सोलेरियमच्या भेटीने सुरू झाली सोलेरियम म्हणजे सूर्यस्नान आरोग्यधाम! सूर्यप्रकाशामुळे अनेक रोग बरे होऊ शकतात सूर्याचे किरण त्वचा इ विशिष्ट रोगावर लागू पडतात ह्या प्राचीन सिद्धांतावर आधारित या केंद्राची स्थापना झाली जगात सूर्यस्नानोपचाराची तीन केंद्रे आहेत जामनगरचे सूर्यस्नानगृह हे भारतातील एकमेव केंद्र आहे जामनगरचे महाराजा रणजितसिंह यानी ते स्थापन केले हे केंद्र 'रणजित इन्स्टिटयुट ऑफ पॉली रेडिओ थेरपी' या नावाने ओळखले जाते ते तीनमजली असून वरचे दोन मजले वर्तुळाकार फिरवले जातात रुग्णासाठी छोटया छोटया खोल्या असून बाजूला काचा लावल्या आहेत त्यातून हव्या त्या कोनातून पाहिजे तेवढया तीव्रतेचे सूर्याचे किरण रोग्याच्या दूषित भागावर पाडले जातात निरनिराळे त्वचारोग, अस्थिक्षय, मुडदूस इ विशिष्ट रोगावर येथे उपचार केले जातात व्याधीग्रस्त रोगी व उपचारानतर बरे झालेले रोगी याची अनेक छायाचित्रे तेथे आहेत सस्थानच्या या काळात या केंद्राला जितक्या प्रमाणात मदत मिळत असे तेवढी आता मिळत नाही त्यामुळे या केंद्राची व्यवस्था समाधानकारक नाही अशी माहिती मिळाली आम्ही गेलो तेव्हा तेथे विशेष रुग्ण दिसले नाहीत भारतातील वैशिष्टयपूर्ण असे हे केंद्र पहायला मिळाल्याने समाधान वाटले

टागेवाल्याने खाचखळग्याच्या शॉर्टकट रस्त्याने नतर नेले माणेकभाई सुखधाम पहायला जामनगरची ही हिंदूची दहनभूमी! दहनभूमीच्या आपल्या कल्पनेला हे सुखधाम पाहिल्यावर धक्का बसतो प्रवेशद्वारापासून रस्त्याच्या दुतर्फा भारतात होऊन गेलेल्या सत, महात्मे नेते इ महापुरुषाचे शभरावर पुतळे आहेत स्वामी विवेकानद, म गाधी, सरदार पटेल इ मान्यवर व्यक्तींचे पुतळे त्यात आहेत पुतळ्याखाली बोधप्रत वाक्ये लिहिली

आहेत बाजूला छोटे उद्यान आहे लायब्ररी आहे पाण्याची सोय आहे तसेच दहनासाठी ओटे असून त्यावर शेड आहे थोडक्यात स्मशानभूमीच्या भयानक वातावरणाची तीव्रता कमी करून त्यास चांगले स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे जन्माला आलेल्या प्रत्येकाला मृत्यू हा अटळ आहे तो भीषण नाही हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवूनच ही स्मशानभूमी आकर्षक केली आहे भारतातल्या इतर ठिकाणीही अशा प्रकारे आकर्षक स्मशानभूमी असाव्यात असा विचार मनात आला

शहराचा मध्यवर्ती रस्ता ओलांडून खंबालिया गेटजवळ आलो या भव्य वेशीचे कोरीव काम देखणे आहे तेथे जवळच प्रसिद्ध लखोटा किल्ला आहे या भारदस्त किल्ल्याचा काही भाग नादुरुस्त असल्याने वर जाणे सुरक्षित नाही म्हणून वर गेलो नाही जामनगरचे महाराजा किल्ल्याच्यावर टोकावर सायंकाळी बसून बाजूच्या तलावाच्या काठावरून झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्याचा आस्वाद घेत अशी माहिती मिळाली बाजूच्या तलावाच्या मध्य-भागी एका इमारतीत वस्तुसंग्रहालय आहे सौराष्ट्रातील जुन्या, दुर्मिळ शिल्पकृती, चिनीमातीच्या सुंदर कलाकुसरीने युक्त पॉटरीज यांचा संग्रह तेथे आहे जुनी हस्तलिखितेही आहेत जामनगरच्या महाराजाचा भव्य अश्वारूढ पुतळा प्रेक्षणीय आहे तलावाच्या काठावर सत्यनारायण महादेव मंदिर आहे त्यात श्रीकृष्णाची अलंकारयुक्त काळ्या पाषाणाची मूर्ती आहे तसेच तेथे श्री बालाजी हनुमान संकीर्तन मंदिर आहे ही दोन मंदिरे पाहून भीडभंजन महादेवाच्या दर्शनाला आलो या मंदिराचे आवार प्रशस्त असून दर्शनाला गर्दी बरीच होती

जामनगरच्या भेटीत शेवटी बाजारपेठेत आलो सौराष्ट्रातील प्रसिद्ध बांधणीसाडी घेण्याची इच्छा होती एका मोठ्या दुकानात गेलो त्याने एकाहून एक उत्कृष्ट नमुने दाखवले बांधणी साडी कशी तयार करतात याची माहितीही दिली साध्या प्लेन साडीवर निरनिराळ्या ठिकाणी बारीक बारीक गाठी बांधून नंतर निरनिराळ्या रंगात रंगवून त्यावर अप्रतीम डिझाईन तयार होते सर्व काम हाताने केले जाते फळे, फुले, हत्ती इ चे नक्षीकाम वैशिष्ट्य-पूर्ण होते गुजराती समाजात लग्नाच्या वेळी ही बांधणी साडी मानाची

समजली जाते श्रीमंत असो गरीब आपल्या ऐपतीप्रमाणे या साडीची खरेदी त्यावेळी करतातच डिझाईनप्रमाणे व कपड्याच्या दर्जाप्रमाणे या साडीच्या किंमती ३० रुपयांपासून ३००० रु पर्यंत होत्या दुकानदार सांगत होता की," काही वर्षांपूर्वी इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीचे भारतात आगमन झाले होते त्यावेळी त्यांना मौल्यवान बांधणीसाडी भेट दिली होती परदेशातील जपान इ ठिकाणाहून काही तज्ज्ञ या साड्यांचे यंत्राद्वारे कसे प्रिंटिंग करता येईल याचे ज्ञान मिळवण्यासाठी भारतात आले होते पण बरेच दिवस ठाण मांडूनही त्यांना त्यात यश आले नाही ' असेही तो दुकानदार म्हणाला सौराष्ट्रात ही हस्तकला पिढ्यानपिढ्या चालत आली आहे जामनगरच्या या भेटीच्या आठवणीदाखल एक साडी खरेदी केली

'कोनार्क ते कन्याकुमारी' या पुस्तकाचे महाराष्ट्र टाइम्समधील परीक्षण वाचून जामनगरच्या मोहनभाई बदियानी यांनी पत्रद्वारे ओळख करून घेतली होती त्यांनी जामनगरला आल्यावर त्यांच्या घरी येण्याबद्दलचे आग्रहाने आमंत्रण दिले होते त्यांच्या घरी गेलो तेव्हा त्यांना खूपच आनंद झाला त्यानाही प्रवासाची खूप आवड असून त्यांचे बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत आग्रह करून त्यांनी पुरीभाजीचे गरमागरम जेवण दिले खूप दिवसांनी घरगुती जेवण मिळाल्याने मुले खूष झाली

जामनगरची अर्ध्या दिवसाची धावती भेट घाईगर्दीची पण मजेशीर झाली येथील रस्ते रुंद व काटकोनात, रेखीव असून बगीचेही आहेत म्हणून जामनगरला *Jewel of Kathiayawar* म्हणत पण शहराच्या मध्यभागातून रेल्वेचे रूळ गेल्याने अनेक ठिकाणी वारंवार वाहतुकीला अडथळे येतात रात्री रिटायरिंग रूमवर परतलो आता ओढ लागली होती द्वारका भेटीची !

✦ ✦



# मीरा–कृष्णाची द्वारका

जामनगरहून सकाळी दहाला निघालेली गाडी दुपारी तीन वाजता द्वारका स्टेशनमध्ये पोहोचली द्वारका येथील रेल्वे रिटायरिंग रूम स्टेशनवर नसून थोडया अंतरावर आहे समोर मोकळे कंपाऊंड असलेल्या या हवेशीर अशा निवासात जागा मिळाली वाथरूम मात्र संलग्न नाहीत काही रूम दोन बेडच्या तर काही तीन बेडच्या असून ८, १० बेडचा मोठा जनरल हॉल पण आहे तसेच स्वतंत्र स्वैपाकघर आहे गावात धर्मशाळेत उतरण्यापेक्षा हे स्वच्छ निवासस्थान पसंत केले आम्ही पट्कन उतरून रूम पटकावली म्हणून बरे झाले कारण थोड्याच वेळात प्रवाशांनी हे निवासस्थान गजबजून गेले व अनेकांना जागा न मिळाल्याने परत जावे लागले गावात धर्मशाळा स्टेशनपासून खूप लांब अंतरावर असल्याने येथे नेहमीच गर्दी होते असे तेथील चौकीदार म्हणाला सामान लावेपर्यंत एक टांगेवाला आला गावात दर्शनाला दुपारी चार वाजता जाऊ असे तो म्हणाला परत स्नान करून

तासभर विश्राती घेतली चार वाजता टांगेवाला हजर झाला चहा घेऊन द्वारका नगरीच्या दर्शनाला निघालो

द्वारका ! आद्य श्रीशंकराचार्य यानी वैदिक धर्माच्या प्रसारासाठी रामेश्वर, जगन्नाथपुरी, बद्रीनाथ व द्वारका या चार धामाची स्थापना केली द्वारका हे पश्चिमेकडील धाम ! तसेच द्वारका ही सप्तपुरीपैकी एक मोक्ष-दायी पुरी आहे

**अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवन्तिका ।**

**पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिका ।।**

या श्लोकातून हेच सांगितले आहे द्वारिका म्हणजे छोटे द्वार द्वारका हे पश्चिम किनाऱ्यावरील गुजरातचे प्रवेशद्वार समजले जाते

पौराणिक काळात श्रीकृष्णाने मगधसम्राट जरासंध याचा जावई कंस याचा वध केला त्याचा सूड घेण्यासाठी जरासंधाने मथुरेवर सतत सतरा वेळा हल्ले केले मथुरेवर कालयवन नावाचा दैत्यही सतत हल्ला करायचा कृष्णाने प्रत्येक वेळी हल्ले परत लावले तथापि मथुरेवरील या स्वाऱ्यामुळे अफाट प्राणहानी होत असे हे संकट टाळण्यासाठी श्रीकृष्णाने विश्वकर्मा कुबेर व इंद्र यांच्या मदतीने पश्चिम किनाऱ्यावर आपल्यासह यादवांना निर्वेध राहण्यासाठी ही द्वारकानगरी ऊर्फ द्वारावती वसवली त्यावेळी महाभारत, हरिवंश यात तसेच विष्णुभागवत, वराह-स्कंद पुराणे यात द्वारकेची विस्तृत वर्णने आहेत द्वारावती, द्वारवती, द्वारमती इ अनेक नावांनी ही नगरी ओळखली जाई या नगरीभोवती असलेल्या तटाला अनेक दारे होती म्हणून हिला द्वारका, द्वारवती इ नावे होती हरिवंशात म्हटले आहे–

**' कृता द्वारवती नाम बहुद्वारा मनोरमा '**

अनेक द्वारानी युक्त अशी द्वारवती नावाची मनोरम नगरी निर्माण केली

**चतुर्वर्णानां मोक्षद्वाराणि सन्ति यत्रेति ।**

चारही वर्णांना जिथे मोक्षद्वारे खुली आहे ती द्वारावती होय अशीही एक द्वारका नावाची व्युत्पत्ती आहे

हरिवंशात प्राचीन द्वारकेच्या विस्ताराचे, वैभवाचे व अभेद्यतेचे वर्णन केले आहे त्यावेळी द्वारका नगरीभोवती विस्तीर्ण तट असून ते उत्तुंग व चुन्याने रंगवलेले होते तटाच्या लगतच खोल खंदक होते तटावर होती आग ओकणारी तोफांसारखी अस्त्रे, लोखंडी चक्रे व सोन्याच्या जाळ्या । द्वारकेचा विस्तार आठ योजने रुंद व बारा योजने लांब होता ती दोन प्रकारच्या उपनिवेशांनी युक्त होती. तिच्यात आठ मोठे मार्ग व सोळा मोठे चौक होते सागराने तिन्ही बाजूंनी वेढल्यामुळे द्वारकेला एकच प्रवेशमार्ग होता

पौराणिक वर्णनानुसार प्राचीन द्वारकेचा विस्तार शतयोजने असून तिच्यातील प्रासाद गगनचुंबी होते प्रासादाची शिखरे सुवर्णाची होती म्हणून तिला सोन्याची द्वारका असेही म्हणतात अशा या द्वारकेत श्रीकृष्णाने यादवांसह सुखाने कालक्रमणा केली व स्वत साठी हरी मंदिर बांधून घेतले

सुखासनी संपन्न यादव श्रीकृष्णाच्या अवतार समाप्तीच्या शेवटी मदिरासक्त व्यसनी बनले पिंडारक क्षेत्रावर विश्वामित्र, दुर्वास, कण्व इ ऋषी जमले असताना यादवकुमारांनी त्यांची थट्टा केली श्रीकृष्णाचा मुलगा सांब याच्या पोटाभोवती वस्त्रे गुंडाळून व त्याला साडी नेसवून ते त्याला ऋषींकडे घेऊन गेले त्यांनी ऋषींना विचारले, हिला मुलगा होईल की मुलगी ? या चेष्टेमुळे ऋषींनी संतापून शाप दिला की, ' हिला मुसळ होईल व ते मुसळ यादवांचा नाश करील ' यादवकुमार घाबरले त्यांचा प्रमुख उग्रसेन याच्या सल्ल्यानुसार त्या मुसळाचे चूर्ण करून त्यांनी ते समुद्रात टाकून दिले समुद्राच्या लाटांनी ते चूर्ण प्रभासतीर्थावर आणून टाकले व त्यापासून तेथे लव्हाळे उगवले

या घटनेमागे होता गांधारीचा शाप । महाभारताच्या भीषण युद्ध-समाप्तीनंतर कौरवांचा नाश झाल्याने त्यांची माता गांधारी खूप शोक करीत होती युधिष्ठिराच्या सांगण्यावरून तिच्या सांत्वनासाठी श्रीकृष्ण गांधारीकडे गेला त्यावेळी चिडून गांधारी त्याला म्हणाली, " कृष्णा, तू योग्य शिष्टाई केली असतीस तर हे भयानक युद्ध टाळता आले असते कारण दोन्ही पक्ष तुला मानीत होते पण आता काय उपयोग ? माझे सर्व आप्त, पुत्र, नातू या युद्धात मारले गेले मी तुला शाप देते की, तुझ्या यादवकुलाचा नाशही

असाच होईल आम्ही जसे आपापसात भांडून मेलो तसेच तुम्हीही आपापसात भांडून मराल यादवाच्या स्त्रिया घरोघरी टाहो फोडतील " यावर न रागावता स्मित करून भगवान माता गांधारीला म्हणाले – " तू माझे काम सोपे केलेस आम्ही यादव इतके बलाढ्य आहोत की आमचा नाश झाला तर आमच्याच मूर्खपणाने होईल कारण आमचा नाश करील असा बाहेरचा शत्रू नाही."

त्यानतर काही वर्षांनी ऋषीच्या शापाची वरील घटना घडली श्रीकृष्णाने पुढील विधिलिखित ओळखले होतेच त्याने यादवाना द्वारकेहून प्रभासतीर्थावर जाण्याची सूचना केली तेथील समुद्रकिनाऱ्यावर सर्व यादव जत्रेसाठी जमले होते सर्वजण भरपूर मद्य प्याले होते आपापसात भांडणे सुरू होऊन त्याचे रूपांतर मारामारीत झाले एकाने सहज तेथे उगवलेले लव्हाळे उपटले तो त्याचे शस्त्रात रूपातर झाले ते पाहून प्रत्येकजण लव्हाळे उपटून एकमेकाना मारू लागला त्यात सर्व यादवाचा सहार झाला त्यानतर कृष्णाच्या तळपायाला बाण लागून त्यानेही हिरण्यानदीकाठी देह ठेवला कृष्णावतार समाप्तीच्या वेळी समुद्र उचबळून आला व त्याने द्वारकानगरीला पोटात घेतले फक्त हरीमदिर तेवढे शाबूत राहिले

अशी ही पौराणिक कालात समुद्रात नाहीशी झालेली द्वारकानगरी दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकात पुन वसवली गेली ती दोनशे वर्षे टिकली चौथ्या किंवा पाचव्या शतकात ती समुद्राने पुन गिळली सहाव्या किंवा सातव्या शतकाच्या सुमारास ती पुन वसवली गेली तीच हल्लीची द्वारका होय

## कथा गर्व हरणाची–रुक्मिणी मदिर

टांगेवाल्याने प्रथम आम्हाला रुक्मिणी मदिर पहायला नेले गावापासून उत्तरेकडे साधारण दीड कि मी अतरावर हे मदिर आहे मदिरासमोर सिमेटची फॅक्टरी आहे रुक्मिणीचे हे पुरातन मदिर सुमारे साडेचारहजार वर्षापूर्वीचे जुने समजले जाते कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहाची सप्तपदी येथील आवारात झाली. त्या ठिकाणी एक लहानसा चौथरा व तोरण

असलेली चौखाबी आहे हे छोटेसे मदिर भुरकट रगाच्या पाषाणापासून बनवले असून बाहेरून तळापासून वरपर्यंत नक्षीदार कोरीव कामाने सजले आहे ऊन, खारा वारा व पाऊस यामुळे काही कलाकृती झिजलेल्या दिसतात तर काही ठिकाणी दुरुस्ती केलेली दिसते मदिराच्या गाभाऱ्यात रुक्मिणीची अलकारानी नटवलेली पाढऱ्या सगमरवराची मोहक मूर्ती आहे रुक्मिणी ही श्रीकृष्णाची आवडती पट्टराणी। तिचे हे मदिर द्वारकाधीश कृष्णाच्या मदिरापासून इतके दूर का ? हा विचार मनात आला रुक्मिणीच्या मूर्तीचे दर्शन घेतल्यावर समोरच्या छोट्या मडपात भिंतीवर कृष्ण-रुक्मिणीची सहा रगीत चित्रे दिसतात तेथील पुजाऱ्याने दर्शनाला आलेल्याना सतरजीवर बसायला सागितले रुक्मिणीची कथा पान चघळत, पंख्याने वारा घेत गोड हिंदी भाषेत सांगायला सुरुवात केली

रुक्मिणी ही कृष्णाची अष्टनायिकांपैकी सर्वात जास्त आवडती राणी' रुक्मिणीने आपल्या भावाचा कडवा विरोध बाजूला सारून श्रीकृष्णाशी विवाह केला पौराणिक काळातील हा एक प्रसिद्ध प्रेमविवाह। स्वरूपवान रुक्मिणीला कृष्णाची पट्टराणी झाल्याने गर्व वाटे ते गर्वहरण करण्यासाठी श्रीकृष्णाने दुर्वासऋषीची मदत घेतली कृष्णाने रुक्मिणीसह दुर्वासऋषीकडे जाऊन भोजनाचे आमत्रण दिले दुर्वासऋषी म्हणाले, " मी पूजा कार्यात गुतलेलो आहे प्राण्यांनी ओढलेल्या वाहनात मी बसणार नाही तुम्ही दोघे जर रथ ओढत असाल तर मी येईन " कृष्णाने ते मान्य केल्यावर रुक्मिणीलाही ते मान्य करणे भाग पडले वाटेत ती थकली तिला तहान लागली श्रीकृष्णाने पायाचा अगठा दाबून एक झरा निर्माण केला. रथ थाबवून रुक्मिणीने पाणी प्राशन केले व तहान भागवली आपली पूर्व परवानगी न घेता पाणी प्राशन केल्याने दुर्वासऋषी कोपले त्यानी रागाने रुक्मिणीला शाप दिला की, तू कृष्णापासून बारा वर्षे निर्जन ठिकाणी दूर तपाचरण केले पाहिजे रुक्मिणीने मग बारा वर्षे तपश्चर्या केली तिचा अहंकार अशा प्रकारे दूर झाला तिने एकातवासात जेथे तपश्चर्या केली तेथे हे मदिर आहे

रुक्मिणीमंदिर पाहून समुद्रकिनाऱ्यावरील बिर्लांनी बाधलेल्या गीतामदिराला भेट देण्यासाठी आलो या मदिरात कृष्णाची उभी व अर्जुनाची

बसलेली चकचकीत मूर्ती आहे बाजूला दोन्ही भिंतींवर गीतेच्या अठरा अध्यायाचे सार कोरले आहे मंदिरातील शांत व स्वच्छ वातावरणामुळे मन प्रसन्न झाले बाजूला समुद्राची नैसर्गिक पार्श्वभूमी असल्यामुळे मंदिराच्या रमणीय वातावरणात भर पडली आहे मंदिराशेजारी बिर्लांनी बांधलेली भव्य धर्मशाळा आहे या धर्मशाळेसमोर प्रशस्त आवार आहे

गीता मंदिरापासून निघाल्यावर वाटेत सिद्धेश्वर महादेव मंदिर पाहिले तेथील नंदीला चांदीची शिंगे आहेत तेथून दीपगृह पाहण्यासाठी गेलो एकशेवीस फूट उंचीच्या या दीपगृहात ५० लाख कँडलपॉवरचा अतिप्रकाशमान दिवा सूर्यास्तानंतर सूर्योदयापर्यंत प्रकाशझोत फेकीत फिरत असतो. सुमारे तीस कि मी अंतरापर्यंतच्या जहाजांना हा प्रकाश दिसू लागतो तसेच धुक्याच्या वेळी धुक्याचा संदेश देणारा सायरन वाजवला जातो तोही तितक्याच अंतरापर्यंत लांब ऐकू जातो दीपगृह पाहून निघण्याच्या वेळी सूर्यास्त झाला आकाश आणि पाणी यांच्या सीमारेषेवर सूर्यदेवाचे लालसर बिंब अस्तंगत झाले

## द्वारकाधीश मंदिर

दीपगृहानंतर द्वारकेच्या प्रसिद्ध द्वारकाधीश मंदिराच्या जवळ आलो मुख्य बाजाराकडील प्रवेशद्वाराला ‘स्वर्गद्वार’ म्हणतात तर गोमती नदीच्या बाजूला असलेल्या दाराला ‘मोक्षद्वार’ म्हणतात तेथे ५६ पायऱ्या आहेत

श्रीकृष्णाचा पणतू वज्रनाथ याने सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी या मंदिराच्या गाभाऱ्याचा व मागील भाग बांधला त्याने श्रीकृष्णाच्या स्मरणार्थ ‘हरीगृह बांधले त्याच्या वंशजांनी तिथे कृष्णाची मूर्ती स्थापन केली असे म्हटले जाते मंदिर भुरकट रंगाच्या पाषाणापासून बनविले आहे या मंदिराचे गर्भगृह व सभामंडप हे दोन भाग आहेत पूर्ण मंदिर ७२ दगडी स्तंभावर आधारित असून त्यात लाकूड किंवा लोह यांचा वापर केलेला नाही गर्भगृहासमोरील सभामंडपाला आठ स्तंभ आहेत. सभामंडपाला आठ मजले आहेत चौथ्या मजल्यावर शक्तीमातेचे मंदिर आहे पाचवा मजला तळापासून

शभर फूट उंच असून त्याला 'लाडवमंदिर' हे नाव आहे समुद्रात जेव्हा द्वारका गिळली तेव्हा फक्त 'लाडवमंदिर पाण्यावर राहिले असा समज आहे या पाचव्या मजल्यावरून द्वारकानगरी व समुद्र यांचे विहंगम दृश्य दिसते

मंदिराची उंची दीडशे फूट असून मंदिराच्या शिखरावर सुवर्णकळस आहे त्यावर ६५ फूट उंचीचा ध्वजदंड आहे त्यावरील ध्वज अस्सल रेशमी कापडाचा असून तो पुरविण्याचा मान प्राचीन काळापासून एका घराण्याकडे चालत आला आहे दरवर्षी संक्रांतीच्या दिवशी जुना ध्वज उतरून नवा ध्वज चढवतात

मंदिराची शिल्पकला उच्च दर्जाची आहे त्यामध्ये हिंदू, बौद्ध व जैन कलाकृतींचे संमिश्रण झाले आहे. गुप्त पल्लव चालुक्य यांच्या अधिपत्याखाली द्वारका असल्याने त्यांच्या कलेचा प्रभाव मंदिरावरही पडला आहे मत्स्य, वराह, नरसिंह, परशुराम यांच्या मूर्तींशिवाय बुद्धाचीही मूर्ती आहे सभा-मंडपाला ६० भारदस्त स्तंभ असून ते जवळ जवळ असल्याने सभामंडप प्रशस्त वाटत नाही या मंडपात कृष्णजीवनावरील कालियामर्दन, रासक्रीडा गीताकथन इ भव्य चित्रे आहेत गर्भगृहाला चांदीचा दरवाजा असून द्वारकाधीश भगवान श्रीकृष्णाची काळ्या पाषाणाची मूर्ती आत आहे तीन फूट उंचीची, सिंहासनावर अधिष्ठित चतुर्भुज मूर्ती पाहून धन्य वाटले मूर्तीपुढे चांदीची प्रभावळ असून विद्युत् दीपांच्या माळांनी रोषणाई केली होती मंदिरातील ही द्वारकाधीशाची मूर्ती रणछोडराय या लोकप्रिय नावाने ओळखली जाते


गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याने १४८० मध्ये मंदिरावर हल्ला चढवला तेव्हा तेथील पुजाऱ्यांनी घाईत मूळ मूर्ती हलवून प्रथम लाडव मंदिरात ठेवली व नंतर त्याची शंखोद्धार बेटावर स्थापना केली तर काहींच्या मते डाकोरचा कृष्णभक्त बोडाणा याने रणछोडराय यांची मूळ मूर्ती नेल्यावर पुजाऱ्यांनी त्याचा पाठलाग केला मूर्ती न मिळाल्याने हताश होऊन ते परत आले व निराशेने उर बडवू लागले तेव्हा भगवंतांना दया आली व त्यांना सांगितले की, द्वारकेतील एका विवक्षित विहिरीत मूर्ती मिळेल त्याप्रमाणे मिळालेल्या मूर्तीची या मंदिरात स्थापना होऊन पूजा—अर्चा सुरू झाली ही मूर्ती डाकोर येथील मूर्तीपेक्षा थोडी लहान आहे

द्वारकेच्या मंदिरात सावळ्या श्रीकृष्णाच्या मूर्तीचे दर्शन घेताना डोळ्यासमोर नाचू लागली– जिचे दुःख कुणी जाणू शकले नाही ती कृष्णाची प्रेमदिवानी मीरा। राजस्थानच्या रखरखीत वाळवटातील एका गावात जन्मलेल्या सौंदर्यशाली मीराचा विवाह चितोडगडच्या राजपुत्राशी झाला खरा पण ती म्हणायची माझा विवाह कृष्णाशी झाला आहे। कृष्णाशिवाय दुसरे प्रेमबधन मानायला ती तयार नव्हती मीरा म्हणते–


**मेरे तो गिरधर गोपाल दूसरो न कोई ।**
**जाके सिर मोर-मुकुट मेरो पति सोई ॥**

मीराच्या कोकीळ कठातून कृष्णभक्तीचा झरा द्रवत होता कृष्णाच्या भक्तीपुढे कुलमर्यादा विसरून ही साध्वी मीरा पायात घुंगरू बाधून हाताने चिपळ्या वाजवीत, तबोऱ्याचे सूर आळवीत कृष्णप्रेमरसात रममाण होऊन जायची पण त्यासाठी तिला आपल्या कुटुबियाकडून यातनाचा डोंगर सहन करावा लागला त्याला कंटाळून पतीनिधनानतर ती शेवटी चितोडगड सोडून वृदावनची यात्रा करीत निळ्या सागराच्या तटी द्वारकेला कृष्णाच्या सान्निध्यात आली रणछोडरायजीच्या या मंदिरात, गिरधरगोपालाच्या मूर्तीसमोर रात्रंदिवस ती बसून रहायची कृष्णाचं सावळं रूप आपल्या नेत्रात साठवण्याची तिची धडपड होती मीरा म्हणते–

**बसो मेरे नैननमें नंदलाल ।**
**मोहनी मूरत सावली सूरत**
**नैणा बने विसाल ।**
**अधर सुधारस मुरली राजती**
**उर बैजन्ती माल ॥**
**छुद्र घटिका तटकटि सोभित**
**नुपूर सबद रसाल ।**
**'मीरा' प्रभु सतन सुखदाई**
**भक्त वछल गोपाल ॥**
**बसो मेरे नैननमें नदलाल ।**



कुंड, सूर्य मंदिर, मोढेरा



नक्शीदार तोरण, विमलवसही मंदिर, माउंट अबू

या मंदिरातील मीराच्या स्वरआलापापुढे धीरगंभीर सागराचा रौरव जणू फिका पडत होता मीराला कृष्णाबद्दल इतके उत्कट अपार प्रेम वाटत होते की मीरा म्हणते—

जो तुम तोडो, पिया मै नही तोडू ।
तो सो प्रीत तोड कृष्णा । कोनसग जोडू ?॥
तुम भये तरुवर मैं भई पखिया ।
तुम भये सरवर मैं तेरी मछिया ॥
तुम भये चदा मैं भई चकोरा ।
तुम भये मोती, प्रभु हम भये धागा ॥
तुम भये सोना हम भये सोहागा ।
मीरा कहे प्रभु ब्रजके वासी ।
तुम मेरे ठाकूर मैं तेरी दासी ॥

अशी ही मीरा मदिरात शेवटी कृष्णरूपात विलीन झाली ! तर-कोणी म्हणतात आपल्या लाडक्या गिरीधर गोपालाच्या चिरतन भेटीसाठी मदिराच्या पश्चिम तटासन्निधच्या उन्मत्त लाटाच्या बाहूत ती सामावली गेली

मदिरात द्वारकाधीशाची पहिली काकड आरती सकाळी सातला होते दुसरी शृगार-आरती साडेदहाला होते त्यावेळी मूर्तीला सुंदर पोषाख चढवून सुवर्ण-अलकारांनी ती सजवली जाते सध्याकाळी साडेसातला तिसरी आरती होते

चौदाव्या शतकात बांधलेल्या या द्वारकाधीश मदिराच्या दुरुस्तीसाठी मदिराच्या मूळ उभारणीत वापरलेल्या दगडाची खाण परिश्रमाने शोधण्यात आली व तेथून दगड आणण्यात आले दुरुस्तीचे काम चालू दिसले

दर्शन व सायआरती आटोपून आवारातील शेजारची मदिरे पहायला एका पुजाऱ्याबरोबर गेलो कृष्णाच्या अष्टनायिकापैकी जांबुवती, सरस्वती, लक्ष्मी, राधा याची छोटी छोटी मदिरे आहेत लक्ष्मीला राजभोग तर राधेला मख्खनभोग चढवला जातो याखेरीज देवकीमाता व बलराम याचेही छोटेसे मदिर आहे आद्य शकराचार्यांचे शारदापीठ तेथेच आहे तेथे त्याच्या

पादुका आहेत त्याचा काळ इ स च्या सहाव्या शतकाच्या सुमारास मानला जातो त्यांची जीवनकहाणी चित्रित केली आहे त्यांचे शृंगेरी, शारदा, ज्योतीर्मठ, गोवर्धन हे इतर चार मठ आहेत शारदापीठाचे पहिले अधिपती सुरेश्वराचार्य होत हे पूर्वाश्रमीचे मडनमिश्र। त्याचा व शकराचार्यांचा वाद होऊन त्यात मडनमिश्र हरले मग त्यानी शकराचार्यांचे शिष्यत्व पत्करले त्याना दीक्षा दिल्यावर शकराचार्यांनी त्याचे नाव सुरेश्वराचार्य ठेवले या शारदापीठावर आतापर्यंत अधिष्ठित शकराचार्यांची नावे फलकावर लिहिली आहेत सध्या या शारदापीठामार्फत विद्यासभा, आर्टस् कॉलेज, सस्कृत ॲकॅडमी, भारतीय सशोधन मदिर, ओरिएटल लायब्ररी, वेदभवन, वृद्धाश्रम, आयुर्वेदिक दवाखाना इ लोकोपयोगी सस्था चालविल्या जातात बाजूच्या खोलीत सुमारे एक हजार लहान मोठे शाळिग्राम ठेवले आहेत


मदिराच्या दुसऱ्या बाजूकडील मोक्षद्वाराने उतरल्यावर नजीकच गोमतीतीर्थ आहे तेथे गोमती नदी व समुद्र याचा सगम आहे ही नदी म्हणजे खाडीच। पाणी खारट सगमस्नान, गोमतीची ओटी भरणे इ धार्मिक कृत्ये तेथे होतात सगमाजवळ एक छोटे सूर्यमदिरही आहे मदिराच्या दुसऱ्या बाजूच्या स्वर्गद्वाराच्या बाजूला बलदेव आणि त्रिविक्रम याची दोन फार पुरातन मदिरे असून ती नाजूक कोरीव कामाने सजली आहेत

अशी ही द्वारकानगरी– रामानुजाचार्य, ज्ञानेश्वर, कबीर, सतकवी तुलसीदास, समर्थ रामदास, चैतन्य महाप्रभू, भक्तकवी नरसी मेहता, कृष्ण-भक्त बोडाणा, गुरुनानक, साध्वी मीराबाई यांच्या भेटीने पुनीत झालेली आहे

द्वारकाधीश मदिर पाहून तृप्त मनाने बाहेर पडलो तीर्थयात्रेच्या ठिकाणी जशी असतात तशीच भांडी, माळा, मूर्ती याची विविध दुकाने रस्त्याच्या कडेला होती थोडीफार खरेदी केली बाजारपेठेतील एका भोजनालयात गरमागरम जेवणावर ताव मारला पण पाणी खूपच मचूळ होते द्वारका हे गाव रेताड असल्याने पाणी खारट व शेतीचा अभाव आहे

रात्री टांगा करून रेल्वे रिटायरिंगरूममध्ये परतलो सामानाची आवराआवर रात्रीच करून ठेवली कारण दुसऱ्या दिवशी सकाळी ओखाला जाऊन बेट द्वारकेचे दर्शन घेऊन परतीचा प्रवास सुरू करावयाचा होता

✦ ✦



# ओखा ते मेहसाणा

सकाळी सहाला उठून आवरेपर्यंत टांगेवाला हजर झाला आदल्या दिवशी त्याला सूचना दिलेली होतीच बेट द्वारका पहाण्यासाठी ओखाला जाणे क्रमप्राप्तच होते ओखा ते मेहसाणा या परतीच्या प्रवासासाठी सोयीस्कर गाडी सकाळी अकराला ओखाहून सुटत होती ओखाला जाण्यासाठी सकाळी रेल्वे उपलब्ध नसल्याने साडेसातची बस पकडायची होती द्वारका बसस्टँडवर सात वाजता पोहोचलो गरम चहा घेतला प्रवाशांची गर्दी खूपच होती बस स्टँडला लागली तेव्हा मुलांनी पटापट आत शिरून जागा पटकावली गर्दीची सवय झाल्याने धक्के खात व धक्के देत कौशल्याने बसमध्ये घुसलो

द्वारका ते ओखा हा २८ कि मी अंतराचा प्रवास आहे ओखाला जाताना वाटेत २० कि मी अंतरावर मीठापूर हे गाव लागले तेथे टाटा कंपनीचे रासायनिक पदार्थांचे मोठे कारखाने आहेत ओखा बंदराजवळ बर्माशेल, एस्सो, इंडियन ऑईल इ प्रसिद्ध कंपनीच्या तेलाच्या टाक्या आहेत तसेच ॲल्युमिनियम सामानाची फॅक्टरी आहे

सकाळी नऊच्या सुमाराला ओखा स्टेशनच्या अलीकडे २ कि. मी अंतरावर बेट द्वारकेला जाण्यासाठी उतरलो थोडे पायी चालून गेल्यावर उतारूंच्या वाहतुकीसाठी असलेला धक्का लागतो तेथे छोटी स्टीमर बोट तयारच होती प्रत्येकी पन्नास पैसे देऊन तिकीटे घेतली बोटीत भारतातल्या

विविध भागातून आलेले प्रवासी होते कोणी बंगाली होते तर कोणी तामीळ तर कोणी हिंदी भाषिक। मातृभाषा भिन्न होती पण मानलेला परमेश्वर एकच असल्याने सर्वजण भगवान कृष्णाचा जयजयकार करण्यात सामील झाले होते भिन्नतेत एकतेचा अनुभव आला समुद्रात ठिकठिकाणी मोठमोठया बोटी दिसत होत्या उल्का-उदय बोटीतल्या या लहानशा प्रवासावर खूष होते पधरा मिनिटातच बोट बेट द्वारकेला पोहोचली धक्क्यावर उतरून पुलावरून चालत गेलो पूल संपल्यावर बेट द्वारकेचा प्रदेश सुरू झाला बेटाच्या प्रवेशाच्या रस्त्यावर धार्मिक कर उकळला गेला आपल्याकडे पढरपूर, आळदीलाही कर घेतातच पायी दहा मिनिटातच मदिराजवळ पोहोचलो

मुख्य मदिरात रणछोडरायाची मूर्ती आहे हे मदिर वल्लभ सप्रदायाप्रमाणे बांधलेले असल्याने त्याला शिखर नाही हे मदिर एखाद्या वाड्यासारखे वाटते मदिर साधारण शे-दीडशे वर्षांपूर्वी बाधले आहे मदिरातील लाकडाना भडक रग दिलेला आहे येथे कृष्णाचे अतपूर होते कृष्ण विश्रांतीसाठी राण्यासह येथे रहायचा म्हणून या स्थानास रमणद्वीप असेही म्हणत असत रणछोडरायाचे दर्शन घेतल्यावर कित्येक स्त्रिया जयगोपाल, जयगोपाल म्हणून नाचताना दिसल्या इतकी वर्षे होऊन गेली पण आजही श्रीकृष्णाबद्दल, त्याच्या कथाबद्दल लोकाच्या मनात किती श्रद्धा आहे याची प्रचीती येते लक्ष्मी, राधिका, जाबुवती व सत्यभामा या कृष्णाच्या राण्यांचीही शेजारी मदिरे आहेत

बेट द्वारका शखोद्धार या नावानेही ओळखले जाते त्यामागील प्राचीन कथा अशी आहे– शख नावाचा बलाढ्य असूर होता तो देवाचा कट्टर वैरी होता सृष्टीच्या उत्पत्तीच्या काळी ब्रह्मदेवाच्या मुखातून वेद बाहेर पडले ते शखासुराने हरण करून समुद्रात लपवून ठेवले वेद नष्ट झाल्याने धर्मकृत्ये खोळबली म्हणून ब्रह्मदेवाने विष्णूकडे जाऊन वेदोद्धाराकरिता प्रार्थना केली विष्णूने मत्स्याचे रूप घेऊन समुद्रात प्रवेश केला आणि शखासुराला मारून वेद वर आणले म्हणून शखोद्धार हे नाव पडले तेथे मूळ द्वारका असावी असे काहीचे मत आहे

बेट द्वारकेच्या भेटीसाठी मोठ्या उत्सुकतेने गेलो होतो पण पदरी निराशा आली द्वारकेला जाऊन बेट द्वारकेला गेलो नसतो तर रुखरुख लागली असती. यात्रा अपूर्ण झाली असे वाटले असते पण पहाण्यासारखे काही नसल्याने निराशा झाली गावात फेरफटका मारताना एकदर गलिच्छ स्वरूप पाहून वाईट वाटले मंदिराजवळच एका खोलीत श्रीकृष्णाच्या द्वारकेचे फोटो लावले आहेत त्यात एका खोलीत श्रीकृष्णाचा सोन्याचा महाल दाखवला जातो मोठ्या उत्सुकतेने आत प्रवेश केला तर पारा उडालेले मोठमोठे आरसे त्या खोलीत लावले होते ते पाहून हसूच कोसळले मंदिरानजीक प्रसादाची खरेदी केली प्रसाद मात्र चांगला होता

स्टीमरने परत ओखा बंदरावर आलो स्टेशनपर्यंत पायी गेलो कारण काही वाहनही तेथे नव्हते स्टेशनसमोरील भोजनालयात भोजन आटोपले जेवण साधेच पण रुचकर होते पण लक्ष गाडीकडे असल्याने मन लावून जेवताही येईना भरभर जेवून स्टेशनवर आलो गाडी तयारच होती मेहसाणा बोगीत बसलो राजकोटला ही बोगी कीर्ती एक्स्प्रेसला जोडणार असल्याने पहाटे मेहसाणाला पोहोचेपर्यंतचा प्रवास निर्धास्त होता दोन तासात द्वारका स्टेशन आले सामान रिटायरिंग रूममध्ये होते स्टेशनवर शोधाशोध केली पण हमाल दिसला नाही वेळ थोडा होता चंद्रकांत व मुले पटापट रिटायरिंग रूमवर गेले मी मात्र डब्यात जागा सभाळीत बसले सामान आवरून ठेवलेले होतेच पाच मिनिटात ते सामान घेऊन आले प्रवासात सामान मोजके व सुटसुटीत असल्यानेच हमालावर विसंबून न रहाता सामान सहजपणे आणले गेले मी मात्र धास्तीत होते पण सर्वजण आल्यावर हायसे वाटले सामान व्यवस्थित लावले. गाडी संथ वेगाने धावू लागली डब्यात विशेष गर्दी नसल्याने आरामात बसलो होतो जामनगर स्टेशनवर पोहोचलो तेव्हा सध्याकाळचे पाच वाजले होते डब्यात गर्दी वाढली गरम बटाटेवडे व भजी यावर ताव मारला प्रवास पुन सुरू झाला रात्री आठच्या सुमारास गाडी राजकोट स्टेशनमध्ये पोहोचली आमची बोगी पोरबंदरहून येणाऱ्या कीर्ती एक्स्प्रेसला रात्री नऊ वाजता जोडली गेली दिवसभराच्या प्रवासाने थकल्याने रात्री झोप केव्हा लागली हे

कळले नाही पहाटे पाचच्या सुमारास गाडी विरमगाव जंक्शनला पोहोचली विरमगाव हे मोठे जंक्शन आहे सौराष्ट्रात भावनगर, पोरबंदर, राजकोटकडे येथून मीटरगेज गाड्या सुटतात तसेच गांधीधाम, कच्छ व अहमदाबाद–मुंबईकडे ब्रॉडगेज गाड्या सुटतात स्टेशनवर मुंबईकडे जाणाऱ्या गाड्यांना तुफान गर्दी झालेली दिसत होती विरमगावहून गाडी निघाल्यावर सकाळी सहाला मेहसाणाला पोहोचलो क्लोकरूममध्ये सामान टाकले वेटिंगरूममध्ये सर्व आवरले गरम चहा घेऊन ताजेतवाने झालो

## मोढेरा – प्रख्यात सूर्यमंदिर

मेहसाणाहून ४० कि मी अंतरावरील मोढेरा येथील प्रख्यात सूर्य-मंदिराला भेट देण्यासाठी बसने निघालो सोळखी राजाच्या पाटण या पूर्वीच्या राजधानीपासून हे मंदिर ३० कि मी अंतरावर आहे सूर्यमंदिर म्हटले की ते जेथे असेल ते गाव आडवळणी असले तरी जायचेच असा चंद्रकांताचा आग्रह ! काश्मीरमधील मट्टन येथील व पूर्व किनाऱ्यावरील कोनार्क येथील सूर्यमंदिरे पाहून सूर्यमंदिराबद्दल एक वेगळीच उत्सुकता वाटत होती तेव्हा मोढेराचे सूर्यमंदिर पहाण्यास मुद्दाम गेलो

मोढेरा येथील हे प्रख्यात सूर्यमंदिर सोळखी राजाच्या काळात अक-राव्या शतकात (१०२६ मध्ये) राजा भीमदेव (पहिला) याच्या कारकीर्दीत बांधले गेले या आता भग्न असलेल्या सूर्यमंदिरात गर्भगृह, तोरण असलेले सभामंडप असे दोन भाग स्पष्ट दिसतात बंदिस्त मंडपाची रचना अष्टकोनी असून त्याला उंच नक्षीदार स्तंभ आहेत दोन खांबामध्ये नक्षीदार कमानी आहेत या मंदिराच्या पायाचा चौथरा चांगला उंच आहे या मंदिराच्या भिंतीच्या बाहेरील बाजू नक्षीकामाने ओतप्रोत भरल्या आहेत विविध प्राणी, देवदेवता यांच्या शिल्पकृती त्यावर आढळतात काही ठिकाणी गुडघ्यापर्यंत पोहोचणारे मोठमोठे बूट घातलेल्या मूर्ती आहेत मानवी जीवनातील प्रेम, युद्ध इ विविध प्रसंगही शिल्पकृतीत साकार केले आहेत मंदिराच्या भिंतीला पहिरपीचे कोनाडे असून त्यात सूर्यदेवतेच्या बारा प्रतिमा आहेत त्या इराणीयन शैलीच्या मानल्या जातात भगवान सूर्यदेवाची मूळ मूर्ती तेथे आढळत नाही गर्भगृहाच्या खालील तळघरात मूर्तीचे आसन दिसते तथापि तेथेही

मूर्ती नाही गर्भगृहातील पूर्वमूखी मूळ मूर्ती अशा रीतीने बसवली होती की, पूर्व दिशेहून येणारे प्रात कालचे कोवळे सूर्यकिरण मूर्तीवर पडतील अनेक नक्षीदार स्तभांमुळे सौंदर्यात भर पडलेल्या भव्य सभागृहाच्या मध्यभागी स्तभाची अष्टकोनी रचना असून त्याच्यामध्ये एकाआड एक अर्धगोल व त्रिकोणी कमानी आहेत सभागृहासमोर एक कमान असून त्याला अनेक पायऱ्या आहेत त्या उतरून मदिरासमोरील कुडाकडे जाता येते कुडाला उत्तम प्रकारची फरसबदी आहे या कुडाभोवती अनेक लहान लहान मदिरे आहेत

सुदर शिल्पकृतीने सजलेल्या या सूर्यमदिराचा विध्वस गझनीच्या महमूदाने सोमनाथ स्वारीच्या वेळी केला भग्नावस्थेत असले तरी हे सर्यमदिर गुजरातमधील शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना मानले जाते

मोढेरा येथील हे मदिर पाहून दुपारी मेहसाणाला परत आलो स्टेशनवर जेवण आटोपले अबूरोडकडे जाणाऱ्या गाडीत बसलो गुजरात भेटीतील शेवटचे स्थान मातृगयेला भेट देण्यासाठी सिद्धपूर स्टेशनवर अनेक यात्रेकरूबरोबर उतरलो

**मातृगया-सिद्धपूर**

मेहसाणा जिल्ह्यातील सिद्धपूर येथे भाविक हिंदू मातृश्राद्ध करतात मनुस्मृतीत म्हटले आहे की—

**य मातपितरौ क्लेश सहेते सभवेनृणाम् ।**
**न तस्य निष्कृति. शक्या कर्तुं वर्षशतैरपि ।।**

मनुष्याला जन्म देताना त्याचे मातापिता जो क्लेश सहन करीत असतात त्याची परतफेड शेकडो वर्षांच्या प्रयत्नानीही होऊ शकणार नाही बिहारमधील गया या ठिकाणी पित्याचे श्राद्ध करावयाचे असते ते पितृगया नावाने प्रसिद्ध आहे मातेविषयी पूज्यभाव बाळगून तिच्या ऋणाचे निरतर स्मरण हे हिंदूधर्मात परम कर्तव्य मानले गेले आहे त्यानुसार मातेचे श्राद्ध सिद्धपूर येथे करायचे असते

मातृगयेसबधी पौराणिक कथा अशी आहे – ब्रह्मदेवाचे मानसपुत्र कर्दमऋषी याचा आश्रम सरस्वती नदीच्या तीरावर होता त्यानी खडतर तपोराधना केल्यावर भगवान विष्णु प्रसन्न होऊन त्यांनी त्याना दर्शन दिले विष्णु म्हणाले, " तुझ्यापासून प्रजोत्पत्ती होऊन तिच्याद्वारे सृष्टीचा प्रवाह अखड चालू राहील अशी ब्रह्मदेवाची विधीयोजना आहे तेव्हा तू विवाहबधनात पड " त्यानुसार मनूची कन्या देवहूती व कर्दम याचा विवाह येथे सपन्न झाला दोघेही सत्त्वशील व भगवतभक्त । त्यांना पाठोपाठ नऊ कन्याच झाल्या पुत्र झालाच नाही तेव्हा कर्दम अरण्यात जाऊ लागले देवहुती व्यथित झाली तिने कर्दमाना विनती केली की– " तुम्ही अरण्यात निघून गेल्यावर व या कन्या पतीगृही गेल्यावर माझा शोक निवारण करण्यासाठी मला पुत्र व्हावा एव्हढी इच्छापूर्ती करावी " कर्दमांनी तिची व्यथा जाणून अरण्यात जाण्याचा विचार सोडून दिला यथावकाश देवहुतीला पुत्र झाला तोच कपिलमहामुनी हा विष्णूचा अवतार । अत्यत विद्वान त्याने आपल्या मातेला सांख्यशास्त्र येथेच सागितले व मुक्ती दिली हे मातृमुक्तीचे स्थान म्हणून ' मातृगया ' नावाने प्रसिद्ध झाले वैराग्ययुक्त भक्तियोगाने देवहुतीने ज्या स्थळी ब्रह्मनिर्माण प्राप्त करून घेतले ते सिद्धपद या नावाने तिन्ही लोकात प्रसिद्ध झाले असे भागवतात सागितले आहे तेच आजचे सिद्धपूर येथे मातेचे श्राद्ध करणे अतिशय पुण्यकारक असते अशी भाविक हिंदूची श्रद्धा आहे

सिद्धपूर हे प्राचीनकाळी वैभवशाली, सपन्न नगर होते येथे वहाणाऱ्या सरस्वती नदीच्या काठावर वेदकालात ऋषीमुनी यज्ञ करीत व स्तवने गात ही नदी सिद्धपूरहून पश्चिमेकडे वहात जाऊन कच्छच्या रणात लुप्त होते सध्या सिद्धपूर हे अर्धा लाख लोकसख्येचे गाव असून तीर्थस्थान स्टेशनपासून दोन कि मी अतरावर आहे टागा ठरवून स्टेशनपासून निघालो रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठ्या इमारती दिसतात टांग्याने नदीचा पूल ओलाडल्यावर प्रथम कपिलाश्रम लागतो तेथे श्राद्धविधी चालू होते तेथील उपाध्याय सागत होता की, मातेने मुलाच्या जन्मासाठी सोसलेले गरोदरपण, प्रसूतीसमयी काढलेला त्रास, त्यानतर मरेपर्यंत काढलेल्या खस्ता इ उपकाराचे स्मरण

म्हणून कृतज्ञतादर्शक १६ पिंडदानयुक्त श्राद्ध करावे लागते हा श्राद्धविधी सुमारे तासभर चालतो

कपिलाश्रमाच्या मागील बाजूला चोहोबाजूंनी बांधून काढलेल्या पायऱ्या असलेले मोठे कुंड होते हे बिंदु सरोवर। कुंडात कासवे बरीच आहेत बिंदू सरोवराच्या काठाने छोटी दालने असून तेथे कर्दमऋषी, देवहूतीला उपदेश करणारे कर्दम, कपिल महामुनी याच्या मूर्ती आहेत

सिद्धपूरला रुद्रमाळ नावाचे उध्वस्त झालेल्या प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आहेत प्राचीनकाळी हे मंदिर अकरा मजली होते सध्या त्याचे काही स्तंभ व तुळया दुसऱ्या तिसऱ्या मजल्यापर्यंत दिसतात स्तंभावरील रेखीव, सुंदर शिल्पकृती अप्रतिम आहेत त्यावरून पूर्वी हे संपूर्ण अकरा मजली मंदिर किती सौंदर्यशाली व भरपूर नक्षीकामाने सजलेले असावे याची कल्पना येते हे भव्य मंदिर सिद्धराज जयसिंह या सोळखी राजाच्या कारकीर्दीत सरस्वती नदीच्या काठी बांधले गेले या शिवमंदिराला अकरा उपमंदिरे जोडलेली असून त्यात अकरा रुद्रांची स्थापना करण्यात आली होती या मंदिराचे क्षेत्र ९२ मीटर लांब व ७० मीटर रुंद आहे या भव्य, महान वास्तूचे जे छिन्नभिन्न अवशेष आहेत ते म्हणजे एक तोरण, दोन देवळ्या, दुय्यम मठी व मुख्य मंदिराच्या पडवीचे चार खांब। पण त्याच्यावरून असा तर्क करण्यात येतो की, या मंदिराला कोरीव काम केलेले मोठमोठे स्तंभ, भव्य दालने व कमानी असल्या पाहिजेत

सिद्धपूरची अर्ध्या दिवसाची घाईगर्दीची भेट आटोपून स्टेशनवर आलो गुजरातचा प्रवास संपला होता राजस्थानमधील माऊंट अबू हे प्रवासाचे शेवटचे ठिकाण प्रवासाने शरीर थकले होते पण उत्साह कायम होता गाडी पकडून रात्री अबूरोड स्टेशनला पोहोचलो

✦ ✦



## माऊंट अबू

## संगमरवरी शिल्प – दिलवाडा

सकाळच्या रम्य वातावरणात अबूरोड स्टेशनपासून माऊंट अबूकडे जाणाऱ्या बसमध्ये प्रवेश केला प्रथम आठ किलोमीटर अंतर गेल्यावर अबू पर्वताच्या पायथ्याला पोहोचलो आणि मग घाट सुरू झाला हिरवीगार रम्य वनश्री, उंचउंच वृक्ष, एका बाजूला पर्वतांच्या रांगा, त्यावरील प्रचंड खडक तर दुसऱ्या बाजूला हिरव्यागार खोल दऱ्या ! निसर्गाचे हे अद्भुतरम्य दृश्य कधीच संपू नये असे वाटत होते वेडेवाकडे सर्पाकार रस्ते ड्रायव्हर कौशल्याने पार पाडीत होता साधारण २००० फूट उंचीचा निम्मा चढ संपल्यावर बस छीपाबेरी चौकी नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्थानकाजवळ थांबली हे स्थानक म्हणजे मोठमोठ्या वृक्षांनी वेढल्यामुळे शीतल छाया असणारे नैसर्गिक ठिकाण ! बसमधून प्रवासी उतरले आणि तिथल्या माकडांनी सर्वांना वेढले प्रवाशांच्या हातातील शेंगा, चणे घेऊन ती खाऊ लागली इतकी ती माणसाळलेली होती उल्का-उदय तर त्या मोठमोठ्या, छोट्या माकडांची मजा पहाण्यात रमून गेले तेवढ्यात एक मजेशीर दृश्य पहायला मिळाले शेंगा खाणाऱ्या एका छोट्या माकडाला थपडा मारून एका धिप्पाड माकडाने त्याच्या जवळच्या शेंगा पळवल्या थोड्या वेळाने ड्रायव्हरने बस सुरू केली प्रवासीही मग माकडांच्या संगतीतून सुटका करून घेऊन बसमध्ये बसले

पुन्हा वेडीवाकडी वळणे, घाटाचा रस्ता पार करून माऊंट अबूवर पोहोचलो तेव्हा गार वारे अंगाला झोंबू लागले अबूरोड ते माऊंट अबू हा तीस कि मी अंतराचा प्रवास हा एक अविस्मरणीय अनुभव होता

अबूचा पहाड सत्ययुगापासून अस्तित्वात आहे असे मानले जाते पुराणात अबू पर्वत अर्बुद या नावाने प्रसिद्ध आहे त्यासंबंधी पौराणिक कथाभाग असा आहे हल्ली अबूचा पहाड जेथे आहे तेथे एक मोठा खड्डा होता वसिष्ठ ऋषीची नंदिनी नावाची कामधेनू एकदा चुकून तेथे पडली तेव्हा वसिष्ठाने सरस्वती नदीची प्रार्थना केल्यावर तिने आपल्या पाण्याने तो खड्डा भरून काढला नंदिनी पाण्यावर तरंगत येऊन सुरक्षितपणे बाहेर आली तसेच हा खड्डा भरून काढावा म्हणून भगवान शंकराची वसिष्ठांनी प्रार्थना केली भगवान शंकराच्या आज्ञेनुसार हिमालयाचा पुत्र नंदिनीवर्धन पर्वत हा अर्बुद नावाच्या द्रुतगती नागराजावर बसून त्वरेने तेथे आला तो खड्ड्यात बसला व त्याने खड्डा बुजवून टाकला खड्ड्याच्या वरचे त्याचे जे टोक राहिले त्याला वसिष्ठांनी अर्बुद हे नाव दिले कारण अर्बुदाने नंदिनी-वर्धनाला त्वरित वाहून आणण्याचे अवघड काम केले होते अर्बुद पर्वत प्रथम डळमळीत होता भगवान शंकरांनी पायाच्या अंगठ्याने त्याला दाबले तेव्हा अर्बुद अढळ झाला खरा पण त्यात शंकराचा अंगठा तुटून पडला तेथे लिंग निर्माण होऊन त्यावर बारा ज्योतिर्लिंगापैकी असलेले एक अचलेश्वर महादेवाचे मंदिर सध्या अबू पर्वतावर अस्तित्वात आहे असे अबू हे नाव अर्बुदचा अपभ्रंश आहे

पद्मपुराणात ' अर्बुदाचल महात्म्य ' वर्णन करताना म्हटले आहे की–" धर्मज युधिष्ठिरा ! हिमालय पर्वताचा पुत्र अर्बुदाचल याच्यावर जा तेथील महर्षी वसिष्ठाचा आश्रम तिन्ही लोकात विख्यात आहे तेथे एक रात्र जरी निवास केला तरी हजार गाईंचे दान केल्याचे पुण्य प्राप्त होते मथुरेहून द्वारकेला जाताना भगवान श्रीकृष्ण येथून गेले होते सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारातील सीरीयन राजदूत मॅगॅस्थिनिस याने या पर्वताचा ' मृत्युदंडपर्वत ' असा उल्लेख केला आहे सुप्रसिद्ध चिनी यात्रेकरू ह्यू एन त्संग याने सातव्या शतकात या पहाडाजवळून प्रवास केला आहे परमार, चौहान, राणाकुंभ इ

राजानी अबूपर्वतावर अधिकार गाजवला होता इग्रजाच्या काळात कर्नल टॉड हा अबू पर्वतावर येणारा पहिला युरोपियन अधिकारी । त्याने आपल्या '*Travels in Western India*' या ग्रथात म्हटले आहे – " मध्यान्हीच्या सुमारास घाट चढून गेल्यावर अबू पर्वतावरील उच्च शिखर जेव्हा माझ्या दृष्टीस पडले, तेव्हा माझे मन आनदाने नाचू लागले माझ्या मुखातून हर्षाने शब्द बाहेर पडले – युरेका । " ( जे शोधत होतो ते मला सापडले । )

सुमारे चार हजार फूट उचीचा अबू पर्वत उत्तरेला हिमालय व दक्षिणेला निलगिरी या दोन्ही पर्वतानतर उच्च शिखर असलेला आहे हा पर्वत म्हणजे काही जण अरवली पर्वताची शाखा मानतात तथापि दोन्हीमध्ये पधरा मैलाचा सपाट प्रदेश आहे अबू पर्वताचा विस्तार बारा मैल लाब व तीन चार मैल रुदीचा आहे

माऊट अबू स्टँडपासून लगेच हॉटेल, लॉजेस सुरू होतात सरकारी कॉटजेस, टूरिस्ट बगला, यूथ होस्टेल, हॉलिडे होम्स, सरकारी राज्य परिवहन मडळाच्या रिटायरिंग रूम्स इ ठिकाणी उतरण्याच्या सोयी आहेत सामानाच्या दृष्टीने स्टँड समोरच्या एका लॉजमध्ये पायी चालत गेलो लॉजला सलग्न बाथरूम, सॅनिटरी ब्लॉकची सोय होती तसेच स्वतत्र डायनिंग हॉल असल्याने सोयिस्कर होते सीझन सपत आल्याने थोड्या कमी दराचा लाभ झाला सीझन सपल्यावर सरकारी विश्रामालयातही निम्मे दर असतात दुपारचे भोजन आटोपल्यावर चांगली दोन तास विश्राती घेतली नतर चहा घेऊन समोरील बसस्टँडवर आलो तेथे दुसऱ्या दिवशी सकाळी नऊला निघणाऱ्या पर्यटन खात्याच्या 'अबूदर्शन' बसची तिकीटे काढली त्यामुळे निश्चित झालो गावातील प्रेक्षणीय स्थळे पहाण्यासाठी मग निघालो

माऊट अबू गावातील रस्ते चढउताराचे आहेत । रस्त्याच्या दुतर्फा थड हवेच्या ठिकाणी असणाऱ्या दुकानाप्रमाणे विविध वस्तूची विक्री करणाऱ्या दुकानाची गर्दी होती हौशी पर्यटकाच्या खरेदीमुळे दुकाने फुलली होती अबूच्या प्रसिद्ध नखी सरोवराच्या दक्षिण दिशेला असलेला टोड रॉक पहायला निघालो त्यासाठी एका टेकाडावर पायऱ्या चढून जावे लागते अबू पर्वतावर मोठमोठ्या विचित्र आकाराचे अनेक खडक आहेत त्यातील

बेडकासारखा आकार असलेला हा प्रचंड खडक पाहण्यास अनेक पर्यटक आले होते या खडकावर दोऱ्या लावून गिर्यारोहणाचा सराव करतात अशी माहिती मिळाली या खडकाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढण्याची पर्यटकांची चढाओढ लागली होती या खडकाच्या खालच्या बाजूला एक गुफा आहे त्याला 'झरोका' म्हणतात

टोड रॉक पाहून टेकडी उतरून खाली तळाशी आलो तेथील प्रख्यात रघुनाथजी मंदिरात दर्शनाला गेलो हे मंदिर १४ व्या शतकात वैष्णव संत स्वामी रामानंद यांनी रामकुंडापुढे स्थापन केले मंदिरात गोशाला, औषधालय व पुस्तकालय आहे मंदिरातील सुंदर मूर्तीचे दर्शन घेऊन रस्ता ओलांडून नखी सरोवराच्या काठी आलो

**नखी सरोवर**

हिरव्यागार पर्वताच्या कुशीतील या सरोवरासंबंधी लोकाख्यायिका अशी आहे की– देवतांनी आपल्या नखांनी खणून हा तलाव निर्माण केला प्राचीन काळी बल्कली नावाचा असुर होता त्याने भूतलावरील धार्मिक कृत्ये बंद पाडली त्याच्या जुलूमाला कंटाळून देवदेविकांना ब्रह्मदेवाने सल्ला दिला की अबूच्या पहाडावर तपश्चर्या करावी तपश्चर्या करण्यासाठी सुरक्षितते-साठी त्यांनी आपल्या जमिनीखाली खणून एक मोठा खड्डा तयार केला तेथे हे सरोवर नंतर तयार झाले नखांनी खणले म्हणून नखी सरोवर नाव पडले आजही हिंदू लोक हे सरोवर पवित्रतीर्थ मानतात त्याला प्रदक्षिणा घालतात व त्यातील पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात

अर्धा मैल लांब व पाव मैल रुंदीच्या या नखी सरोवराभोवती चांगली सडक असून काही ठिकाणी स्नानासाठी घाट आहेत पूर्वीच्या संस्थानिकांचे राजवाडे व हिंदूंची मंदिरे भोवती आहेत सरोवराच्या चारी बाजूला पर्वताच्या गुफा आहेत त्यातील चंपागुफा, रामझरोका, हाथीगुफा प्रसिद्ध आहेत पूर्वी ऋषीमुनी तेथे ध्यानधारणा करीत किनाऱ्याच्या एका बाजूला हनुमान मंदिर आहे तर दुसऱ्या किनाऱ्यावर सुंदर व नवीन विवेकानंद वाटिका आहे नखी सरोवराच्या प्रवेशद्वारी छोटीशी गांधीवाटिका आहे

त्यानतर दिसते स्टीमरच्या आकाराचे आधुनिक हॉटेल। तेथून नौका विहारासाठी छोटयाछोटया रगीबेरगी बोटी सुटतात उल्का-उदयच्या आग्रहास्तव नौकाविहाराचा आनद लुटला छोटया बोटीतील एक गायक दर्दभरी आवाजात गाऊन करमणूक करीत होता तो स्वत च वाद्यही वाजवत होता मधुचद्राला आलेली अनेक जोडपी रसिकतेने नौकाविहार करीत होती निसर्गाच्या रम्य सहवासात मौजमजा करीत होती हे सरोवर म्हणजे प्रेमिकांचा जणू स्वर्गच।

एव्हाना सध्याकाळ होऊ लागली होती माऊट अबूचा सनसेट पॉईन्ट पहाण्यासाठी विश्रामभवनच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याने जाऊन तेथे पोहोचलो एका खोल दरीच्या काठावर प्रचड गर्दी जमली होती पर्यटकांना बसण्यासाठी सिमेटकॉक्रीटचे चागले बाक तेथे ठेवलेले आहेत या सनसेट पॉईंटवरून सूर्यास्ताच्या वेळी खोल दरीतील जगल, दूरवर पसरलेले मोकळे मैदान इ मनोहारी दृश्य दिसत होते अस्तगत होणाऱ्या सूर्यबिबाची अपूर्व शोभा कॅमेऱ्यात पकडण्यासाठी पर्यटक धडपडत होते एक गुलहौशी प्रवासी एक शेर म्हणाला—

**हुस्नवाले हुस्नका अजाम देख।**
**डुबते सूरजको ढलते शाम देख॥**

माऊट अबूला '*City of sunset*'का म्हणतात याची प्रचीती आली सनसेट पॉईन्ट पाहून झाल्यावर परतण्याची एकच गर्दी झाली काहीजण म्हणत होते हनीमून पॉईन्ट बघायचा राहिला मुलाना घेऊन हनीमून पॉईन्ट बघण्यात आम्हाला स्वारस्य राहिले नव्हते। तेव्हा लॉजवर परतलो

दुसऱ्या दिवशी अगाला झोंबणाऱ्या थडीत सकाळी सहाला उठून व सर्व आटोपून स्टँडवर साडेसातला आलो आठ वाजता टूरिस्ट बस माऊंट अबूच्या आसपासचा परिसर पर्यटकाना दाखविण्यासाठी निघाली

अर्बुदादेवी या प्रसिद्ध प्राचीन मदिराच्या दर्शनासाठी प्रथम एका उच्च पहाडाच्या पायथ्याशी पोहोचलो सकाळच्या रम्य वेळी पायऱ्या चढताना उत्साह वाटत होता हे छोटेखानी मदिर एका विशाल शिलेमध्ये गुफेसारखे


असून त्याचे प्रवेशद्वार उचीला अगदी कमी आहे आतमध्ये वाकून प्रवेश केला मंदिरात दुर्गादेवीची सुंदर मूर्ती आहे अर्बुदादेवी ही अबूची मूळ ग्रामदेवता। जसे मुंबादेवीवरून मुंबई नाव पडले तसे अर्बुदा देवीवरून अबू हे नाव पडले असे गाईड सांगत होता दर्शन घेऊन बाहेर आलो पहाडाच्या कुशीतील या मंदिरासमोरून बाहेरचे निसर्गरम्य दृश्य मन प्रसन्न करीत होते या मंदिराशेजारी महादेवाचे मंदिर आहे दर्शन घेऊन इतर प्रवाशाबरोबर पायऱ्या उतरुन बसमध्ये आलो

आठ कि मी अंतराचा वळणाकार रस्ता पार करून गुरुशिखराच्या तळाशी आलो गुरुशिखर हे माऊंट अबूचे ५६१३ फूट उंचीचे सर्वात उच्च शिखर। तळापासून थोड्या पायऱ्या चढून गेल्यावर एक छोटी गुफा लागते गुरू दत्तात्रयांनी येथे निवास केला होता तेथे गुरू दत्तात्रियांचे पदचिन्ह आहे आणखी काही पायऱ्या चढून गेल्यावर अत्युच्च गुरुशिखर लागते तेथे एक भलीमोठी प्राचीन घंटा असून त्यावर इ स १४११ चा लेख कोरलेला आहे अत्युच्च शिखरामध्येही एक छोटेखानी मंदिर आहे इतक्या उंचीवर मंदिर बांधणाराचे कौतुक करावे तेव्हढे थोडेच झुळझुळ वाहणारे शीतल वारे उल्हसित करीत होते आजूबाजूच्या पहाडांची शोभा अपूर्व दिसत होती

गुरुशिखराची भेट आटोपल्यावर बस दहा कि मी अंतरावरील अचलगढ या इतिहासप्रसिद्ध ठिकाणी पोहोचली बस फक्त तासभरच थांबेल अशी सूचना देण्यात आली त्यामुळे घाईघाईने निघालो अचलेश्वर महादेवाच्या मंदिरात प्रथम दर्शनासाठी गेलो या प्राचीन मंदिराच्या चारी बाजूला आवाराची भिंत बांधलेली आहे या मंदिरात शिवलिंग नसून केवळ एक छोटा खळगा आहे त्याला ब्रह्मखड्डा म्हणतात येथे भगवान शंकराच्या पायाचा अंगठा उमटलेला आहे असे मानतात तेथील पुजाऱ्याने दिवा पेटवून दर्शनाला आलेल्यांना हा काळ्या पाषाणातील अंगठ्याचा आकार असलेला ठसा दाखविला ज्या खळग्यात हे अंगुष्ठलिंग आहे तो पाताळात खोल दूरवर गेलेला आहे आणि त्यात कितीही पाणी ओतले तरी ते जिरून जाते असे पुजारी सांगत होता भगवान शंकराचा ठसा येथे कसा आला याबद्दल आख्यायिका पुढील प्रमाणे आहे

हिमालयाचा भाऊ नदीवर्धन याने अबूचा पहाड निर्माण केला खरा पण तो स्थिर होईना तेव्हा तो स्थिर करण्यासाठी शकराने आपला अगठा पहाडावर जोराने दाबला पहाड स्थिर झाला पण शंकराचा अगठा तुटून पडला तेथे हे मदिर उभारले गेले सध्याचे मदिर इ स ८१३ मध्ये उभारले गेले मदिराच्या प्रवेशद्वाराजवळ प्राचीन शिलालेख आहे तसेच समोर पितळेचा मोठा नदी आहे त्यावर इ स १४०८ मध्ये कोरलेला लेख आहे नदीच्या अगावर प्रहारामुळे झालेल्या खुणा दिसतात गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याने गुप्त धनाच्या आशेने नदीवर प्रहार केले होते मिळेल ती लूट घेऊन तो परत निघाला तेव्हा शकराने त्याच्या सैन्यावर मधमाशाचे थवेच्या थवे सोडले व त्यामुळे वरीचशी लूट टाकून सैन्याला पळून जावे लागले अशी आख्यायिका आहे या मदिराच्या आवारात छोटी छोटी उपमदिरे असून त्यात १०८ शिवलिंगे, देवता इ च्या मूर्ती आहेत मदिरात एक मोठा तराजू असून पूर्वी राजे-महाराजे चादी, सोने इ चे तेथे तुलादान करीत राजपूत राणा लाखा याने अर्पण केलेला मोठा लोखडी त्रिशूलही तेथे आहे

अचलेश्वर महादेवाच्या मदिराजीक ९ हजार फूट लाब व २४० फूट रुद असलेले विशाल कुड आहे ते ' मदाकिनी कुड ' या नावाने प्रसिद्ध आहे या कुडाच्या एका बाजूला तीन महिषाचे — रेड्यांचे पूर्णाकृती दगडी पुतळे एका चबुतऱ्यावर आहेत त्यासबधी कथाभाग असा आहे की मदाकिनी कुडात प्राचीन काळी पाण्याऐवजी तूप असे ते पिण्यासाठी तीन राक्षस दररोज रात्री रेड्याचे रूप घेऊन येत असत परमार राजा आदिपाल याने या तिन्ही रेड्याना एकाच बाणाने मारले या तीन महिषाची ही दगडी प्रतिकृती आहे शेजारीच आदिपाल राजाची सुरेख सगमरवरी प्रतिकृती आहे ती पाच फूट उच आहे पुतळ्याच्या चबुतऱ्यावरील शिलालेखात सवत् १३२२ ची नोद केलेली आहे तीन महिषाचे हे पुतळे दुरून पाहिल्यावर हुबेहुब तीन रेडे जणू काही एकाच रागेत उभे असावेत असे वाटते कुडाच्या दुसऱ्या बाजूला सिरोही प्रांताचा महाराणा मानसिह याची समाधी आहे त्याची व त्याच्याबरोबर सती गेलेल्या त्याच्या पाच राण्यांच्या मूर्तीही तेथे आहेत



सगमरवरी छत, लूनवसही मदिर, माऊट अबू



यशवत उर्फ चंद्रकांत उदय सौ. मेधा उल्का



टोड रॉक माऊट अबू

अचलेश्वर महादेव मंदिराजवळून एक छोटा रस्ता अचलगढला जातो गडावर जाण्यासाठी साधारण पाचशे फूट उंचीचा चढ आहे इ सनाच्या नवव्या शतकात हा गड परमार राजानी बांधला नतर मेवाडचा महाराणा कुंभ याने डागडुजी करून पधराव्या शतकात त्याचा तट बांधला या किल्ल्याच्या वाटेवर चार प्रेक्षणीय जैनमंदिरे आहेत राणा कुंभाच्या विधवा राणीने ती बांधून घेतली त्यापैकी सोळाव्या शतकात बांधलेले चौमुखजीचे मंदिर प्रेक्षणीय आहे दोन मजल्यावर भव्य चार मूर्ती आहेत मंदिरात पंचधातूच्या एकूण १४ मूर्ती आहेत सर्व मूर्तींचे वजन १४४४ मण आहे बाकीची तीन मंदिरे आदिश्वर, कुंभनाथ, शांतीनाथ यांची आहेत

गडावर राणा कुंभ व त्याचा पुत्र उधा यांचे पुतळे आहेत तसेच सावन-भादो नावाचा सयुक्त जलाशय तेथ आहे तेथे कायम पाणी असते राणा कुंभाने तेथे चुन्यात बांधून घेतलेले भव्य कोठारही आहे राणा कुंभाच्या राणीचा महाल तेथे आहे गडाच्या पूर्व टोकावर एका स्तंभाचे भग्नावशेष आहेत किल्ल्याच्या खाली एक दुमजली गुफा आहे सत्यवचनी राजा हरिश्चंद्र तेथे अज्ञातवासात असताना राहात असावा असे मानले जाते अचलगडची भेट आटोपून पायऱ्या लगबगीने उतरून तळाला पोहोचलो बस जागेवरच होती ते पाहून जीव भाड्यात पडला त्यानतर बस निघाली दिलवाड्याच्या दिशेने।

## संगमरवरी शिल्प–दिलवाडा

दिलवाडा हे छोटेखानी खेडे अबू–अचलगड रस्त्यावर अबूपासून तीन कि मी अंतरावर आहे दिलवाडा या गावाचे मूळ नाव देलवाडा–म्हणजे देवळाचे गाव। दिलवाडा गावाच्या एका टोकाला छोट्याशा उंच जागेवर विमलवसही व लूणवसही ही दोन जगप्रसिद्ध जैनमंदिरे आहेत वसही म्हणजे वस्ती जैन तीर्थंकराचे वसतीस्थान म्हणून त्याच्या मंदिराना वसही, वसिही बस्ती अशी नावे पडली

## विमलवसही मंदिर

प्रथम विमलवसही या जैनमंदिरात प्रवेश केला गुजरातमधील अनहिलपट्टण येथे राज्य करणाऱ्या राणा भीमदेव ( पहिला ) याचा सेनापती

विमलसाह् याने हे मदिर इ स १०२० च्या सुमारास बाधले सेनापतीपद भूषवीत असताना आपल्या कारकीर्दीत जी हिंसा झाली त्यामुळे शेवटी उपरती होऊन विमलसाह् याने देवीची उपासना केली अबाजीदेवी प्रसन्न झाली व वर माग म्हणाली त्यावेळी विमलसाह्ने प्रार्थना केली की, माझ्या दोन इच्छांची पूर्तता व्हावी एकतर मी नि सतान आहे मला पुत्र व्हावा आणि दुसरे म्हणजे माझ्या हातून अबू पर्वतावर जैनमदिराची स्थापना व्हावी म्हणजे मी पापातून मुक्त होईन त्यावर देवी अबाजी म्हणाली की, तुला दोन वर द्यावे इतका काही तुझा पुण्याचा साठा नाही तेव्हा एकच वर माग विमलसाह्ला मोठा प्रश्न पडला पण त्याची पत्नी मोठ्या दूरदृष्टीची होती तिने सांगितले की पुत्रामुळे चिरतन कीर्ती मिळेलच असे म्हणता येणार नाही समजा तो वाईट निघाला तर वडिलाना दु खात टाकतो कीर्तीला कलक लावतो तेव्हा मदिर बाधण्याचा वरच इष्ट। त्यावर देवीने अनुमती दर्शविली त्यानुसार दिलवाडा गावातील देवीने साक्षात्कार देताना सांगितलेल्या जागेवर विमल-साह् गेला पण ती जागा हिंदूच्या पवित्र तीर्थाची आहे म्हणून ब्राह्मणानी द्यावयाचे नाकारले विमलसाह्ने परत आराधना केल्यावर देवीने स्वप्नात येऊन सांगितले की, चपकवृक्षाच्या खाली केशराचे स्वस्तिकचिन्ह काढलेले दिसेल तिथे खणून पहा तेथे जाऊन विमलसाह्ने गावातील ब्राह्मणांच्या देखत खणून पाहिले तेव्हा २० वा जैन तीर्थंकर मुनी सुव्रत यांची मूर्ती निघाली तरीपण ब्राह्मण पुजारी जागा द्यायला तयार होईनात ते म्हणाले, प्राचीन काळी कदाचित जैनाची वस्ती असेल पण सध्या ही जागा आमच्या मालकीची आहे शेवटी विमलसाह्ने मदिरासाठी जागा विकत मागितली त्या जागेवर सोन्याच्या मोहरा पसरून एकदर जितक्या मोहरा होतील तितकी जमिनीची किमत म्हणून ब्राह्मणाना दिली ती किमत भरली ५६ लाख रुपये। ती देऊन व जमीन विकत घेऊन त्यावर हे सुदर मदिर उभारले

विमलवसही मदिरात प्रवेश केल्यावर प्रथम दृष्टीस पडते हत्तीशाला। त्यात प्रथम विमलसाह्ची अश्वारूढ मूर्ती दिसते त्याचे मुख मंदिरातील आदिनाथाच्या मुख्य मूर्तीबरोबर सरळ रेषेत आहे विमलसाह्ने डाव्या हातात लगाम धरलेला आहे तर उजव्या हातात पूजेच्या साहित्याचे तबक

आहे त्याच्या मागे हत्तीचे दहा प्रमाणबद्ध संगमरवरी पुतळे तीन रांगात दिसतात मंदिर उभारणीसाठी दहा हत्तीवरून संगमरवरी दगड वाहून आणले त्या हत्तीचे हे स्मारक आहे. ही हत्तीशाला विमलशाह याचा भाऊ नेढा यांचा पणतु पृथ्वीपाल याने बांधली आहे हत्तीवर त्याने पूर्वजांच्या मूर्ती बसवल्या होत्या विमलशाह अश्वारूढ असल्याने तो मात्र त्यात नव्हता अल्लाउद्दीन खिलजीने इ स १३११ मध्ये मंदिरावर हल्ले चढवले बहुतेक सर्व हत्तीवरील मूर्ती उद्ध्वस्त केल्या काही माहुतांच्याही मूर्ती तोडल्या हत्तीच्या सोंडा तोडल्या

विमलवसही मंदिर पुर्वाभिमुख आहे हत्तीशालेसमोर द्वारमंडप आहे त्यातून आत गेले की चारी बाजूना भिंतीला लागून जैन तीर्थंकराची ५२ उपमंदिरे आहेत प्रथमदर्शनी मंदिराच्या सभामंडपाचे मोहक दर्शन होते ह्या सभामंडपाचे छत ४८ संगमरवरी स्तंभावर आधारित आहे त्यावर सुंदर घुमट आहे या मंडपाच्या घुमटाच्या आतील छताचा भाग अप्रतिम कला-कुसरीने सजलेला आहे या संबध संगमरवरी छतात एक इंच असा आढळणार नाही की जेथे शिल्पकाम नाही वर्तुळात वर्तुळे अशी प्रमाणबद्ध अकरा वर्तुळे कोरली असून त्यावर घोडेस्वार, एकमेकात सोंडा गुंतवलेले हत्ती, नर्तक, पशुपक्षी, देवदेवता हंस, पाने, फुले इ शिल्पकृती सौंदर्यशाली आहेत या नक्षीदार छताला आधार देण्यासाठी तीस फूट उंचीचे, सुरेख कोरीव कामाने सजलेले आठ स्तंभ अष्टकोनात उभे आहेत त्याला प्रत्येकी दोन असे १६ ब्रॅकेट्स आहेत त्यावर १६ कलेच्या व १६ विद्यादेवीच्या मूर्ती आहेत एके ठिकाणी हातात आम्रफल असलेली, सिंहावर अधिष्ठित अंबादेवी कोरली आहे तसेच महाभारताच्या युद्धाचा देखावाही कोरला आहे मंदिराच्या गाभाऱ्यात पहिला तीर्थंकर आदिनाथ भगवान याची आसनस्थ मूर्ती आहे भगवानाच्या डोळ्याला रत्ने बसविलेली आहेत ती चमकतात भगवानाची मूर्ती सुवर्णमिश्रीत पितळेची असून सव्वाचार फूट उंचीची आहे

या मंदिराभोवती व्हरांड्यात ५२ लहान उपमंदिरे आहेत त्यात तीर्थंकराच्या मूर्ती आहेत तेथील वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक मंदिरासमोर बरोबर सरळरेषेत दुसरे मंदिर आहे प्रत्येक मंदिराच्या व्हरांड्यात दोन भाग

असलेले छत असून प्रत्येकावरील नक्षीकाम वेगळे आहे एके ठिकाणी पहिले तीर्थंकर आदिनाथ याचे दोन पुत्र भरत व बाहुबली याच्यामधील द्वंद्वयुद्ध आणि त्यातून बाहुबलीला आलेले वैराग्य हे प्रसग कोरले आहेत त्यांची कथा अशी आहे हजारो वर्षांपूर्वीची गोष्ट। अखड राजवैभव उपभोगल्यावर आदिनाथ प्रभूने ससारविरक्तीचा मार्ग स्वीकारला आपल्या राज्याचा अयोध्येकडील भाग त्यांनी भरताकडे सोपवला तर दक्षिणेकडील बाहुबलीवर। त्यानतर ते कैलास पर्वतावर निघून गेले भरत आणि बाहुबली हे दोघे सख्खे भाऊ पण स्वभावाने अगदी भिन्न। भरत खूप महत्त्वाकांक्षी होता तर बाहुबली विलासी। भरताने दिग्विजय मिळवण्यासाठी अनेक खडात अफाट सेना पाठविली ठिकठिकाणच्या राजांना त्याने वश केले बाहुबलीचे राज्य मात्र भरताच्या साम्राज्याखाली आले नाही भरताने आपला मित्र बाहुबलीच्या दरबारात शिष्टाईसाठी पाठवला त्याने बाहुबलीला ज्येष्ठ बधू भरताच्या दरबारात हजर होण्याबाबत खूप आग्रह केला पण बाहुबली म्हणाला की मी शरण जाणार नाही भरताने गोरगरीबावर अत्याचार करून विजय मिळवला आहे समझोत्याचे प्रयत्न विफल झाले व युद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला युद्धात मनुष्यहानी होईल म्हणून द्वंद्वयुद्ध करण्याचा निर्णय दोघानी घेतला द्वंद्वयुद्धात बाहुबली विजयी झाला पण ज्या राज्यवैभवासाठी प्रत्यक्ष भाऊही वैरी झाला ते त्याला क्षुद्र वाटू लागले विजय मिळवूनही तो सर्व ससाराचा त्याग करून तपोवनात तपश्चर्या करायला निघून गेला घनदाट जगलात एक वर्षभर त्याने तप केले त्याच्याभोवती वाढलेल्या लतावेलीनी त्याला लपेटले, भोवती सापाची वर्तुळे तयार झाली वर्ष सपले इकडे भरतालाही पश्चात्ताप झाला व तो बाहुबलीजवळ गेला झालेल्या प्रमादाची क्षमा मागू लागला त्याने राज्याकडे परतावे म्हणून विनवू लागला पण ते शक्य नव्हते तपश्चर्येनतर बाहुबलीला आत्मसिद्धी प्राप्त होऊन केवल ज्ञान प्राप्त झाले ही कथा पाषाणात साकार केली आहे।

दहाव्या मदिरासमोर २२ वा तीर्थंकर नेमीनाथ यांच्या जीवनातील प्रसग कोरला आहे जैन पुराणानुसार अरिष्टनेमी हा वसुदेवपुत्र कृष्णाचा

चुलतभाऊ। कृष्ण द्वारकाधिपती झाल्यावर अरिष्टनेमी त्याच्याकडे गेला असता कृष्णाच्या शस्त्रागारातील शंख, चक्र इ आयुधे त्याने सहज लीलेने वापरून पाहिली कृष्णाला त्याचे आश्चर्य वाटले त्या दोघामध्ये सामर्थ्याबद्दल स्पर्धा ठरली त्यात अरिष्टनेमी हा विजयी झाला त्याचा पुढे मथुरेचा राजा उग्रसेन याची कन्या राजमती ऊर्फ राजुलदेवी हिच्याबरोबर विवाह ठरला लग्नमडपाकडे जात असताना लग्नाच्या मेजवानीच्या वेळी ताजे मास मिळावे म्हणून पुष्कळशी जनावरे त्याला बाधून ठेवलेली दिसली आपल्या विवाहासाठी एव्हढी प्रचड हिंसा होणार हे पाहून अरिष्टनेमीला उपरती झाली ससाराच्या पाशात पडण्यापूर्वीच, लग्नमडपातून निघून तो तत्काळ गिरनार पर्वतावर निघून गेला आपले केस उपटून त्याने साधुत्वाची दीक्षा घेतली हाच जैनाचा २२ वा तीर्थंकर नेमीनाथ होय। भगवान नेमीनाथच्या आयुष्याला कलाटणी देणारा हा प्रसग केवळ छिन्नी व हातोडा याच्या सहाय्याने अबूच्या थोर कारागिरांनी साकार केला आहे नेमिनाथचा विवाहमडप, मुकी जनावरे, निर्माण झालेले वैराग्य, उपटलेले केस हे सर्व प्रसग शिल्पकृतीतून आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात

पुढे एका ठिकाणी छतावर काही भाग अपुरा सोडलेला दिसतो त्यासबधी तेथील पुजाऱ्याने सांगितले की, जर कोणाला मदिराच्या शिल्पकृतीत भर टाकायची असेल तर त्याच्या कलेला वाव देण्यासाठी रिकामी जागा ठेवली आहे त्यानतर आहेत एकाच सगमवरामध्ये कोरलेल्या राधाकृष्ण लक्ष्मी यांच्या नव्या मूर्ती। अहमदाबादचे एक व्यापारी श्री आनदजी यानी १४ लाख रु खर्च करून या मूर्ती कारागिराकडून कोरून घेतल्या त्यासाठी हे कारागीर बारा वर्षे खपत होते हेही कोरीव काम इतके नाजूक आहे की मूर्तीच्या हाताची नखे, रेषा इ दिसतात मदिराच्या मागील डाव्या कोपऱ्यातील व्हराड्यात भूगर्भातून निघालेली भगवान तीर्थंकराची हजार वर्षांपूर्वीची मूळ मूर्ती अधिष्ठित आहे बाजूला देवी अबाजीची मूर्ती आहे विमलसाहने तीन दिवस उपवास करून अबादेवीची आराधना केली होती त्यामुळे पडलेल्या स्वप्नानुसार येथे चपकवृक्षाखाली खणल्यावर ही मूर्ती मिळाली व त्याची स्थापना येथे केली.

पुढे २९ नवरच्या उपमदिरासमोरील छतावर श्रीकृष्णाच्या जीवनातील कालियामर्दन कथा शिल्पकारानी साकार केली आहे क्रमाक ३५ समोर वाघावर अधिष्ठित १६ भुजाची अबिका देवी कोरली आहे क्रमाक ३८ समोर श्रीकृष्णाची रासक्रीडा, क्रमाक ३९ समोर कमलपुष्प व चार दिशाना चार देवता, क्रमाक ४० समोर नवदुर्गा, क्रमांक ४३ समोर शीतलादेवी, क्रमाक ४४ समोर वीणाधारी सरस्वती, इ मूर्ती कोरल्या आहेत क्रमाक ४५ समोर पद्मावती नागकन्या कोरली असून तिच्या हातात नाग, मस्तकावर नाग व बाजूला चामरे ढाळणाऱ्या स्त्रिया कोरल्या आहेत क्रमाक ४६ समोर हिरण्यकश्यपूला माडीवर घेऊन त्याचा वध करणाऱ्या नृसिंह अवताराचे दृश्य कोरले आहे

असे हे अबूचे जगप्रसिद्ध विमलवसही मदिर। इ स १०३२ मध्ये पूर्ण सगमरवरातले हे मदिर बाधण्यात आले त्यासाठी १८ कोटी ५३ लाख रुपये खर्च आला बाजूची ५२ उपमदिरे धरून सपूर्ण मदिराची पूर्व-पश्चिम लाबी १४० फूट व दक्षिणोत्तर लाबी १९० फूट आहे मुख्य मदिर ९८ फूट लाब व ४२ फूट रुद आहे या मदिरासबधी असे सागतात की मूर्ती घडवताना जितका सगमरवराचा चुरा निघे तितक्या वजनाचे सोने कारागिरांना बिदागीदाखल दिले जाई जेव्हढे मोठे सगमरवराचे तुकडे निघत तेवढ्या वजनाची चादी त्याना दिली जाई तीस मैलांवरील खाणीतून एवढ्या उच पहाडावर सगमरवर दहा हत्तीवरून वाहून आणला १२०० कारागिरानी १४ वर्षे खपून हे सगमरवरी स्वप्न साकार केले हे मदिर बाधणारे प्रमुख शिल्पकार होते लोयन आणि केला। त्याच्या आकृती अष्टकोनी मंडपात सरस्वतीदेवीचा बाजुला कोरल्या आहेत मुस्लीमांनी आक्रमण करून मदिराचा बराच विध्वस केल्यावर इ स १३२७ मध्ये लल आणि बिझार या दोन श्रीमतांनी मदिराचा जीर्णोधार केला व मदिराला मूळ स्वरूप प्राप्त करून दिले

## लूणवसही मंदिर

विमलवसही मदिरानंतर आलो लूणवसही मदिरात। गुजरातचा राजा वीरधवल याचे मत्री वस्तुपाल व तेजपाल हे दोघे भाऊ होते त्यानी

हे मदिर इ स १२३५ मध्ये पूर्ण केले त्याच्या मोठ्या भावाचे नाव लूणिग । विमलवसही मदिर पाहिल्यावर त्याने इच्छा प्रदर्शित केली की या मदिरात निदान एकातरी मूर्तीची उभारणी आपल्या हाताने व्हावी पुढे तो आजारी पडला मृत्युशय्येवर असताना त्याचा धाकटा भाऊ तेजपाल याने त्याची शेवटची इच्छा काय आहे असे विचारले आपण ती पूर्ण करू असे आश्वासनही दिले पण त्यावेळी त्यांची घरची अत्यतिक गरीबी असल्याने लूणिग काही केल्या बोलेना शेवटी वस्तुपालने खूपच आग्रह केल्यावर त्याने शेवटची इच्छा सांगितली की विमलवसहीमध्ये तीर्थंकराची एखादी मूर्ती आपण उभी करावी पुढे वस्तुपाल व तेजपाल हे दोघे मत्री झाले त्यांना ऐश्वर्य प्राप्त झाले तेव्हा त्यानी हे स्वतत्र मदिर बाधून बावीसावे जैन तीर्थंकर नेमीनाथ यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली अशा प्रकारे भावाची इच्छा पूर्ण करून त्याच्या स्मृतीदाखल या मदिरास 'लूणिगवसही हे नाव दिले लूणवसही हे या मदिराचे आजचे प्रचलित नाव ।

या मदिरात प्रवेश केल्यावर मुख्य मडपाच्या घुमटाच्या छतावरील शिल्पकाम बघून स्तिमित झालो हे शिल्पकार छिन्नी व हातोडा घेऊन पत्थर घडवणारे केवळ कारागीरच नव्हते तर कल्पनाविलासात रममाण होणारे रसिक कलावत, निसर्गसृष्टीचे अभ्यासक, श्रेष्ठ दर्जाचे चित्रकार व कवीही असावेत असा विचार मनात आला सगमरवरी पत्थरातून नाजूकपणे कौशल्याने, जिवत कलाकृती निर्माण केल्या या थोर कारागीराना विषयाची कमतरताच नाही पाने, फुले, वेली याचे भरगच्च नक्षीकाम तर ठायीठायी दिसते तसेच हत्ती, उट, सिंह, हस, मत्स्य इ च्या मालिका, लढाया, नौकापर्यटन, लग्नाची मिरवणूक इ सामाजिक दृश्येही दिसतात जैन पुराणातील तीर्थंकराच्या आयुष्यातील प्रसग तसेच हिंदू पुराणातील अनेक प्रसग त्यानी हृदयगमरीतीने, सूचकतेने, कुशलतेने, शैलीदाररीत्या साकार केले आहेत हे मदिर म्हणजे सगमरवराची नाजूक मजुषाच ।

तज्ज्ञाच्या मते विमलवसहीपेक्षा या लूणवसही मदिराच्या छताचे काम सरस, अप्रतिम झाले आहे दोन स्तभाच्या मधील नाजूक नक्षीदार तोरण

सौंदर्यशाली आहे तसेच स्तभाच्या वरच्या टोकाला ब्रॅकेट्सच्या आधाराने बसवलेल्या मूर्ती आकर्षक आहेत मुख्य छतावर एक वर्तुळ आखून त्यात गोलाकार वलयांकित अनेक विभाग पाडले आहेत प्रत्येक विभागात कोरीवकाम केले आहे एका विभागात वसत आगमनाचे दृश्य रेखाटले आहे वसत आगमनाचा आनद प्रत्येक व्यक्तीच्या मुखावर ओसडून वहाताना दिसतो. इतकी ही शिल्पकृती सजीव आहे इतर विभागात फुले, फळे, पक्षी यांची गर्दी आहे तर इतरत्र दिसतात शूर योद्धे, देखणे यक्ष आणि अप्सरा ! त्या तर या शिल्पकृतीचे जणू प्राण ! छतावर आणखी दिसतात जोगीणीच्या मूर्ती ! मुख्य छताखाली आठ पाकळ्याचे बारीक नक्षीकामाचे नाजूक झुबर नितातसुदर आहे त्याचे वर्णन करायला खरोखर शब्द अपुरे पडतात आतरराष्ट्रीय कीर्तीचा शिल्पतज्ञ फर्ग्युसन याने तर म्हटले आहे की, " *Pendent of dome hangs from the centre more like a luster of crystal drops than a solid mass of marble* " झुबराच्या बाजूला चार लक्ष्मीमूर्ती आहेत एके ठिकाणी उमलते सूर्यफूल कोरले असून बाजूनी २४ तीर्थंकर कोरले आहेत कृष्णजन्म व कृष्णाच्या बाललीलाही नाजूकपणे कोरल्या आहेत लूणवसही मदिरातील छत म्हणजे स्थापत्य-कलेचा परमोच्च नमुना आहे

मदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळ दोन बाजूला दोन कोनाडे आहेत तेथे उभारलेल्या उपमदिरासबधी मजेशीर हकीकत तेथील पुजाऱ्याने सांगितली मुख्य मदिर बांधल्यावर दोन्ही भावाचे नाव अमर होईल या भावनेने त्या दोघाच्या पत्नींना—जावांना हुरहूर वाटली मदिर उभारणीत आपलेही नाव व्हावे ही त्याची इच्छा ! त्यानी मदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळ दोन बाजूला कोनाड्यात दोन छोटी उपमदिरे उभारण्यास सुरुवात केली दोघींच्या भांडणात ती नऊवेळा मोडली व उभारली शेवटी समझोता होऊन दोघींनी दोन कोनाड्यात ही मदिरे उभारली. ती देराणी व जेठाणी गोख या नावाने ओळखली जातात सर्वसाधारण पाहिले तर ही मदिरे एकसारखीच दिसतात मोठ्या देराणीचा मान मोठा म्हणून

त्यातील तिची मूर्ती सरळ कोरली आहे तर धाकट्या जेठाणीच्या मंदिरामधील तिच्या मूर्तीचा चेहरा थोडा तिरपा, कललेला दाखवला आहे देराणी-जेठाणीचा हा अजब किस्सा मानवी स्वभावाचा एक वेगळा नमुनाच शिल्पकार पण तितकेच कलंदर ! एक मूर्ती तिरपी कोरून त्यांनी मोठ्या जावेचा मान, श्रेष्ठत्व राखले या छोट्याशा कोनाड्यांना महिरपी स्तंभ असून १६ वे तीर्थंकर शांतीनाथ यांची सुबक मूर्ती आत बसवली आहे या दोन कोनाड्यातील मंदिर उभारणीसाठी सव्वा लाख रुपये खर्च झाले देराणी व जेठाणी या दोन जावांनी पतीचा पैसा न वापरता माहेराहून पैसे आणले लूणवसही मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात २२ वे जैन तीर्थंकर नेमीनाथ यांची ३ फूट उंचीची सुंदर मूर्ती आहे या मंदिराभोवती ४८ छोटी छोटी उपमंदिरे असून प्रत्येकासमोरील छतावर अप्रतिम शिल्पकृती कोरल्या आहेत अकराव्या मंदिरासमोर भगवान नेमीनाथ यांच्या लग्नाचा मंडप कोरला आहे नेमीनाथांचे लग्न जिच्याबरोबर ठरले ती वाग्दत्त वधू राजमती दार उघडून वरातीत मिरवणूकीने येणारा—नियोजित वर नेमीनाथ यांच्याकडे पहात आहे हे दृश्य पाषाणात हृदयंगमरीत्या कोरले आहे राजमतीच्या चेहऱ्यावरचा लज्जायुक्त अविर्भाव पाहून त्या थोर कारागिरापुढे आपण नतमस्तक होतो विवाहाच्या मेजवानीच्या प्रसंगी पशुंची हत्या होईल म्हणून विरक्त होऊन नेमीनाथ गिरनारवर निघून जातात आणि लग्नाची वरातही परत निघून जाते हे सगळ पाषाणात साकार केल आहे

चौदाव्या मंदिरासमोर नेमीनाथाची धर्मपत्नी राजमती हिची गुंफा दाखविली आहे नेमीनाथांनी तिचा त्याग केला तरी तिने मात्र त्यांना शेवटपर्यंत साथ दिली तिनेही दीक्षा घेतली व मोक्षप्राप्तीसाठी आराधना केली सोळाव्या मंदिरासमोर पार्श्वनाथ भगवान यांची केवल ज्ञान प्राप्त झाल्यानंतरची, मस्तकावर शेषनाग असलेली मूर्ती कोरली आहे ३३ व्या मंदिरासमोर वीणाधारी सरस्वती व तिच्या बाजूला बासरी धरलेली दासी कोरली आहे तिची कर्णफुले सुंदर दिसतात ३६ व्या मंदिरासमोर मानससरोवर कुंडाचे दृश्य कोरले आहे

या मंदिरातील हस्तीशाला विमलवसही मंदिराप्रमाणे समोर नसून मंदिराच्या मागील भिंतीमध्ये बांधली आहे त्यात दहा विभाग असून तेथे प्रत्येकात एक याप्रमाणे हत्तींच्या दहा संगमरवरी मूर्ती आहेत या हत्तींचा डौलदार आकार, त्यांच्या अंगावर कोरलेले अलंकार, नक्षीदार तोरण व जाळी हे सर्व अप्रतिम आहे पुढे माहूत व श्रावक तर मागे छत्रीधारी आहेत हत्तीचे पॉलिश घोटीव व गुळगुळीत आहे त्याच्यामागे चौकटीचे दहा कोनाडे असून वस्तुपाल व तेजपाल यांच्या कुळातील पूर्वज, त्यांचे बंधू, त्यांच्या पत्नी, मुले यांच्या मूर्ती कोरल्या आहेत वस्तुपाल व त्याच्या दोन पत्नी ललतादेवी व बेडालदेवी यांच्या मूर्ती ७ व्या विभागात आहेत तर तेजपाल व त्याची पत्नी अनुपमादेवी यांच्या मूर्ती ८ व्या विभागात आहेत

विमलवसहीनंतर दोन शतकांनी बांधलेले हे लूणवसही मंदिर केवळ सात वर्षांच्या अल्पावधीत बांधून पूर्ण झाले त्याचे श्रेय शोभनदेव या प्रमुख शिल्पकाराला होय याही मंदिरावर अल्लाउद्दीन खिलजीने इ स १३११ मध्ये आक्रमण केले त्याने नेमीनाथाची मूळ मूर्ती, गाभारा, मंडप यांची नासधूस केली दहा वर्षांनंतर पेथड नावाच्या श्रीमंत व्यापाऱ्याने खर्च करून मंदिराचा जीर्णोद्धार केला

विमलवसही व लूणवसही ही दोन प्रसिद्ध मंदिरे पाहिल्यानंतर पित्तलहर मंदिर पहाण्यासाठी मंदिरात प्रवेश केला मेवाडचा महाराणा प्रताप यांचे दिवाण भीमशाह यांनी चौदाव्या शतकात ही दोन मंदिरे निर्माण करायला सुरुवात केली पण राणा प्रतापचा पराभव झाल्याने दुसरे अपुरे राहिले पित्तलहर मंदिरात जैन तीर्थंकर ऋषभदेव यांची सोने, चांदी, तांबे, कांसे व पितळ या पंचधातूंची १०८ मणांची मूर्ती आहे बाजूला दोन संगमरवरी मूर्ती आहेत

बाहेर पडताना शेवटचे चौमुख मंदिर पाहिले दिलवाड्याच्या शिल्पकारांना मोठे मंदिर बांधताना दररोज दोन तास विश्रांती मिळायची त्यातील फक्त एक तास विश्रांती घेऊन राहिलेल्या एक तासाच्या वेळेत मूळ

मदिराच्या बाधकामात राहिलेल्या सगमरवराचा वापर करून हे मदित उभारले गेले धन्य ते शिल्पकार की ज्यानी निरपेक्ष वुद्धीने आपल्या श्रमातून हे मदिर उभारले या मदिरात पार्श्वनाथाच्या चार दिशेला चार मूर्ती आहेत तसेच मडपात स्त्रियाच्या नाजूक, सुदर शिल्पकृती आहेत

ही चारही मदिरे एका आवारात आहेत मदिराचा बाह्य भाग अतिशय सामान्य आहे तो पाहून त्याच्या आत इतके अप्रतिम शिल्पकाम असेल याची कल्पना येत नाही


दिलवाडा गावाजवळ रस्त्याला लागून दक्षिणेला रसिया वालम नावाचे मदिर आहे त्यात तीन मूर्ती आहेत त्यापैकी एक आहे वाल्मिकी ऋषीची दुसरी एका राजमातेची व तिसरी तिच्या राजकन्येची ' या राजकन्येची मदिराशी निगडीत, अबूच्या पहाडावर घडलेली एक पौराणिक प्रेमकथा आहे वाल्मीकी नावाचा एक तरुण तपस्वी या पहाडावर रहात होता तेथील राजकन्या त्याच्यावर लुब्ध झाली आपली कन्या एका तपस्व्याबरोबर प्रेमविवाह करणार या कल्पनेने राजमातेचा जळफळाट झाला तिने एक अट घातली की एका रात्रीत जर वाल्मिकीने अबू पहाडाच्या शिखरापासून पायथ्यापर्यंत चागला रस्ता बाधला तर मी आपल्या कन्येच्या विवाहाला मान्यता देईन कारण तिला खात्री होती की ही गोष्ट अशक्य कोटीतील आहे

वाल्मिकी हा महान तपस्वी व सिद्धी प्राप्त झालेला पुरुष होता त्याने सूर्योदयापूर्वी सामर्थ्याने रस्ता पूर्ण करीत आणला खरा पण त्या राजमातेने स्वत च कुक्कुटरव केला वाल्मिकीला वाटले सूर्योदयाची वेळ झाली रस्ता अपूर्ण राहिला याची खत वाटून तो निराश झाला नतर जेव्हा त्याला या कूटनीतीचा पत्ता लागला व आपण फसवले गेलो असे कळले तेव्हा त्याने राणी आणि राजकन्या दोघींना भस्मीभूत केले व स्वत विष प्राशन करून देहत्याग केला मदिरात वाल्मिकीची हातात विषाचा पेला असलेली मूर्ती आहे त्याच्या शेजारी राजकन्येची पाषाणमूर्ती आहे

हेतू हा की देहत्यागानंतर का होईना एकमेकांना चिरंतन सहवास मिळावा राणीची मूर्ती तोडून विद्रुप केलेली दिसते मंदिर पाहिल्यावर एका हळूवार प्रेमभावनेचा झालेला विफल शेवट आठवून मन हळहळते

दिलवाड्याची भेट आटोपली होती दोन प्रहर टळले तरी भान उरले नव्हते संगमरवरी शिल्प पहाताना देहभान विसरले होते बस तर एक वाजताच परत गेली असावी चारचा सुमार झाला होता टॅक्सी करून अबूला तृप्तीने परतलो फराळ केला बाजारात चक्कर मारून खरेदी केली जेवण आटोपून मुक्कामी परत आलो सामानाची बांधाबांध केली थंडी चांगलीच झोंबत होती दमल्याने रात्री लवकर निद्राधीन झालो

✦ ✦



## परतीचा प्रवास

अबू अहमदाबाद व्हाया अबाजी बसने माउट अबूचा सकाळी सानला निरोप घेतला आदल्या दिवशी रिझर्वेशन केल्याने जागा मिळाली होती तरीपण सप्त आलेल्या सीझनमुळे गाडीत तोबा गर्दी होती अबूपासून अहमदाबादला जाण्यासाठी बसेस पालनपूर आणि अबाजी या दोन मार्गाने धावतात अनायासे अबाजीमातेचे दर्शन होण्याचा लाभ होणार होता अबूची भेट अबाजीच्या दर्शनाखेरीज पूर्ण होणार नव्हती अबू स्टेशनपासून पुढे २२ कि मी अतरावर अबाजी स्थान आहे

बसने अबू स्टँड सोडला व घाटाचा नागमोडी रस्ता पार करून बस उतरणीला लागली पाऊण तासात अबू स्टेशन पार करून बस पुढे निघाली राजस्थान गुजरातच्या सीमा रेषेवर चेकींग झाले व नऊच्या सुमाराला बस अबाजीला पोहोचली कडक्टर म्हणाला बस अर्धातास थाबेल ज्याना अबाजीचे दर्शन घ्यायचे असेल त्यानी अर्ध्या तासाच्या आत यावे स्टँडवर देवीचे दर्शन करून आणणारी मुले हजर होती एकाला घेऊन अक्षरश धावत मदिराकडे गेलो कारण बस निघून जायची धास्ती वाटत होती


अबाजीमातेचे मदिर आटोपशीर व चौरस आकाराचे आहे बाहेरून तटबदी आहे सगमरवराने बाधलेले मदिर शोभिवत आहे देवीच्यासमोर पितळेच्या पत्र्याने मढविलेले दोन सिंह उभे आहेत देवीची काळ्या पाषाणाची, वस्त्रालकारानी झाकलेली प्रसन्न मुद्रेची मूर्ती आहे हे मदिर फार पुरातन आहे सातव्या शतकापासून त्याची प्रसिद्धी आहे शाक्त-पथीयाचे हे पवित्र क्षेत्र आहे दिलवाड्याचे प्रसिद्ध विमलवसही मदिर बाधणाऱ्या विमलसाहची अबाजी ही उपास्य देवता होती तिच्या प्रेरणेने त्याने अबूचे प्रख्यात मदिर बाधले दर पौर्णिमेला येथे मोठी यात्रा भरते अबामातेचे दर्शन घेऊन लगबगीने स्टँडवर परतलो उदयला बस निघून जाण्याची फार भीती वाटायची त्यानेच आमची वोटे धरून स्टँडकडे पळवले

अबाजीच्या दर्शनाने गुजरातची सफर सपली होती आता वेध लागले होते परतीच्या प्रवासाचे ! बस अहमदाबादच्या दिशेने धावू लागली ऊन वाढत होते तसतसे बसमध्ये गरम वारे येऊ लागले दुपारी एकच्या सुमाराला अहमदाबादच्या गिरण्याची उच उच धुरकाडे दिसू लागली होती. विनतीवरून कडक्टरने अहमदाबाद स्टेशनजवळ बस थांबवली लगबगीने सामान उतरून स्टेशनच्या क्लोकरूममध्ये ठेवले मुबईला परतायला गाडी रात्री नऊला होती रिक्षा करून प्रथम जेवण करण्यासाठी रीलीफ रोडवरील हॉटेल चेतनामध्ये आलो कारण अहमदाबादला असताना तेथील चविष्ट जेवणाचा आस्वाद घेतला होता जेवणासाठी नबर लागावा म्हणून वाट पाहाणाराची राग रस्त्यापर्यंत आली होती या हॉटेलची प्रसिद्धी चविष्ट जेवणासाठी, स्वच्छतेसाठी खूप आहे ३ मजल्यावर तीन मोठे डायनिंग हॉल आहेत तेथे रोज सकाळी–सध्याकाळी मिळून सुमारे ३००० लोक जेवतात अशी माहिती मिळाली कढी, पुरी, खमण ढोकळा, दूधपाक, तीन चार भाज्या इ बेत छान जमला होता जेवणानतर कोचवर तेथेच तासभर विश्राती घेतली चारच्या सुमारास वेळ असल्याने अहमदाबादच्या बाजारात खरेदीसाठी चक्कर मारली मनासारखी साडी पट्कन मिळाल्याने ह्या दुकानातून त्या दुकानात हिंडण्याचे टळले व ह्याच्या खेकसण्याचा धोकाही टळला रिक्षा करून पाचच्या सुमारास स्टेशनवर परतलो

रात्री नऊला निघणारी गाडी प्लॅटफॉर्मवर रात्री आठला लागणार होती आयत्या वेळी रिझर्वेशन कुठले मिळणार ? रात्री जागा मिळण्यासाठी हमाल ठरवला स्टेशनवर गर्दी वाढतच होती रात्री आठला प्लॅटफॉर्मवर गाडी लागता लागता हमालाने कौशल्याने दोन बर्थ पकडले तुफान गर्दी होती पण डब्यात घुसून सामान ठेवले मुलांना झोपवले रात्री नऊ वाजता गाडीने अहमदाबाद सोडले

गर्दीने तुडुब भरलेल्या डब्यात झोप लागणे शक्यच नव्हते सपलेल्या प्रवासाच्या आठवणींनीही मन भरून येत होते गांधीजींची जन्मभूमी पोरबदर आणि कर्मभूमी साबरमती आश्रम याचे दर्शन झाले होते आपल्या असख्य लीलासाठी प्रसिद्ध असलेल्या भगवान कृष्णाच्या अत कालाशी निगडीत स्थळाच्या दर्शनाने मन जसे भारावले होते तसेच द्वारकेच्या मदिरातील दर्दभरी स्वराने कृष्णाला आळवणारी प्रेमदिवानी मीरा वारवार नजरेसमार येत होती विध्वसातून उभारलेल्या सोमनाथच्या पुनित भूमीचे दर्शन झाले होते गीरच्या जगलातील वनराजाची डरकाळी कशी विसरणार ? गिरनारची सफर तर एक रोमाचकारी अनुभव होता आणि गरबा लोकनृत्यात तल्लीन होणाऱ्या गुर्जर कन्यांचा प्रदेश पहाण्याचे भाग्य लाभले होते

रात्रीचा प्रवास सपवून गाडी मुबई सेट्रलच्या आवारात दिवसउजेडता साडेसहाच्या सुमारास पोहोचली सामान उतरून घेऊन, रस्ता ओलाडून मुवई सेट्रल स्थानकावर आलो नगरला जाण्यासाठी सकाळी सातची बस उभी होतीच गर्दी नसल्याने ऐसपैस जागा मिळाली रात्रभरचा शीण कमी होण्यास थोडी मदत झाली खडाळा, लोणावळा, पुणे पार करून दुपारी दोन वाजता बस नगरला पोहोचली गुर्जरभमीच्या रम्य स्मृती मागे ठेवून प्रवास सपला होता




REFBK-0024388